

# श्री साईलीला

गस्ट

कि. ५० न. पैसे

१९६३

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

संतांच्या कथा नेहमीं ऐकाव्या. त्या ऐकण्याची कानांना सवय लावावी. त्याच्यापुढें स्वर्गसौख्यहि फिके पडेल. सुख किंवा दुःख हे केवळ मनाचे विकार आहेत. सत्संगासारखें सुख नाहीं. त्यामुळें मनावर चांगले संस्कार घडतात व तेच तारक होऊन रहाणारे असतात. त्या संस्कारामुळें मन सुखदुःखाच्या फेऱ्यांत गुरफटून जात नाहीं. परंतु संतकथा ऐकणें, वाचणें व त्यांत गोडी वाटणें हें सारें पूर्वकर्मानुसार घडत असतें. उगाच प्रत्येकाला त्यांत गोडी किंवा रस वाटणार नाहीं. पूर्वकर्मानुसार आपणाला बुद्धि होत असते. तुम्हीं कितीहि धडपड करा. वाटेल तेवढा उद्योग करा; परंतु पूर्वकर्मानुसार जें घडायचें तें घडल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. सुख आणि दुःख तुम्हीं बोलावून येत नाहीं. तें सारें पूर्वकर्माचें मूळ असतें. तेव्हां या जन्मीं तरी संत संग धरावा. देवाचें नाव सदैव तोंडी असावें. नामसंकीर्तन हेंच आपलें व्रत व्हावें. योग्य वेळीं त्याचे फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

— श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] ऑगष्ट १९६३ [ अंक ५ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

शिवे रुष्टे गुरुस्त्राता गुरौ रुष्टे न कश्चन ।
लब्ध्वा कुलगुरुं सम्यग् गुरुमेव समाश्रयेत् ॥

आपल्यावर देवाचा कोप झाला तर त्यांतून पार पाडणारा सद्गुरूच होय; परंतु गुरू जर का कोपायमान झाला तर मात्र आपलें रक्षण करणारा कोणी नाहीं. यासाठीं आपण सद्गुरुचा शोध लावून त्याच्या आश्रयाखालीं वावरलें पाहिजे.

या संसारसागरांत आपल्यावर हेलकावे खाण्याचे लाटांवर लाटा आदळण्याचे प्रसंग वेळोवेळीं येत असतात. त्यांतून पैलतीरास नेणारें जर कोणतें खात्रीचें साधन असेल तर तें म्हणजे गुरुभक्ति व गुरुसेवा हेंच होय. जो आपल्या गुरुस सर्वस्वीं शरण गेलेला आहे जो गुरुसेवा मनोभावें व तत्परतेनें करीत असतो व ज्याचें अंतःकरण निर्मळ गुरुभक्तीनें व्यापलेलें आहे त्याच्या वाट्यास दुःख, दैन्य, अज्ञान, निराशा व भयभीति कधीही येणार नाहींत. तो एक दिवस भवपार होऊन देवासन्निध गेल्याशिवाय रहाणार नाहीं.

ज्यानें या जगांत जन्माला येऊन जें जाणायचें तें जाणलें आहे व जो आपल्या शिष्यास मोक्षाचा मार्ग दाखविण्यास समर्थ आहे अशा गुरुचें सान्निध्य ज्याला लाभलें व अशा गुरुच्या सेवेंत जो सदासर्वकाळ आनंद मानतो तो खरोखर धन्य होय.

आपल्या गुरुचा प्रत्येक शब्द देवाचा शब्द मानून त्याचें पालन करावयाचें; त्यांत कसूर कधींही होऊं द्यावयाची नाहीं. कितीही कष्ट पडोत. गुर्वाज्ञा पालन हें आपलें पवित्र व महत्तम कर्तव्य आहे. असें जो मानील त्याला त्याचे योग्य तें फळ मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

साईबाबानीं गुरुसेवेचें महात्म्य परोपरीनें सांगितलें आहे. आपण विचारपूर्वक एकदां गुरूची कास धरल्यानंतर त्याच्यावर अढळ श्रद्धा ठेविली पाहिजे. ती श्रद्धाच आपलें रक्षण करणारी असते. 'विश्वासें पाळावें सद्गुरुवचन' असें बाबानी सांगितलें आहे.

एकान्ताचें महत्त्व भारी आहे. प्रत्येकानें जितका एकान्त साधता येईल तेवढा साधावा व त्या एकांतात अध्ययन व आत्मचिंतन करावें. हा आपला निदिध्यास होऊन राहिला पाहिजे. श्रद्धापूर्वक हें सर्व केलें पाहिजे. 'भक्तिश्रद्धान्वित मनें। शिष्यें पुर्ण विनय संपन्नें। शरण साष्टांग गेलियाविणें। ज्ञान केणें गुरू न दे ॥

गुरु तुम्हाला ज्ञानकण केव्हा देतो? जेव्हां तुम्हीं त्यांची मर्जी संभाळाल, त्यांचा य के शब्द झेलाल व त्यांच्याशीं विनयानें वागाल तेव्हांच. तुमची वृत्ति तदाकार

झाली पाहिजे. गुरु माऊलीशिवाय माझा त्राता दुसरा कोणी नाहींही तुमची भावना झाली पाहिजे.

' दासानुदास मी तुमचा। भरवसा एकतव पदांचा। धरोनि पावलो म्हणा वाचा। धडा जिवाचा दृढ करा ' ॥ अशी वृत्ति झाली पाहिजे.

तुमच्या मनाचा निर्धार होणेंच जरूर आहे. बाबा तारणारे किंवा मारणारे! त्याच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवून आपण प्रत्येक पाऊल टाकलें पाहिजे. हरघडी त्याची आठवण होत राहिली पाहिजे. ज्याला हरघडी त्याची आठवण होते त्याच्याकडून अविचार, पापकर्म, अपकार घडेलच कशाला? आणि त्या पुण्यकारक नामस्मरणामुळें ज्यानें अंतःकरणशुद्धि साधली, ज्यांच्या अंतरंगातील सारा मळ धुवून गेला जेथे सद्गुणाचा सुगंध दरवळला तेथें तुमची इच्छा पूर्ण व्हायला कितीसा वेळ लागणार आहे?

मग तुमच्या वाट्याला आपत्ति, दुःख व संकटें कशाला येतील? मग शिरीं ठेवीं अभयहस्त। इडा–पीडा करोनी उद्वस्त। जाळोनी पातकाच्या राशी समस्त। उदी मस्तकी फांसी तो ॥

ज्याच्या वाट्याला अशा प्रकारचें भाग्य आलें तो धन्य होय. अहो! ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे का? बाबानीं आजवर किती लोकांना संकटमुक्त करून मार्गाला लाविलें आहे! बाबा भुकेले आहेत भक्तिभावाचे. तो भक्तिभाव मनोभावें त्याना अर्पण करून मग काय चमत्कार घडतो तो पहावा.


दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८




अन्न ही माणसाची सर्वांत प्रथम आवश्यकता होय. आणि त्या आशेनें बाबांकडे किती तरी लोक आले. जे अगदीं गरीब आणि पीडित होते त्यांना बाबांनीं सढळ हातानें ताबडतोब मदत दिली. आतिथ्य सत्कारांत बाबांनीं फारच उच्च आदर्श घालून दिला. दुसऱ्या कोणासही त्यातून थोडें दिल्याखेरीज आपलें भिक्षान्नसुद्धां ते स्वतः एकटे कधीं खात नसत. कुत्र्या-मांजरांनासुद्धां त्यांचा हिस्सा मिळत असे. मुंबईच्या भक्तांकडून बाबांकडे रोज नैवेद्योपहार येऊं लागले तेव्हांपासून शिर्डीस बाबांच्या जवळ भिकारी आणि फकीर लोकांचा एक तांडा कायमचाच येऊन बसला. पण भिकाऱ्यांना तरी अंत कुठें ! बादशहासुद्धां भिकारी असतात. कित्येक लोक नोकरीची अथवा कोणत्या तरी बढतीच्या परीक्षेंत पास होण्याची भिक्षा मागण्यास येत. बाबांच्या आशीर्वादानें ते पास होत. याचा एकच अनुभव खाली देतों. चोळकर नांवाच्या एका विद्यार्थ्यास असलीच एक परीक्षा पास होणें फार कठीण होऊन बसलें होतें. आणि ती पास झाल्याखेरीज त्यांना नोकरी मिळणें अशक्य होतें. त्यांनीं बाबाना प्रार्थना केली आणि आणि असें ठरविलें कीं परीक्षेंत पास होऊन नोकरी मिळाली तर बाबांच्या दर्शनास जाईन. ते परीक्षेंत पास तर झाले पण नोकरी फार थोड्या पगाराची मिळाल्यानें शिर्डीस जाण्या इतका रेल्वेखर्च त्याना झेंपणारा नव्हता. चहांतील साखरेपासून प्रत्येक बाबतीत त्यांनीं मग काटकसर करून पैसे जमविले. व आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. दर्शन करून उठतांच बाबा दुसऱ्या एका शिष्यास म्हणाले, "याला पुष्कळ साखर घालून चहा द्या."

डॉ. तेंडुलकर, मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी असतांना अभ्यासाविषयीं खात्री कमी असल्यामुळें त्यांना नेहमीं भीती वाटे कीं मी परीक्षेंत नापास होईन. काहीं ज्योतिषांनीही त्यांच्या या भीतीला पुष्टि दिली. बाबांनी सांगितलें कीं 'तुम्हीं पास व्हाल. ज्योतिष्यांचें ऐकूं नका. धीटपणानें परीक्षेस बसा.' त्याप्रमाणें ते पास झालेही. श्री. एच. एस. दीक्षित यांच्या मुलाला आणि आणखी इतरांनाहि साईबाबानी या प्रकारची मदत केली आहे. अक्कलकोटचे श्री. सापटणेकर याचा वकिलीच्या परीक्षेंत बसणारा एक विद्यार्थी मित्र होता. त्याचा अभ्यास पूर्ण झाला नव्हता तरीही परीक्षेंत पास होण्याची त्याला आशा होती. सापटणेकरानीं याबद्दल त्याला विचा... तर तो म्हणाला, बाबानी मला सांगितलें आहे 'तूं पास होशील' म्हणून. सापट...रानी त्याची थट्टा केली आणि अशा गोष्टींवर विश्वास ठेवल्याबद्दल त्याला

मूर्ख ठरविले. बाबाचे शब्दावर त्यावेळी त्यांचा विश्वास बसला नाहीं. पण परीक्षेचा निकाल झाला आणि तो मित्र पास झाला हें पाहून मात्र सापटणेकरांना आश्चर्य वाटलें. तथापि हे काकतालीय न्यायानें झालें असेल असें त्यांना वाटलें. परंतु पुढें बाबावर पूर्ण श्रद्धा बसून त्यांच्या अद्‌भुत सामर्थ्याचा परिचय त्यांना १०-११ वर्षांनंतर झाला; आणि बाबाच्या इहलोकीं व परलोकींच्या अचाटसामर्थ्याची जाणीव झाली.

बाबाचे सहजोद्गार म्हणजे त्यांच्या भक्ताकरितां आणि पर्यायानें सर्व जनतेकरितां दिलेली प्रमाणपत्रेंच होत. “**माझ्या भक्तांच्या घरी अन्नवस्त्राचा तुटवडा कधीही पडणार नाही.**” आणि खरोखर बाबानीं आपलें हें वचन तंतोतंत पाळिलें. यासंबंधीं दोन उदाहरणाचा प्रामुख्यानें उल्लेख करिता येईल. (१) दासगणू महाराज (२) उपासनी महाराज. या दोघानींही संसाराची चिंता न करिता परमार्थाकडेच लक्ष पुरविण्याची बाबानीं आज्ञा दिली. दासगणु महाराजानीं आपली नोकरी व पेन्शनचे हक्क वगैरे सर्व सोडून दिले. पण बाबाच्या कृपेनें त्यांना अन्न-वस्त्राची ददात कधीही पडली नाहीं. उलट आज त्यांची काही स्थावर मिळकतही आहे; आणि उपासनीमहाराज बाबांकडे गेलें त्यावेळीं त्यांचेंपाशी एक कपर्दिकही नव्हती, पण आज त्यांचें वैभव केवढें वाढलें आहे !

बाबा कोणाच्या कारभारात सहसा हात घालीत नसत. पण भक्ताच्या हाकेला ‘ओ’ दिल्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हतें. बाबांची कृपा संपादन करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे **त्यांना शरण जाणें: “तुम्ही आपला सर्व भार माझ्यावर टाका, मी तो सहन करीन. तुम्ही माझें पहाल तर मी तुमचें पाहीन.**” बाबा म्हणत. “तुम्हींच माझे सर्वाधार. तुमच्याशिवाय कोणाला शरण जाणार ?” हाच मनुष्याचा निर्धार झाला पाहिजे. श्री. दामोदरपंत रासने यांची अशीच भावना होती. बाबांच्या संमतिशिवाय तें कांहींच करीत नसत. एकदा त्यांच्या एका स्नेह्यानें एक लक्ष रुपये फायदा होईल अशी एक मसलत त्यांना दिली. श्री. रासन्यांनीं तावडतोब बाबाकडे मंजुरीसाठी लिहिलें. पण बाबानीं लिहिलें “दाम्या आता आकाशालाच गवसणी घालण्याचा प्रयत्न करू पाहात आहेस. आहे त्या स्थितीतच त्यानें समाधान बाळगलें पाहिजे.” रासन्यांनीं बाबाना काहीं लालूच दाखवून वळविण्याचा प्रयत्न केला. बाबानी मात्र निश्चित सांगितलें की पैशाच्या भानगडीत आपण पडणार नाही. रासन्याचा नाईलाज झाला. आणि ती योजना मागें पडली. काहीं दिवसानी, धान्याच्या किंमती वाढल्यामुळें एका व्यापाऱ्यानें श्री. रासन्याना सुचविलें कीं आपण दोघेही भागीदारीनें काही धान्य खरेदी करून ठेवू. पुन्हा बाबांचा सल्ला घेतला गेला. बाबांनीं नकार दिला. ते म्हणाले ‘तुम्ही पांचाच्या भावानें गहू घ्याल आणि साताच्या भावानें विकाल.’ त्या व्यापाऱ्याला वाटलें कीं रासनें यांना मुळींच व्यवहारज्ञान नसून ते क्षणिक मनाचे आहेत. ती योजना फेटाळली गेली; पण कांहीं दिवसांनीं काय झालें ? अतिवर्षणामुळें त्या वर्षी पीक

फार झालें व धान्याच्या किंमती पार उतरल्या. पण बाबांच्या योग्य सूचनेमुळें श्री. रासने मात्र फार मोठ्या नुकसानीपासून वांचले. या प्रकारच्या बाबांच्या सर्वज्ञते-संबंधीं त्यांची आणि इतर भक्तांची पूर्ण खात्री होती आणि त्यांच्या सूचनांचा ते यथायोग्य आदर करीत.

श्री. बी. व्ही. देव, मामलेदार व श्री. एस. व्ही. साठे, डेपुटी कलेक्टर या दोघांनाही नोकरीच्या बढतीमध्यें बरेंच अडथळे होते. श्री. साठ्यांनीं आपली तक्रार बाबांकडे गुदरली. बाबांनीं त्यांना आश्वासन दिलें आणि एक दिवस एकाएकीं साठ्यांना दरमहा १०० रु. नीं बढती मिळाली. श्री. देव बाबांजवळ या बाबतींत प्रत्यक्ष कांहींच बोलले नाहींत पण बाबांनीं त्यांच्या पहिल्या भेटींतच उद्गार काढलें, 'अरे ही तर सारी २५ रुपयाची भानगड आहे. मी त्या वरिष्ठाला सांगितलें कीं देऊन टाक म्हणून. तो देत नाहीं. पण तो जाईल कुठें, दोन चार महिन्यांत तो देईलच.' बाबांचे म्हणणें अक्षरशः खरें ठरलें. दोन चार महिन्यांतच श्री. देवांना, त्यांचा हक्क असलेली दरमहा २५ रुपयांची बढती मिळाली. या प्रसंगानें श्री. देवांची बाबांवरील श्रद्धा–जी, श्री. कावले पाटील यांच्या प्रयत्नानें मलिन होत चालली होती, ती–अधिक दृढ व निर्मल झाली.

श्री. साठ्यांचे बाबतींत पेन्शन डिपार्टमेंटनें त्यांची पहिली कांहीं इंगामी नोकरी हिशोबांत धरण्याचें नामंजूर केल्यानें एक युरोपियन सद्‌गृहस्थ नानासाहेब चांदोरकर आणि शाम यांच्या शिफारशीनें बाबांकडे आले होते. आणि थोडे दिवस तेथें राहून बाबांनीं परवानगी दिली नसतांच जायाला निघाले. पण अर्ध्यांच रस्त्यांत त्यांचे घोडे उधळले आणि टांग्यांतून पडल्यामुळें त्यांनाहि गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या आणि त्यामुळें त्यांना बरेच दिवस दवाखान्यांत रहावें लागलें. नानासारख्या भक्तांना हें कळून चुकलें होतें कीं सरकारी कामासारख्या महत्त्वाच्या कामांत बाबांचा सल्ला घेणें हा अगदीं सुरक्षित मार्ग होता.

एक दिवस नानांना कलेक्टर व इतर कांहीं अधिकाऱ्यांना भेटावयाचे होतें. त्यांनी आज्ञा मागितली. बाबांनी नकार दिला. नानासाहेब गेले नाहींत. पण दुसऱ्या दिवशीं बाबांचे आज्ञेनें ते तिकडे गेले असतांना कळून आलें कीं कलेक्टरांनींच तारेनें त्या दिवशींची भेट पुढें ढकलली होती. एका वकील-साहेबांस पंढरपूर कोर्टांत एका तारखेस जावयाचे होतें. बाबांनीं त्या तारखेस न जातां दुसऱ्या दिवशीं जाण्याची आज्ञा दिली. वकिलांनीं बाबांची आज्ञा पाळली. आणि नंतर त्यांना कळून आलें कीं, प्रतिपक्षाच्या अर्जावरून त्या खटल्याची तारीख एक दिवस पुढें ढकलली गेली होती.

तात्या पाटील यांना कोर्टांत हजर राहण्याबद्दल मुन्सफ साहेबांचे एक समन्स मिळालें होतें. पण बाबांनीं आज्ञा दिली नाहीं. त्यांनीं कांहीं तरी सबब सांगून पाठविली आणि दुसऱ्या दिवशीं कळलें कीं मुन्सफ साहेबांची प्रकृती थोडी अस्वस्थ असल्यामुळें

कोर्टेंच त्या दिवशीं बंद होतें. एका मृत्युपत्राच्या खटल्यांत हायकोर्टाकडून श्री. दीक्षित यांना दोन तीन वेळां समन्स आले होतें. पण बाबा आज्ञा देईनात. त्यांच्या पक्षाच्या लोकांनीच शेवटीं त्यांच्यावर वारंट काढावयाचे ठरविलें; पण या प्रत्येक वेळीं तो खटलाच सुनवणीस निघाला नाहीं आणि ज्या दिवशीं तो सुनावणीस निघाला त्याच दिवशी बाबांनीं श्री. दीक्षित यांना मुंबईस पाठविलें व त्यांची तपासणीही झाली.

श्री. साठे याना कलेक्टर व इतर अधिकारी यांची एक महत्त्वाची भेट घ्यावयाची होती. पण बाबा आज्ञा देईनांत. श्री. साठ्यांनीं आपल्या श्वशुराच्या मार्फत बाबाकडे निरोप पाठवला कीं ही भेट न घेण्यात मला नोकरीवरहि कदाचित् पाणी सोडावें लागेल. बाबानीं श्वशुरांना सांगितलें कीं साठ्यांना बंद करून ठेवा. श्री. साठे याप्रमाणें दोन दिवस चरफडत राहिले. पण तिसऱ्या दिवशीं बाबाच्या आज्ञेनें तेथें गेल्यावर त्याना कळून आलें की कलेक्टरांनीं त्यांना कांहीं समज न देतांच पूर्वीची भेट स्थगित करून टाकली होती.

———


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बलवान बना:**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डें, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहा:...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल**

८५ बापू खोटे स्ट्रीट, जामळी मोहोल्ला, मुंबई ३

# अगस्त्य ऋषीची कथा

****************************

### अगस्त्य ऋषि

हिंवाळयात पहाटेच्या वेळेला दक्षिणेकडे अगस्त्याचा तारा नजरेस येतो. मोठा ठळक तारा आहे. सारखा चमकत असतो. ग्रह सोडून तारे म्हणून जेवढे, तेवट सारेच चमकतात. पण अगस्त्याची चमक विशेष आहे. हा नेहमींच दक्षिणेकडे राहणारा आहे. अगस्त्य वैदिक ऋषि होते. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळात ह्यांचीं पुष्कळ सूक्तें आहेत. हे मोठे तपस्वी होते. ह्यांची पत्नी लोपामुद्रा. ही पतीला त्याच्या कार्यांत नेहमीं मदत करणारी होती. तिनें आपली स्वतःची म्हणून 'मुद्रा' शिल्लकच ठेवली नव्हती. इतकी ती पतिरूप होऊन पतीच्या मुद्रेंत 'लोपून' गेली होती. पतीबरोबर तीहि तपश्चर्या करी. एकदा तिने पतीस विचारलें, "आपण इतकी तपश्चर्या करतों पण त्याचें फळ काय?" अगस्त्यानीं उत्तर दिलें, "आपले कष्ट कांही फुकट गेले नाहींत. कारण देव रक्षण करीत आहेत." हे नेहमी कुदळीनें खणण्याचें काम करीत, असें वेदांत वर्णन आहे. हे मूळ उत्तरेकडचे. पण ह्यांनीं कुदळीच्या जोरावर दक्षिणेकडे वसाहत केली. ऐतिहासिक माहितीतला पहिला वसाहतवाला अगस्त्य. ह्यांनीं पहिल्या प्रथम विंध्य पर्वतातून वाट फोडून काढली. म्हणूनच ह्याना 'अगस्त्य' म्हणजे डोंगर फोडून काढणारा असें नाव पडलें. सर्व पर्वतात हिमालय मोठा आहे. तरी वयानें तो लहानच आहे असें शास्त्रज्ञाचें मत आहे.

हा 'कालचा पोर' म्हाताऱ्या विंध्यपर्वताशीं स्पर्धा करूं लागला. तेव्हा विंध्याला तें सहन झालें नाही. म्हणून तोहि उंच वाढूं लागला. दोहोंच्या स्पर्धेत बिचाऱ्या हिंदुस्थानची हवा गुदमरूं लागली. इतक्यांत अगस्त्यऋषि कुदळीनें खणत विंध्याजवळ येऊन पोहोंचले. महान् ऋषि जवळ आलेले पाहून विंध्यानें त्याना साष्टांग नमस्कार घातला. ऋषींना वाटलें, ह्याला नम्रतेचा पाठ द्यावा. म्हणून त्यांनीं त्याला उठण्याविषयी अनुज्ञा दिली नाही आणि ते तसेंच दक्षिणेकडे निघून गेले. त्यामुळें त्या पर्वताची उंची कायमची कमी झाली. अशी ह्यांच्या कर्तृत्वाविषयी आख्यायिका आहे. "ह्या उग्र ऋषींनीं दोन्हीं वर्णांचें पोषण केलें." असें त्याच्या जीवनाचें रहस्य वेदांत सांगितलें आहे. हे दोन वर्ण कोण? समाजात कांहीं शरीरकष्ट करणारे आणि कांहीं बुद्धिप्रधान कामें करणारे असे दोन प्रकारचे लोक असतात. तेच हे दोन वर्ण. अगस्त्य हे एक मंत्रद्रष्टे ऋषि असून कुदळीवर उपजीविका करणारे मजूरहि होते. अशा रीतीनें दोन्ही वर्णांचा मिलाफ त्याच्या ठिकाणी झाला होता. आजचा ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न सोडविण्याला अगस्त्य ऋषींचें उदाहरण उपयोगी आहे. सर्वांनीं मजुरीचा मंत्र स्वीकारला पाहिजे. अगस्त्यांची कुदळी ही मजुरीची मूर्ति आहे. ह्या देवतेची सर्वांनीं उपासना केली पाहिजे. हें तत्त्व नेहमीं डोळ्यांपुढें रहावें म्हणून ऋषींना तारकांमध्यें स्थान दिलेलें आहे. ह्या दक्षिणेच्या ताऱ्याचा संदेश आम्हीं अवश्य ग्रहण केला पाहिजे.

—संत विनोबा.

---

# ' तुझें आहे तुजपाशीं— '

—संत विनोबा

श्रीमंताचा मुलगा कधीं एकदा खेळायला घराबाहेर निघाला होता. इकडे सूर्यनारायणाची आकाशात थात तपश्चर्या चालूच होती. बाळ्या पडला नाजुक-साजुक. पाय पोळूं लागले. त्यामुळें दुनियेचा दोस्त सुद्धा त्याला दुश्मनासारखा दिसला. श्रीमंताचाच पोर तो.–डोक्यानें काम करण्यात मोठा पटाईत होता. त्यानें शक्कल काढली कीं सगळ्या जमिनीवर चामडें अंथरून द्यावें म्हणजे पाय भाजणार नाहींत. लागलीच घरीं येऊन त्यानें आपली कल्पना बापाला सांगितली. बापाला बाळ्याचें कौतुक तर वाटलें पण तें आवरून तो त्याला म्हणाला, "अरे खुळ्या, सगळ्या पृथ्वीला नेसविण्यापेक्षा तूच आपल्या पायात जोडे घाल म्हणजे झालें!"

आमची स्थिति ह्या श्रीमंताच्या खुळ्या पोरासारखी आहे. त्यामुळें आकाशाला गवसणी घालणाऱ्या मोठ्या मोठ्या 'कल्पना' आम्हांस सुचतात पण साधे, सरळ, सोपें इलाज सुचत नाहींत. कोणत्याहि प्रश्नाचा आंतून विचार न करता बाहेरून विचार करण्याची आम्हाला सवयच लागत चालली आहे. गांठ सोडायची म्हणजे आतून उकलावी लागते, बाहेरून ओढाताण करण्यानें ती सुटण्याऐवजी अधिकच मजबूत होऊन बसते हें आम्हास समजत नाही. आशिया खंडाचें ऐक्य करण्याची कल्पना आम्हीं शोधून काढतो पण आपल्या मनांतला क्रोध जिंकण्याला आम्हाला वेळ मिळत नाहीं. कोणतीहि गोष्ट जगाला कशी लागू करावी ह्याची 'स्कीम' करण्यात आम्हीं डोकें खर्च करतों, पण आपल्या स्वतःला ती लागू करण्याचें मात्र अचूक विसरतों. व्हावयास पाहिजे ह्याच्या उलट. जी गोष्ट जगाला लागू करावी असें आपणास वाटतें, तिचा अंमल आपण स्वतः ताबडतोब सुरू केला पाहिजे. आचार हें प्रचाराचें एकमात्र साधन आहे.

पृथ्वीची प्रदक्षिणा सर्वांत लवकर कोण करतो याविषयीं एकदां देवांच्या सभेंत चर्चा निघाली. हरएकानें लांबलचक गणित करून "मी अमूक वेळात प्रदक्षिणा करून परत येतो." असें उत्तर काढलें. त्याप्रमाणें सर्वांनी प्रदक्षिणा करून विष्णूला नमस्कार घालावा असे ठरलें. जो तो धावूं लागला नारद स्वस्थ होते. त्यानी चर्चेंतहि भाग घेतला नाहीं आणि पायपिटींतहि घेतला नाहीं. ब्रह्मवीणेच्या नादात ते रंगून गेले होते. पण अगदीं पहिला देव धापा टाकीत येत आहे असें पाहताच त्यानीं स्वतःभोंवतीं गिरकी मारून विष्णूला नमस्कार घालला. सर्व देव परत आल्यावर विष्णूनें परीक्षेचा निकाल लावून नारदाचा पहिला नंबर लावला. विष्णू म्हणाला, "'पिंडीं तें ब्रह्मांडीं' ह्या सूत्राप्रमाणें नारदांनीं पृथ्वी–प्रदक्षिणा पुरी केली आहे, असें माझें मत आहे."

आम्ही जग सुधारण्याचा ठेका घेऊन बसतो आणि जगात 'आमची'हि गणना होते, एवढी मुद्द्याची गोष्ट लक्षात येत नाहीं. त्यामुळें आमचें सारें चरित्र म्हणजे 'विरोधालंकाराचें' उदाहरण झालें आहे. आम्ही मौनाच्या प्रचारासाठीं व्याख्यानें देतों आणि प्रचार झाला नाहीं म्हणजे विचारात पडतों. पण उलगडा होत नाहीं. उलगडा होईल कसा ?

वेदान्तात गोष्ट प्रसिद्ध आहे:—दहा माणसें यात्रेला निघालीं होतीं. जंगलातून पसार व्हावयाचें होतें. वाट जरा धोक्याची असल्यामुळें सगळ्या माणसांनीं एकत्र चालावें असा ठराव झाला. एकानें माणसें मोजून पाहिली तो नऊच भरलीं. दुसऱ्यानें मोजून पाहिलीं, तरी नऊच असे कां ? दहावा माणूस कोठें आहे ? काहीं पत्ता लागेना. "दहावा माणूस हरवला." असा दहा जणांनीं एकमतानें ठराव पास केला !

नक्कीं आमचा हाच घोटाळा आहे. "काम करावयाला माणसें नाहीत." असें म्हणणारीं 'माणसें' ठिकठिकाणी आढळतात. जो तो स्वतःला मोजण्याचें सोडून देतो आणि हिशोब करावयाला बसतो. त्यामुळें कामाचा काहींच मेळ बसत नाही. स्वतःला वगळून विश्वाचें कोडें सोडविण्याची खटपट आहे. त्यानें हाताला काहींच न लागतां माणूस नुसता गांगरून जातो. अर्जुनाला विश्वरूप-दर्शनाची हौस वाटली होती. भगवतांनीं ती हौस चांगलीच पुरविली. बिचाऱ्यानें पुन्हां विश्वरूप–दर्शनाचे नाव काढलें नाहीं. स्व–रूप पहा. विश्व–रूप पाहूं नका.

"तीस कोटि लोकांची शरिरें खादीमय झाली पाहिजेत. सहा कोटि कुटुंबांत सहा कोटि चरखे दाखल झाले पाहिजेत." हें खादीचें 'विश्वरूप.' माझ्या शरिरावर संपूर्ण खादी असली पाहिजे. मला रोज एक तास तरी चरखा कातला पाहिजे" हें खादीचें 'स्वरूप.' "हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती शीख इत्यादि सर्व समाजात अहिंसक वृत्ति उत्पन्न झाली पाहिजे" हें अहिंसेचें 'विश्वरूप'. "माझें अतःकरण प्रेमाणें भरलेलें पाहिजे. माझ्या वाणीवर माझा ताबा पाहिजे' हें अहिंसेचें 'स्वरूप'. "सरकारनें सुरू केलेले तमाम सर्व हमालखाने बंद पडले पाहिजेत. सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनीं सरकारी शाळाचा त्याग केला पाहिजे" हें राष्ट्रीय शिक्षणाचें 'विश्वरूप'. "मी किंवा माझ्या मुलानीं सरकारी शाळेंत जाऊ नये. माझ्या हातून चारदोन मुलांना राष्ट्रीय शिक्षण मिळावें. माझें अध्ययन आणि चिंतन सतत चालू असावें" हें राष्ट्रीय शिक्षणाचें 'स्वरूप'

हरएक प्रश्नाची स्वरूप–दर्शन आणि विश्वरूप–दर्शन अशीं दोन अंगें असतात. पहिले अंग मनुष्याच्या हातचें आहे. दुसरें परमेश्वराच्या ताब्यात आहे. मोठा 'ऑल–इंडिया–मॅन' उर्फ भारती–माणुस झाला तरी '**औट हात तुझी जागा**' ह्या तुकोबांच्या वचनांतून तो सुटत नाहींच. अर्जुन काय लहानसहान पुरुष होता ? त्याच्या काळीं तो एकच 'नर' म्हणविला जात होता. पण विश्वरूप–दर्शन त्याच्या पचनीं

पडलें नाही. तरी भगवंतांनीं 'दिव्य' दृष्टि देऊन ठेवली होती. इतका सगळा योग असतांना अर्जुनाची ती दशा मग किरकोळांची कथा काय? म्हणून आपण स्वरूप सांभाळावें विश्व-रूपाची काळजी करण्यास विठोबा समर्थ आहे.

शिवाय स्वरूपदर्शन हेंच विश्वरूपदर्शनाचे उत्तम साधन आहे. स्वरूपदर्शन मध्यबिंदूसारखें म्हटलें तर विश्वरूपदर्शन परिघासारखें आहे. मध्यबिंदु पकडून ठेवल्याशिवाय परिघि हातीं लागावयाचा नाही. जोंपर्यंत मी अहिंसक बनलों नाहीं, तोंपर्यंत जगाला मी अहिंसक बनवूं शकेन काय? परशुरामानें हा प्रयोग एकवीस वेळां करून पाहिला होता. परशुराम स्वतः क्षत्रिय बनला होता आणि पृथ्वीला निःक्षत्रिय करू पाहत होता. ! मॉन्टेस्क नांवाच्या फ्रेंच ग्रथकारानें फ्रेंच लोकांच्या प्रचारक वृत्तीविषयीं एके ठिकाणी असें म्हटलें आहे की 'दुसरीकडचे लोक आपल्याला माहीत असलेले विषय शिकवितात त्यात काहीं नवल नाहीं. पण फ्रेंच लोक आपल्याला माहीत नसलेले विषय शिकविण्यांत प्रवीण आहेत!" तोच हा मासला झाला. परशुरामाच्या एकवीस प्रयोगांचा अनुभव काय सांगतो? स्वरूप सांभाळल्याशिवाय विश्वरूप सांभाळता येणार नाहीं.

"तुझें आहे तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी॥"

---

## माणसाचा धर्म

परवा एका जैन मुलाला प्रश्न विचारला, 'तू कोण रे—जैन की माणूस?' प्रश्न ऐकून मुलाला गमत वाटली. पण जरा सुद्धा विचार न करता त्यानें सरळ उत्तर दिलें, 'माणूस.' एक लहान मुलगा सुद्धा ही गोष्ट समजूं शकतो की, मी आधीं माणूस आहे आणि मागून सर्व काहीं आहे. पण मोठीं माणसें ही साधी गोष्ट समजू शकत नाहीत. मनुष्याचा परम धर्म कोणता ह्याची चर्चा करकरून नीति-शास्त्रानें उत्तर दिलें—'माणुसकी.' तो मुलगा तरी काय म्हणाला? हेंच. माणुसकीचा मुख्य धर्म सांभाळून आपण जगांत वागलें पाहिजे. हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, ब्राह्मणेतर सर्वांनी ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की आपण 'माणसें' आहोत. माणुसकी सोडून आपण हिंदु किंवा मुसलमान, ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर राहू शकत नाहीं. हिंदु-सुद्धां एक माणूस असतो. जो माणूस नाही तो हिंदु कसा असेल? तसाच मुसलमान आणि तसेच इतर. लढण्याची जरूर पडली तर लढा, झगडा. त्याला कोणी हरकत घेऊ शकत नाही. पण माणूसकी सोडू नका. तो मुलगा कदाचित् विचारील, 'का हो, माणुसकींत लढणें येतें का?" त्याला आपण उत्तर काय देणार म्हणा, पण माणुसकींत लढणें न आले तर निदान लढण्यात तरी माणुसकी राखावी!

—संत विनोबा

---

# ईश्वरावरील श्रद्धाच पैलतीरास नेईल

परमार्थसिद्धीस ज्या अडचणी येतात त्यात मुख्य अडचण प्रपंचासक्ति ही होय. ज्याप्रमाणें एकदा मनुष्य प्रतिबंधात सांपडला असता त्यातून सुटून जाण्यास नाना उपाय योजितो, परतु पराधीनतेमुळे त्याचे ते सर्व उपाय निष्फळ होतात, त्याप्रमाणें या प्रपचासक्तिरूप कारागृहांतून सुटण्याकरिता साधक जप, तप, नेम इत्यादि नानाप्रकारचीं साधने करितात, परंतु त्याची मुक्तता होत नाही. म्हणून या प्रपंचासक्तीस कोठें कोठें पारमार्थिक ग्रंथात बद असें म्हटलें आहे. तसेंच एकदा पक्षी जेव्हा फासेपारध्याच्या पाशामध्यें सापडतो, तेव्हा त्यांतून सुटून जाण्याविषयीं यत्न करून पाहातो परतु मार्ग सांपडेनासा झाला म्हणजे तडफडतो. त्याप्रमाणें मुमुक्षु जीव या प्रपंचासक्तींतून सुटण्याविषयी शमदमादि उपाय करून पाहातो, परंतु त्यातून सुटका होत नाहीं, तेणेंकरून वारंवार परम क्लेश पावतो. म्हणून प्रपंचासक्तीस पाश असेंहि म्हटलें आहे.

त्याचप्रमाणें एकादा पाथस्थ पर्जन्यकाळीं प्रवास करीत असतां मार्गांत महापुरानें भरून चाललेली अशी एकादी विशाल नदी पाहून आपल्यास आतां पैलतीरास कसें जावबेल म्हणून अत्यंत चिताक्रांत होऊन बसतो. तसाच मुमुक्षूस प्रपंचासक्तींतून पार पडण्याचा उपाय कांहीं सुचेनासा झाला म्हणजे ती दुर्लंघ्य वाटून तिला तो महानदीची उपमा देतो : क्वचित् या प्रपंचासक्तीचें स्वरूप त्याहीपेक्षां भयंकर व दुस्तर वाटून तिला पारमार्थिक ग्रंथात सागराचीहि उपमा दिली आहे. सागरामध्यें जसा अपरपार उदकाचा सचय असतो, त्याप्रमाणें या प्रपंचासक्तींत अपरंपार दुःख, भय व क्लेश याचा सचय असतो. समुद्रात जसे मगरादि भयंकर प्राणी सचार करीत असून त्यांच्या सपाट्यात एकादा मनुष्य सापडला असता त्यास ते खाऊ पाहतात, त्याप्रमाणें या ससार समुद्रांत कामक्रोधादि भयकर विकार साधकास क्षणोक्षणीं भयभीत करून टाकतात.

ज्याप्रमाणें वादळामध्यें वारा चोहोंकडून मोठ्या सपाट्यानें वाहू लागतो आणि पर्वतासारख्या भयंकर लाटा उसळू लागतात आणि त्यामध्यें सापडलेल्या मनुष्यास आता गडप करून टाकतील, क्षणांत गडप करून टाकतील. असें वाटतें, त्याप्रमाणें नानाप्रकारच्या विषयवासनारूप प्रचड लाटा या ससारसमुद्रात उसळत आहेत, त्याचें भयकर स्वरूप पाहून साधकजन अत्यंत व्याकूळ होऊन जातात. समुद्रात जसें परस्पर विरुद्ध ओघ एकत्र मिळून मोठे भोवरे होतात. ज्यामध्यें मनुष्य किंवा नौका सापडली असता गरगर फेरे घेऊन तळास जाते, त्याप्रमाणें या संसारसागरात मायाममतादिकांचे भोवरें साधकास वारवार आपल्या भयंकर फेऱ्यामध्यें घालितात. अशा भयंकर प्रसंगीं मनुष्यें समुद्रात सांपसडलीं असतां भोवऱ्यामध्यें सापडून फेरे घेतात किंवा लाटांमध्यें सापडून इकडून तिकडे हेलकावे घेतात, त्याप्रमाणें मनुष्य नाना वासनावश होऊन

,विषयप्राप्तीसाठीं अनेक प्रकारच्या उद्योगाच्या हेलकाव्यांत सांपडतो, आणि कसें तरून जावें हें त्यास कळत नाहीं. ही जी भयंकर समुद्ररूप प्रपंचासक्ति ती तरून जाण्यास परमार्थदृष्टि पुरुषानीं नानाप्रकारचे उपाय सांगितले आहेत. समुद्र तरून जाण्यास जसें नौकेशिवाय दुसरें साधन नाहीं त्याप्रमाणें ह्या संसार तरून जाण्यास ही पारमार्थिक नौका पाहिजे. ती नामनौका होय, असें या पुढील अभंगांत साधु तुकारामांनीं ससारावर समुद्राचें रूपक करून सांगितलें आहे :—

'ऐसा दुस्तर भवसागर । नेणो कैसा उतरूं पार ॥ १ ॥
कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर ॥ २ ॥
मायाममतेचे भोवरे । येती भयानक फेरे ॥ ३ ॥
वासनेच्या लहरी येती । उद्योग हेलकावे बसती ॥ ४ ॥
तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमधी बैसे' ॥ ५ ॥

म्हणजे अत्यंत दुस्तर व भयंकर असा जो भवसागर तो तरून जाण्यास भगवंताचें नामस्मरण हा एक उपाय आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं याचप्रकारचें संसारसमुद्राचं रूपक करून शमदमादि सामुग्रीने परिपूर्ण अशी ज्ञाननौका हेंच साधन होय असें सांगितले आहे. त्या नौकेंत बसून, म्हणजे परमात्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान संपादून सत्संगति आणि वैराग्य या उभयविध मार्गाचें अवलंबन करून हा संसारसमुद्र तरून जावें असें सांगितलें आहे. कोठें पारमार्थिक ग्रंथांतही ज्ञाननौका ही दुर्बल वाटून ईश्वरनिष्ठेशिवाय दुसरी नौका किंवा तरणोपाय नाहीं म्हणून तिचाच आश्रय करून पारमार्थिक ज्ञानसंपन्न साधकांनीं उत्तीर्ण व्हावें, म्हणून सांगितलें आहे.

"ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान्। स्रोतांसि सर्वाणि भयावहानि॥" म्हणजे परमेश्वराचाच आश्रय करून या संसारसमुद्रामध्यें महासागरांतील नाना भयंकर प्रवाह आहेत त्या सर्वातून तरून जावें. तात्पर्य, हें सर्व जग ईश्वराधीन आहे. त्याच्या सत्तेनेंच हें चाललें आहे. आपण सर्वप्रकारें दुर्बळ आहों. त्याच्या कृपेवाचून आपल्यास सुखलेशही प्राप्त होत नाहीं. त्याची कृपा झाल्यावाचून आपल्यास सद्गति प्राप्त व्हावयाची नाहीं. तोच आपला त्राता, असा दृढनिश्चय करून त्याची इच्छा प्रमाण मानून त्याचे ठायी चित्त निर्भर व स्थिर करून सदैव त्याचे चिंतन करावें. तेणेंकरून त्याचे ठायी प्रेम जडून इतर विषयाची आवड कमी झाली म्हणजे सहजच या प्रपंचासक्तिरूप महासागरातून आपण पार पडून कृतार्थ होऊं. "ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति;" म्हणजे जो ईश्वरनिष्ठ तोच अमृतत्व अथवा मोक्ष पावतो.

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

# जीवनांत वैराग्याचे महत्त्व

पारमार्थिक मार्गांत साधकाची मति दृढ राहण्याकरितां जे उपाय सांगितले आहेत, त्यांत वैराग्य हा मोठ्या महत्त्वाचा उपाय म्हणून सांगितलें आहे. कित्येकांनीं तर इतर सर्व उपायांपेक्षा यांस अधिक महत्त्व दिलें आहे. वैराग्य म्हणजे विरक्ति, इंद्रियगोचर किंवा मनःकल्पित नाशवंत विषयांविषयीं अनासक्ति. परमेश्वरानें हें मानवी शरीर आणि त्याचा धारक आत्मा या दोहोंचा संयोग करून शरीर आत्म्याचें अंकित करून ठेविलें आहे, म्हणजे आत्म्याच्या चेतनेशिवाय तें आपल्या भिन्न भिन्न क्रिया करूं शकत नाहीं. तरी आत्म्यास शरीराचे म्हणजे इंद्रियांचे द्वारें बाह्य विषयांचा परिचय होऊन त्यांची गोडी लागली म्हणजे तो त्यांच्यावर लुब्ध होऊन शरीराचा अधिष्ठाता असतांही अगदीं शरीरवशगत होऊन केवळ इंद्रियांच्याच स्वाधीन राहतो. असें झालें म्हणजे त्याचा सारासारविचार नष्ट होऊन तो विषयवासनाजालांत सांपडतो आणि त्यांतून सुटका झाली नाहीं तर हळू हळू दुष्कर्मांस प्रवृत्त होऊन अज्ञान व पाप यांहीं व्याप्त होत्साता अधोगतीस जातो. परंतु भाग्यवशात् सत्समागम होऊन सुबोध अंतःकरणांत ठसून बाह्य विषयांचें नश्वरत्व न समजतां व त्यांचे ठायीं मन आसक्त झालें असतां त्यांपासून उत्पन्न होणारें जडत्व व अविवेक आणि परिणामीं प्राप्त होणारी दुर्गति या सर्वांचें भयंकर स्वरूप दृढतर मनांत बाणलें जाऊन कित्येक सावध पडतात. आणि बाह्यजीवनापेक्षा आध्यात्मिक जीवन विशेष महत्त्वाचें आहे असें त्यास वाटूं लागतें. बाह्य ऐश्वर्य कितीही वाढलें, द्रव्यसंचय कितीही केला, अधिकार केवढाहि प्राप्त झाला, लोकांमध्यें प्रतिष्ठा कितीही मिळविली, तथापि पारमार्थिक जीवनास याचा तादृश उपयोग न होतां उलट्या ह्या गोष्टी आत्म्यास मोहांत पाडून पारमार्थिक संपत्तीचे लोभाविषयीं पराङ्मुख करितात. हें ज्ञान दृढ झालें म्हणजे बाह्यविषयांपासून शाश्वत सुखाची प्राप्ति व्हावयाची नाहीं असा बुद्धीचा निश्चय होऊन विषयांवरील आसक्ति आपोआप कमी होत जाते.

“ पराचः कामाननुयंति बालास्ते मृत्योर्यांति विततस्य पाशम् ।
अथ धीरा अमृतत्वम् विदित्वा ध्रुवमध्रुवेष्विह न प्रार्थयन्ते ”

अज्ञजन बाह्यविषयांत आसक्त होऊन राहातात व तेणेंकरून मोहपाशांत सांपडून पारमार्थिक जीवनाचें अत्यंत विस्मरण हा जो आत्मिक मृत्यु त्याचा पंथ धरितात. परंतु जे विवेकसंपन्न असतात ते नाशवंत ऐहिकविषयांमध्यें शाश्वत सुखाची आशाच करीत नाहींत, म्हणून बाह्यविषयांविषयीं उदासीन वृत्तीनें राहतात. ही जी बाह्यविषयांविषयीं उदासीनवृत्ति, तिलाच विरक्ति किंवा वैराग्य हें नांव दिलें आहे. परंतु हें वैराग्य नुसतें बाह्यविषयांतून मन काढून घेण्याचा यत्न केल्यानें दृढ होत नाहीं, मनाचा सुखाचा दृढ अभ्यास झाल्यामुळें सुखावह जे बाह्यविषय त्यांचा त्याग

अत्यंत दुष्कर होतो. केवळ निग्रहानें बाह्यविषयाचें ग्रहण कांहीं काळ न केलें तरी त्याची आवड नाहींशीं होत नाही. आत्म्यास परमेश्वराच्या आनंदमय स्वरूपाचें दर्शन होऊन मन त्याचेठायीं रममाण झाले तरच ही आवड क्षीण होते. " रसो वै सः रसंह्येवायं लब्ध्वाऽनंदीभवति " परमात्मा आनंदस्वरूप आहे. त्याच्याच प्राप्तीनें आत्मा शाश्वत आनंद पावतो. परमात्माच एक परमप्रेमास्पद होय. त्याचेठायीं ज्यांचें चित्त स्थिरावलें तेच पूर्ण प्रेमाचा अनुभव घेऊ शकतात. कित्येक मनुष्यें विपत्तीनें किंवा शारीरिक व्यथेने किंवा काही संसारोद्वेगामुळें प्रपंचाचा त्याग करून घरदार सोडून जातात. परंतु अशा त्यागानें खरें व दृढ वैराग्य होत नाहीं. अशा होत नाहीं. अशा मनुष्याची विषयासक्ति नाहींशी होत नाहीं. तें पुनः पुन्हां विषयमोहाच्या फेऱ्यांत पडतात. मग ते घरात असोत किंवा वैराग्याच्या वेषानें बाहेर फिरोत. पारमार्थिक जीवनास अत्यंत आवश्यक असें जें वैराग्य म्हणजे शारीरिक जीवनाविषयीं दृढ अनासक्ति, तें परमात्मस्वरूपीं आत्मा एकनिष्ठ झाल्या-वाचून सिद्ध व्हावयाचें नाहीं.

" छाया मार्गद्रुमोत्थां पथिक इव मनाक् संश्रयेद्देहसंस्था ।
स्वात्मारामं प्रवेष्टुं सखलु सुखमयं प्रव्रजेद्देहतोऽपि ॥ "

जसा एकादा मार्गस्थ मनुष्य मार्गांत उन्हाचे वेळीं विश्रांति घेण्यासाठीं एकाद्या वृक्षाच्या छायेखालीं घटकाभर बसतो, परंतु आपली मजल पुढें राहिली आहे ती आटोपल्याशिवाय आपलें घर आपल्या हातीं येणार नाहीं असें वाटून तो जसा त्या छायेच्या सुखात लुब्ध होऊन न राहता लवकरच आपल्या घराचा मार्ग धरितो, त्याप्रमाणेंच आपल्यास पारमार्थिक जीवनाच्या मार्गास पुढें जावयाचें आहे व परमात्म-पदीं दृढ निष्ठा संपादन करावयाची आहे या गोष्टीकडे पूर्ण लक्ष ठेवून जे शारिरीक जीवनाचा अनासक्तबुद्धीनें उपभोग करितात, तेच त्याचा त्याग करून खरें वैराग्य संपादूं शकतात. अशा वैराग्यात आणि बाह्य कर्तव्यकर्मांत विरोध येण्याचें मुळींच कारण नाहीं. अवश्य कर्तव्य म्हणून जीं बाह्य कर्मे करावयाचीं तीं आसक्त बुद्धीनें करतां कामा नयेत. केवळ ईश्वराज्ञा म्हणून व ईश्वरेच्छेनुसारें ती करावयाची असें झालें असतां वैराग्य आणि लोकोपयोगी परोपकार किंवा सत्कर्माचरण या दोहोंसहि पारमार्थिक जीवनांत जागा मिळते. आणि जसें जसें पारमार्थिक जीवन सुखावह होत जातें तसतशी आपली भूतदया व परोपकारबुद्धि आपल्या लौकिक आचरणांत अधिकाधिक दृष्टीगोचर होते.



# स्वामीं शिवानंद यांचें देहावसान

३०।३५ वर्षें गंगाकिनारीं हृषिकेश येथें आश्रम स्थापन करून जनतेंत
ध्यात्मज्ञानाचा एकनिष्ठपणें व अत्यंत प्रभावीपणें प्रचार करीत असलेले स्वामी
द सरस्वती यांचे ता. २४ जुलै रोजीं वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांच्या आश्रमांत
न झालें हें लिहिण्यास अत्यंत दुःख होत आहे. साईलीलेच्या वाचकांस त्यांच्या
संपदेची ओळख करून देण्याची जरूरी नाहीं. अनेक अंकांतून त्यांचे अध्यात्म-
रील लेख या मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत.

गेल्या २५ जून रोजीं स्वामीजींना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना लवकर
ल अशी चिन्हें दिसूं लागली होती. पण त्याच्या विकारांत गुंतागुंत निर्माण
आणि प्रकृति फार खालावत जाऊन ता. २४ जुलै रोजीं रात्रीं ११ वाजतां
ाणोत्क्रमण झाले.

डिव्हाइन लाइफ सोसायटीचे स्वामी शिवानंद हे संस्थापक व अध्यक्ष होते.
व भारतीय तत्वज्ञानावर अनेक ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत.

### ष्यांत डॉक्टर

दक्षिणेतील तिरुनल्वेली जिल्ह्यांतील एक साधु पुरुष म्हणून विख्यात
या गावच्या अप्पय्या दीक्षितार याच्या नामवंत कुटुंबांत पट्टामडाई था
८ सप्टेंबर १८८७ रोजी शिवानंदांचा जन्म झाला. सेवापरायण वृत्तीमुळें
डॉक्टरी पेशा पत्करला व मलायांत त्यांनीं व्यवसाय केला
ं ते आरोग्य विषयास वाहिलेले नियतकालिक चालवीत होते व आरो-
प्रश्नावर त्यांनीं त्यावेळीं खूप लिखाण केले पुढें संन्यासी जीवनाचा स्वीकार
१९२४ सालीं हृषीकेश येथें शिवानंद राहाण्यास आले. तेथें त्यानीं खूप तपाचरण
योगी शिवानंद म्हणुन ते ओळखले जाऊ लागले व गंगाकिनारी शिवानंदा-
१९३२ सालीं त्यानीं स्थापना केली. डिव्हाइन लाइफ सोसायटीची १९३६
स्थापना झाली व १९४८ मध्यें योग-संस्था जन्माला आली; त्या संस्थाद्वारें
अध्यात्म ज्ञानाचा व योगाचा प्रसार केला.

१९५५ सालीं स्वामीजींनीं जागतिक सर्वधर्म परिषद भरविली होती. सनातनी
जन्म झालेला असूनहि स्वामीजींचीं मतें फार उदार होती. त्याचे २००
असून सर्व देशात त्याचे शिष्य आहेत व त्यात सर्व धर्मीयाचा समावेश आहे.
न लाइफ सोसायटीच्या शाखा दक्षिण आफ्रिका, युरोप, अमेरिका, हॉंगकॉंग
या देशात आहेत. स्वामीजींनी डोळ्याचा मोफत दवाखाना व एक मोफत
चालविले होते.

राष्ट्रपति डॉ. राधाकृष्ण यानीं अलीकडेच हृषीकेश येथें स्वामीजींची भेट घेऊन
व तत्वज्ञानाच्या विषयावर त्याच्याशी चर्चा केली होती.

---

# श्री

लेखक — श्री

श्री साईसच्चरित्रात जें कांही ...
आहे. त्यात बाबानीं श्री ...
हकिकत आहे, अनुग्रहाच्या अनुषंगाने ...
त्या मोलाचा तर आहेच पण त्या ...
वरचा १९२० नंतर जगांत प्रसृत ...
लोकमान्याची गर्जना होती त्या ...
सर्वांनाच आधीपासून आपला मिळालाच ...
पाहिजेत अशी घोषणा समाज ...
क मान्य केले असून त्या दृष्टीनें
देशाचे प्रयत्न प्रत्येक लोकशाही
महत्वाच्या गोष्टीचा उगम रशिया ...
या गोष्टी भारतात आल्या असें ...
उगम आमच्या अध्यात्मशास्त्रातून ...
मिळाला असल्यामुळे समाज ...
नाही. कारण मानवी जीवनाच्या ...
महात्मा गांधी, विवेकानंद आदि ...
असें दिसत नाही. ही जाणीव ...
ही वेगवेगळी नव्हेत हे पटवून ...
मार्गात पहिली घोषणा शिर्डीच्या ...
अध्यात्मिक वातावरणात व त्यापैकी ...
त्याही ध्यानांत नी फारशी आली ...
जे बोलले तें एकाद्या राजकीय व्या...
बोलबाला झाला असता. अध्यात्म ...
आणि बहुसंख्य लोक समजात अध्या...
दुर्लक्ष केले जाते. तसेच याही कार्यक्...

### मानव धर्माची शिकवण

१९ व्या अध्यायामध्यें बाबांनी
कृष्णाबाईच्या घरावर बाबाना नेवद्या
बद्दल बाबांनीं त्याला दोन रुपये ...

# श्री हरी तुष्टेल

लेखक—श्री. द. शं. टिपणीस

श्री साईसच्चरित्रात जे काही महत्वाचे अध्याय आहेत त्यात अ. १९ वा हा एक आहे. त्यात बाबानी श्री साईचरित्रकार दाभोळकर यांच्यावर अनुग्रह केल्याची हकिकत आहे. अनुग्रहाच्या अनुरोधाने बाबानी जो उपदेश केला आहे तो अध्यात्मिक दृष्टया मोलाचा तर आहेच पण सामाजिक दृष्टयाही नितकाच मोलाचा आहे. समाजवाद हा १९२० नंतर जगात पसरत आला. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ही लोकमान्यांची गर्जना होती त्या नंतर श्रमाचा मोबदला, पिण्याचे पाणी, मुबलक अन्न, थंडीवाऱ्यापासून आसरा मिळणें हे मानवाचे जन्मसिद्ध हक्क आहेत व ते प्रत्येकास मिळाले पाहिजेत अशी घोषणा समाजवादानें केली. जगातील लोकशाही राष्ट्रांनीं हे हक्क मान्य केले असून त्या दृष्टीनें आपल्या जनतेला सुखसोयी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न प्रत्येक लोकशाही राज्याचे चालू आहेत. समाजवादातील या महत्वाच्या गोष्टींचा उगम रशिया वा पाश्चिमात्य राष्ट्रात प्रथम झाला व तेथून मग ह्या गोष्टी भारतात आल्या असें आम्ही समजतों, परंतु भारतीय समाजवादाचा उगम आमच्या अध्यात्मशास्त्राइतका जुना आहे. अध्यात्मशास्त्रांत हा समाजवाद मिसळला असल्यामुळे समाज राजकारण करणाऱ्या मंडळीचें त्याकडे फारसें लक्ष गेले नाही. कारण मानवी जीवनाचा अध्यात्म हा पाया आहे. याची जाणीव टागोर, महात्मा गांधी, विवेकानंद आदि भारतीयांखेरीज इतर कोणास फारशी झाली आहे असे दिसत नाही ही जाणीव करून देण्यासाठी आणि अध्यात्म व दैनंदीन जीवन ही वेगवेगळी नव्हेत हे पटवून देण्यासाठी मानवाच्या वरील मूलभूत हक्कांची स्पष्ट भाषेंत पहिली घोषणा शिर्डीच्या मशिदीतील फकिराच्या तोंडून जाहीर झाली. अध्यात्मिक वातावरणात व भाषेत ती असल्यामुळें इतरांचे तर राहोच पण साईभक्तांच्याही ध्यानात ती फारशी आली नाहीं. त्यावेळीं दाभोळकरांना उपदेश करताना बाबा जे बोलले तें एकाद्या राजकीय व्यासपीठावरुन जर बोलले असते तर त्याचा बराच बोलबाला झाला असता. अध्यात्म म्हणजे फावल्या वेळचा वेळ दवडण्याचा एक खेळ असेच बहुसंख्य लोक समजत असल्यामुळें अध्यात्मातील महत्वाच्या गोष्टींकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते. तसेंच याही बाबतींत झालें आहे. असो.

## मानव धर्माची शिकवण

१९ व्या अध्यायामध्यें बाबांची एक लहानशी लीला वर्णन केली आहे. राधाकृष्णाबाईच्या घरावर बाबाना चढण्यासाठीं एकानें आपली शिडी दिली. या कामगिरी बद्दल बाबांनीं त्याला दोन रुपये दिले. तेथें जमलेल्या भक्त मंडळींना केवळ शिडी

लावल्याबद्दल एवढी मजुरी बाबानी द्यावी याचें आश्चर्य वाटलें; एवढेंच नव्हे तर व्यवहारात बाबा म्हणजे अगदींच भोळे दिसतात असेंही त्याच्या मनात आलें. परंतु बाबाची करणी बाबाना ठावी. भक्ताना त्यातील इंगीत काय कळणार ? समाजवादातील एका तत्त्वाची जाणीव आपल्या भक्ताना देऊन त्यानीं एकमेकाशी व्यवहार करताना कसे वागावें व मानव धर्माचें पालन करून अध्यात्म कसा वाढवावा हें बाबाच्या मनातून आपल्या भक्ताना शिकवावयाचें होतें. भक्ताच्या मनांतील शंका बाबाना न सांगतांहि समजल्या होत्या. पण बाबा कांही बोलले नाहींत. शेवटीं एकानें धीर करून "बाबा, एवढे पैसे निसणवाल्यास कशासाठीं दिलेत ?" असें विचारलें. तेव्हा बाबा म्हणाले,

कोणाही पासून घ्यावें काम । परी जाणावे तयाचे श्रम ।
लावावा जीवास ऐसा नियम । फुकट परिश्रम घेऊ नये ।। अ १९–२४७

समाजात आपल्या भक्तांनीं कसें वागावें याचा उल्लेख बाबानी वेळोवेळीं केला आहे. माणुसकी असेल तो माणूस, वास्तव माणुसकीचें जतन आपल्या भक्तांनीं केलें पाहिजे असें बाबाना वाटतें. म्हणून ज्या योगे माणुसकी राखली जाईल त्या गोष्टी रोजच्या व्यवहारांत आपण केल्या पाहिजेत असें त्याचें म्हणणे आहे. अशा एका गोष्टीचा उल्लेख वरील उत्तरात आहे. सामाजिक वा कौटुंबिक व्यवहारात एकमेकाची एकमेकास हरघडी जरूरी पडते. मदत लागते. अशी मदत जरूर घ्यावी. पण ती फुकट घेऊ नये. तिचा मोबदला द्यावा. हा मोबदला म्हणजे पैसाच द्यावा असें समजू नये. आजकाल सर्व व्यवहार पैशावर येऊन बसल्यामुळें आपण मोबदला पैशाच्या रुपात मापत असतो व जगालाहि तो मान्य असतो. कोणी आपली बेअब्रु केल्यास आपण ती पैशानें (नुकसान भरपाई) पुन्हां सांधू शकतो अशी आजची विचारसरणी आहे. तसें खरोखर होत असेल तर पैसा देऊन ऋणांतून मुक्त होणें योग्यच ठरेल. परंतु प्रत्येकवेळीं असें होईलच याची खात्री नाहीं. अध्यात्म शास्त्रातील कर्मनियमाप्रमाणें जें व्हायचें तें होईल. प्रत्येक श्रमाचा मोबदला पैशानेंच पुरा करता येईल असें नाही. अशावेळीं अन्य रुपानें मोबदला द्यावा. आईवडिलाच्या श्रमाचा वा कष्टाचा मोबदला मुलाला केवळ पैशानें देतां येत नाही. तर त्याच्यासंबधीं आपलीं कर्तव्यें चोख रीतीनें पार पाडल्यानें त्याचे ऋण फिटतें. कित्येक उदार मनाचे लोक श्रमाचा मोबदला घेत नाहीत. अशावेळीं श्रमाचा मोबदला श्रमानें द्यावा. वेळप्रसंग साधून त्याची चार कामें करून द्यावींत. साराश एवढाच कीं फुकट श्रम घेऊ नयेत. कोणत्याहि रुपानें का होईना पण त्याचा मोबदला द्यावा. दुसऱ्याचें आपण श्रम घेतो म्हणजे त्याचीं शक्ति, कौशल्य आपण वापरतो. ही त्याला देवानें दिलेली आहेत. त्याचा मोबदला दिला नाही तर अपहरणाचा दोष आपणांस लागेल. आपलें कर्म आपल्या पाठीं सदैव राहिल व कर्मनियती आपलें नुकसान करून त्याच्या श्रमाची भरपाई या ना त्या जन्मीं करून घेईल. या सर्व गोष्टीकडे आपल्या भक्तांचें लक्ष वेधण्यासाठीं बाबांनीं दोन रुपये काढून सर्वादेखत निसणवाल्यास दिले.

## व्यवहार व अध्यात्म

मानवता म्हणजे काय याची बरोबर व्याख्या करणे कठीण आहे. एखादी व्याख्या केलीच तर तीवरून सर्वसाधारण जनतेला अर्थबोध होईलच याची खात्री देता येत नाहीं. कारण जें आपण नेहमी पहातो, ज्याच्याशी आपला परिचय असतो ते आपण जाणू शकतो. रोजच्या व्यवहारात मानवता पूर्णांशानें आपल्या पहाण्यात येत नाहीं कारण व्यवहारामुळें तिला मुरड पडलेली असते. ज्या ठिकाणी मानवता पूर्णांशाने आपण पाहूं शकूं अशी ठिकाणे म्हणजे साधुसंतांची, त्यांच्या ठिकाणी मानवता पूर्णपणें असते. ती त्यांच्या हरएक व्यवहारात, नित्याच्या वागणुकींत दिसून येते. परंतु असली वागणूक व्यवहारात, या संसारांत अशक्य समजून कौतुक करण्यापलीकडे तिकडे विशेष लक्ष दिलें जात नाहीं. व्यवहार व अध्यात्म दोन्ही एकत्र असणें अशक्य ही आमची कल्पना इतकी दृढ झाली आहे कीं जनार्दन, एकनाथ यांसारखे अनेक साधुसंत या भारतात होऊनही आमची समजूत पटत नाहीं. वास्तव मानवतेची कल्पना येण्यास विरोध अधिक उपयोगी पडेल असें वाटतें. पांढऱ्या शेजारीं काळा रंग आल्यास पांढरा रंग डोळ्याना चटकन दिसतो. वास्तव मानवतेचें विरोधी टोक रानटीपणा म्हणजे काय हें समजल्यास मानवतेची कल्पना येणे सुलभ जाईल, रानटीपणा, क्रूरपणा, खुनशीपणा, स्वार्थ आदि तमोगुणाची कल्हना आपणास असते. कारण व्यवहारात हरघडी या गोष्टी आपल्या प्रत्ययास येत असतात. या गोष्टीचा पूर्ण लोप म्हणजे मानवता होय. जगात मानवतेचा प्रसार करण्यापेक्षा रानटीपणा, क्रूरपणा वगैरे तमोगुणाचा लोप करणे अधिक बरें. अज्ञानाचा नाश म्हणजे ज्ञानाचा उदय तसेंच या गुणाचा लोप म्हणजेच मानवतेचा उदय होय. माणसाच्या ठिकाणी मानवता उपजच असते. परंतु परिस्थितीमुळें रानटीपणा, क्रुरपणा, स्वार्थ आदि तमोगुण बळावून मानवतेचा लोप होतो. शरीर धारणेस जरूर त्या नैसर्गिक गोष्टी माणसाला मिळाल्या नाहींत. तर मग तो त्या गोष्टी बऱ्या वाईट कोणत्याही मार्गांनें मिळविण्याचा प्रयत्न करतो. चांगला मार्ग खुंटला की तो वाम मार्गाकडे वळतो. पोटाला अन्न पाहिजे. त्याशिवाय रहाण्यास कोणीहि तयार नाहीं कारण प्रत्येकास जगण्याची दुर्दम इच्छा असतेच असते. चांगल्या मार्गानें पोटास न मिळाल्यास वाटेल त्या मार्गानें तें मिळविण्याचा माणूस उद्योग करतो व वाईट मार्गास लागतो व सर्व प्रकारच्या दुर्गुणाच्या तडाख्यात सापडतो. त्यात त्या व्यक्तीचा दोष नसून परिस्थितीचा समाजाचा हा दोष आहे. वेळीच त्याला चार घास मिळते तर तो वाम मार्गाकडे वळताना. असाच प्रकार जीवधारणेस नैसर्गिकरित्या जरूर असलेल्या सर्व गोष्टीसंबंधी होत असल्यामुळें अशी परिस्थिती येऊं नये व असल्यास तिची तीव्रता कमी व्हावी म्हणून बाबानी आध्यात्मिक भाषेत आपल्या भक्ताना मार्ग दाखविला आहे. अध्यात्म हा क्रीयाशील असल्यामुळें प्रत्येक व्यक्तीनें कृति ही करावयास पाहिजेच. म्हणून बाबांच्या या मार्गांत नुसता निषेध, ठराव वा योजना नाहींत. बाबा अगदीं सरळ व साध्या भाषेत—

आल्या गेल्याचा आदर करीं । तृषिता जल भुके-या भाकरी ।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी । देता श्रीहरी तुष्टेल ॥ अ. १९–१४२

## मानवाच्या हकाचें पालन

असे सांगून मानवाच्या मूलभूत हकांचे पालन आपल्या प्रत्येक भक्तानें करावें असे मार्गदर्शन करतात. मानवतेची वागणूक कशी असावी याचे दिग्दर्शन वरीलप्रमाणें बाबांनीं केले आहे. आपल्या घरी येणाऱ्या जाणाऱ्याचा आदर करावा. त्याची विचार पूस करावी. आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचे आदरातिथ्य करावे विनय व नम्रता दाखवावी भाषा गोड असावी. पुष्कळांना या बिन खर्चाच्या न श्रमाच्या साध्या गोष्टीही करता येत नाहींत असा अनुभव येतो. पुष्कळ वेळेला 'या, बसा' ऐवजी 'का हो आज इकडे कसे काय चुकलात ?' 'आज इकडेसे ?' असा टोलाच मिळावयाचा. नाहींतर दुसऱ्या एखाद्या कुत्सीत प्रश्नानें स्वागत व्हावयाचें. हा रानटीपणा आहे. पारमार्थिक वा सामाजीक व्यवहारात कलह उत्पन्न करणारा आहे. यास्तव त्याज्य आहे.

आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. मग आपला एकादा बंधु तहानेनें वा भूकेने तळमळत असलेला आपणास पहावेल काय ? ती माणुसकी होईल काय ? म्हणून दुसऱ्याची तहानभूक शमविण्यास आपणास शक्य असेल तें आपण केलें पाहिजे. निराश्रिताना आश्रय दिला पाहिजे. या गोष्टी सामाजिक आहेत असे म्हणून भक्तांनीं त्या दृष्टीआड करू नयेत. या गोष्टींचा परमार्थाशींही संबंध आहे याची जाणीव 'श्रीहरी तुष्टेल' असे सांगून बाबा आपणास देत आहेत. वास्तविक सामाजिक वा पारमार्थीक असें काहीं दोन स्वतंत्र डबे नाहीत कीं एका डब्यातील माणसानें दुसऱ्या डब्यातील माणसाकडे ढुकूनही पाहू नये. मानवधर्म हा समाजाला सोडून दुसऱ्या कोठें एकटा राहू शकत नाहीं. बाबानी आपलें लक्ष केवळ पारमार्थीक गोष्टीकडे न देता अधून मधून सामाजिक व कौटुंबीक जीवनाकडेही दिले आहे. कारण नानातऱ्हेच्या धाग्यानीं मानवी जीवनपट विणला गेला आहे. यास्तव देवळात एक व समाजात एक अशा गोष्टी बाबाना चालत नाहीत.

---


## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ ( त्रैमासिक ) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ ( मासिक ) मार्चपर्यंतचे कांहीं अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास ( विशेष अंकासह ) प्रत्येकी ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठी पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

श्री साईनाथ वाचनालय, शिर्डी

# चित्तशुद्धि कशी साधावी ?

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥
विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥
दुःख तें देईल सर्व सुखफळ । होतील शीतल अग्निज्वाळा ॥ ३ ॥
आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळ अंतरीं एकभाव ॥ ४ ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजे ते येणें अनुभवें ॥ ५ ॥

ह्या अभंगाचा अर्थ सोपा आहे. ज्याचें चित्त शुद्ध आहे त्याचे शत्रु मित्र होतात, त्याला वाघ खात नाहीं व सर्प दंश करीत नाहीं, फार तर काय, त्याला विष अमृततुल्य होतें आणि अग्निज्वाळा शीतळ होतात, तसेच आघातहि हितकर होतात. तुकारामबावाच्या चरित्रांतील या उक्तींचा प्रसंग सर्वांस श्रुत असेल. तुकारामबावाचा रामेश्वरभट्ट नावाचा एक छळक होता. तो विहिरीवर स्नानास गेला असता, त्याच्या अंगाचा दुःसह दाह झाला आणि फोड उठले. तेव्हा हें काय झालें असें वाटून ह्या विवचनेंत, ज्ञानोबारायाला भेटण्याकरिता तो आळंदीस गेला, तेव्हा त्याला 'तूं देहूस तुकारामबावाकडेस जा. ते परिहार करितील' असा दृष्टांत झाला. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर त्याचा दाह शांत करण्यास या अभंगातील उक्ति कारणीभूत झाली. असा ह्या अभंगातील प्रसंग आहे.

ही आख्यायिका कोणास सत्य वाटो वा न वाटो, पण अभंगातील प्रमेय आपणा सर्वांस अत्यंत विचारणीय आहे. आपणांस ठाऊक आहे की, आपण ह्या स्थितींत असताना ज्याला शत्रु नाहींत असा एकही प्राणी मिळावयाचा नाहीं. मित्र पुष्कळ असले, तरी ज्याला शत्रु मुळींच नाहींत, असा मनुष्य आपणास आढळणार नाहीं. प्रत्येकास विचारलें की, तुला मित्र फार आहेत काय, तर मित्र म्हणविणारे पुष्कळ असले, तरी प्रसंगास उपयोगी पडणारे असे फारसे नाहीत, असें उत्तर मिळतें. तेच त्याला शत्रु आहेत काय ? असे पुसलें, तर तो राजकारणी असो, रोजगारी असो, व्यापारी असो वा मजूरी करणारा असो, श्रीमंत असो वा गरीब कंगाल असो, सज्ञान असो वा अज्ञान असो, लहान असो वा मोठा असो, प्रत्येकाची रड अशीच असते की, हें जग माझ्या शत्रूंनी भरलेले आहे. घरींदारीं, धंदेरोजगारांत सर्वांस हाच अनुभव असतो. त्याअर्थी शत्रु म्हणजे काय, हें कोणास सांगावयास नको आहे. मित्रापेक्षा शत्रु अधिक, हा सामान्य अनुभव असला, तथापि कदाचित् शत्रूही मित्र होतील. कारण, शत्रु झाले तरी ते मनुष्यच आहेत, आणि एकाद्या मनुष्याशी शत्रुत्व असलें, तरी तो प्रसंगविशेषीं आपलें हित करील, हें म्हणणें संभवेल, पण, पुढल्या चरणांत ज्या मनुष्याचें चित्त शुद्ध असतें त्याला वाघ खात नाहींत, सर्प दंश

करीत नाहीत, विष अमृत होतें, अग्निज्वाला शीतल वाटतात, कोणी आघात केला असता तो हितकर होतो, आणि दुःख दिलें असता सुखप्राप्ति होते, असे तुकारामबाबांनीं रामेश्वरभट्टास सांगितलें. व तो अंगास होणाऱ्या दाहानें त्रस्त झाला होता, तरी हें ऐकून त्याला शांतता प्राप्त झाली, आणि या अभंगातील उक्तीची सत्यता त्याच्या प्रतीतीस आली अशी कथा आहे. तरी ती सांगण्यापैकीं आहे, कीं अनुभवाची आहे, हा प्रश्न सहज निघण्यासारखा आहे. पण ही कविता आहे. शास्त्रातील निर्णय अथवा वचन नाही, एवढा भाग ध्यानांत ठेवून तिजमधील प्रमेयाचा आपण विचार केला, तर हा अभंग निरंतर आपल्या कंठी बांधून ठेवावा इतकी त्याची मातब्बरी आपणास वाटेल. जुन्या विचाराचें वैष्णव तुळशीच्या मण्याची माळ अगर कंठी आपल्या गळ्यांत घालीत असतात. आपणही वैष्णव आहोत, परंतु आपणास तुळशीची माळ अगर कंठी घालणें जमत नाही. म्हणून तिच्याऐवजी हा अभंग निरंतर आपण गायिला व आपल्या हृदयांत ठेविला, तर त्यातील प्रमेय आपणास अत्यंत हितकर होईल, इतकेंच नव्हे, तर ह्या ठिकाणीं आपणास जो अर्थ साध्य करावयाचा आहे याचें हा अभंग उत्तम साधन आहे, असा आपणास प्रत्यक्ष अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

तेव्हा शत्रु मित्र कसे होतात तें आपण पाहू या. जर आपलें चित्त शुद्ध आहे, आपल्या ठिकाणी काहीं किल्मिष नाहीं, दुसऱ्याचा मत्सर नाहीं, दुसऱ्याविषयी हेवा नाही, आपल्या अंतःकरणांत काम, क्रोध, लोभ इत्यादिकांची उचबळ नाही, तर शत्रु मित्र होतील, हें सांगण्यास ठीक दिसतें, पण, तें अनुभवास पटत नाहीं असा आक्षेप कोणी घेतला व त्याचा आपण विचार केला, तर वरील अनुभव घेण्यास जो अधिकार आपल्या अंगीं पाहिजे, तो वसत नाहीं, हेंच मुख्य कारण ही गोष्ट अनुभवास न पटण्याचें आहे, असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. आपण आपल्या स्वतःच्या प्रयत्नानें अशा प्रकारची चित्तशुद्धि करू म्हटलें, तर तसें होणें कठीण आहे. परंतु जें सामर्थ्य परमेश्वराने आपल्या अंगी ठेविलें आहे, त्याचा आपण उपयोग केला आणि आपले यत्न सफळ होण्यासाठी देवाची करुणा भाकिली, तर आपल्या सामर्थ्यानें, प्रयत्नानें आणि देवाच्या साहाय्याने आपल्या ठिकाणीं अशी योग्यता येईल कीं, शत्रुमित्र होतील, व हें म्हणणें केवळ कवितेंतील अतिशयोक्ति नसून, त्यांत पुष्कळ सत्यांश आहे, अशी आपली खात्री होईल. शत्रु मित्र होतात म्हणजे त्याचें शत्रुत्व नष्ट होतें असें म्हणण्याचा तुकारामबावाचा हेतु नाही. आपणास पुष्कळ प्रसंगी असा अनुभव येतो की, जर आपले मन शुद्ध आहे आणि आपण दुसऱ्या कोणाचे वाईट चिंतीत नाही, तर आपलें आपल्या शत्रूकडूनही अनहित होणार नाहीं. ते आपलें वाईट चिंतणार नाहीत, अथवा चिंतीत असले, तरी ती चिंतना सोडून देतील असें नव्हे. शत्रु मित्र होतात असें सांगण्यांत साधुजनांचा मुख्य उद्देश हा आहे की, जें कार्य मित्रापासून व्हावें, अशी आपण आशा करितो, तें शत्रूंकडून होत असतें.

मित्राची अपेक्षा आपण कां करितो, तर आपणास साहाय्य व्हावें, आपणावर कांहीं अरिष्ट आलें असता त्याच्या मदतीनें त्यापासून आपली मुक्तता व्हावी. हें काम मित्रांचें

आहे, तरी पण तें शत्रूपासून होऊन आपणास मित्रांप्रमाणें त्याचा लाभ होतो. या अर्थानें शत्रु मित्र होतात, असेंच म्हणण्याचा भाग नाही. अथवा आपलें मन दुसऱ्याविषयीं शुद्ध असलें, तर दुसऱ्याचें मन आपणाविषयीं शुद्ध होतें, असा जो भाग पुष्कळांच्या अनुभवामध्यें येतो, तोही सांगण्याचा तुकारामबाबाचा हेतु नाही. आपलें चित्त शुद्ध असलें, तर ज्याना शत्रु म्हणून आपण समजतो, त्याच्यापासून मित्रपणाचें तर काय, पण याहीपेक्षा जास्त कार्य करून घेता येते, मित्राच्या साहाय्यापासून जी आपल्या आचारविचाराची सुधारणा व्हावी, आपणांस उन्नति प्राप्त व्हावी ती आपले मन शुद्ध असलें, तर आपणांस शत्रूपासूनही होत असते, हाच तुकारामबाबांच्या उक्तीचा मतलब आहे. 'निंदकाचें घर असावें शेजारी' असें म्हणून तुकारामबाबासारखे साधु निंदकास चहातात. तें का? तर जे दोष मित्राकडून दाखविले जाणे शक्य नाहीं, ते निंदक दाखवितात व या प्रकारें ते आपल्या उन्नतीस कारणीभूत होतात. आपल्या शत्रूनें आपली अवहेलना व विटंबना केली, तर आपले डोळे उघडून आपली सुधारणा होण्याचे बाबतींत मित्रापेक्षा शत्रूकडून अधिक हितकर कार्य होते. मात्र सर्व बाजूनीं शांतपणें विचार करण्याची सवय लावून घेतलेली असली पाहिजे. या अर्थानें 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती' या उक्तीचे प्रमेय आपणास चांगले समजेल व ह्या स्थितीचा आपणास अनुभवही येईल. तसेंच आपणास शत्रु कां असावेत ह्याचा आपापल्या ठिकाणी विचार करण्याकडे प्रत्येकाची प्रवृत्ति होईल.

आपणास शत्रु का असावे, याचा ज्याचा त्याने विचार केला असता, मी यःकश्चित् प्राणी, माझ्यासारखे असंख्य या लोकीं येतात जातात; जशी शत्रूची तशी माझीहि शाश्वती नाही, साधुसंत आपला खरा लाभ जो सांगतात तो आपणास मान्य करून घ्यावयाचा आहे, या गोष्टी प्रत्येकाच्या लक्षात याव्या, असे असून शेजारी-पाजारी, भाऊबंद ह्याच्याशी तर काय पण सख्ख्या बंधूबंधूमध्यें देखील तटे होतात, आणि त्याच्यामध्यें एकदा बेबनाव झाला, की परिणामीं त्याचें पटत नाहींसें होऊन एकाचें तोंड पूर्वेस, तर दुसऱ्याचें पश्चिमेकडेस, असा प्रकार होतो. प्रत्येकाला असे वाटत असते की, माझ्या ठिकाणी काही दोष नाहीं, मी काय करावयाचें तें केलें; माझ्या हातून प्रमाद झालेला नाहीं; दोष दुसऱ्या मनुष्याचा आहे. हे दुष्ट आहेत, ते सर्प आहेत. सर्पाला दूद पाजिलें तरी तें विष होते, तद्वत् त्याच्याशीं कितीही चांगल्या रीतीने मी वागलों, तरी ते विषबुद्धि सोडावयाचे नाहींत, तसाच तो वाघ आहे; आपला हिंस्रपणा सोडणार नाहीं, असे आपण नेहमी म्हणतो. याच्या उलट आपले दोष लोकांत तोंडानें ते बोलून दाखवीत नाहींत, अशी अनेक तऱ्हेची माणसें आहेत, पण आपल्या अंगीं दोष आहेत असे मानावयास आपलें मन घेत नाही. एकाद्या स्नेह्यानेंहि आपला दोष दाखवून दिला असता बाहेरून आनंद वाटल्यासारखें आपण दाखवितो; तरी मनातली बुद्धि अशी असते की, मी शुद्ध आहे, सज्जन आहे; दुसरे दुर्जन आहेत, सर्व जग अशुद्ध आहे. याच समजुतीनें आपण मित्रवर्ग कमी करीत असतों व

शत्रुवर्ग वाढवीत असतो. वास्तविक पाहता आपणास वाटतें तितके आपले अनिष्ट करणारे आपले शत्रु नसतात. आपणास येथे पांच पन्नास वर्षे फार तर राहावयाचे आहे; कधीं कोणास देवाचें बोलावणें येईल याचा नियम नाहीं, तिकीट आपलें म्हणजे गाडींतून उतरून कधीं चालतें व्हावें लागेल याचा भरवसा नाहीं. असे असून परस्परामध्यें वैमनस्य असतें, याचें कारण हेंच आहे कीं जो तो स्वतःस निर्दोषी, पापभीरु मानीत असतो, व बाकीचे दुष्ट, व्यर्थ आपला मत्सर आणि हेवा करणारे आहेत, अशी आपल्या मनाची समजूत करून घेत असतो, पण ही समजूत खरी नाहीं. वस्तुस्थिति अन्यथा असते. आपण चांगले असलों, तर जगही आपणाशी कांहीं वाईट नसते, हा पहिला प्रकार झाला. दुसरें, जगांत विनाकारण कोणाचा कोणी दावा करीतच नसतो, असा परमावधीचा सिद्धांत करणे यथार्थ होणार नाहीं, तथापि मी दुसऱ्याचा दावा करीत नाहीं; मी त्याच्याशीं सरळ भावानें वागतों, तथापि दुसरे लोक माझ्याशी सरळ रीतीनें वागत नाहीत, ते मनामध्ये कांहीं तरी दावा धरून चालतात, अर्थात् इतराकडे दोष आहे, असा आपण आरोप करितों, हीच मोठी चुकी होत असते. मी शुद्ध नाहीं; माझ्या ठिकाणी पापवासना, दंभ, दुसऱ्याचा मत्सर, हेवा इत्यादि किल्मिषें आहेत असें समजून, जर आपण शत्रूकडे शुद्ध चित्तानें पाहूं लागलों, तर आपणास असा अनुभव येईल की, ज्यास आपण शत्रु समजतो ते शत्रू नसून मित्र आहेत. या दृष्टीनें पाहिलं असता आपणास शत्रु फार करून राहणार नाहीत, अथवा दुष्टपणामुळें किंवा पूर्वचरित्रातील कारणामुळें यदाकदाचित् थोडे राहिले, तरी ते मित्रकार्य करणारे होतील. म्हणजे त्यापासून आपलें कल्याण, आपली उन्नति व आपला लाभ होईल. स्वतःस चांगला व निर्दोष मानण्याची चुकी न करितां जर आपण दुसऱ्याकडेस शुद्ध मनानें पाहिलें, तर 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती' या वचनाची सत्यता किती आहे याचा संपूर्ण आपणास अवश्यमेव अनुभव येईल, असें जरी नाही, तरी प्रत्येकानें जगाकडेस त्या दृष्टीनें पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्व जग आपणाशी विष्ट करितें असें मानणें, हा कोत्या दृष्टीचा भाग आहे, शत्रु वाटतो तो मित्र करणें, म्हणजे त्याकडून मित्राचा कार्यभाग करून घेणें, हें आपलें मुख्य काम आहे.

आतां हे शत्रु सर्पवत् वा व्याघ्रवत् असतात, म्हणजे पाठीमागून जिभेने मारणारे अथवा तोंडावर मारणारे असतात. शत्रूला सर्पाची उपमा दिली आहे, कारण, तो पाठीमागून निंदारूप दंश करितो. जो तोंडावर आपले दोष बोलून दाखवितो तो व्याघ्रवत् समजावा. 'व्याघ्रही न खाती सर्प तया' असें म्हटलें आहे, तें वाघाच्या व सर्पाच्या स्वभावाच्या अशा मनुष्यास उद्देशून आहे. चित्त शुद्ध असलें, तर वाघ खात नाहीं आणि सर्प दंश करीत नाही, याचा अर्थ अक्षरशः चित्त शुद्ध आहे अशा मनुष्यास वाघापुढे उभा केला असतां, तो त्याला खात नाही, अथवा अशा मनुष्यास सर्प दंश करीत नाहींत असा समजूं नये. आपली चुकी अथवा आगळीक नाहीं, आपण

कोणाची चुगली, निंदा किंवा दावा करीत नाहीं असें असून जर कोणी आपला द्वेष, आपली निंदा करील, तर त्यापासून आपलें अनहित न होता अत्यंत हितच होईल. आपण कितीहि कडक आत्मपरीक्षण केलें, आपल्या स्वतःस छेडले तरी आपल्या अंगातील व्यंग आपणास पूर्णपणे दिसून येणे अशक्यच म्हटले असता चालेल. परीटापासून जशी छान होते, तशी आपली आपण करू म्हटले असता होत नाहीं, त्याप्रमाणें शत्रूच्या आगीनें व आघातानें आपल्या अंगातील दोषाची छान होणें शक्य आहे. हें लक्षात ठेवून शत्रु मित्र कसे होतात याचा अनुभव प्रत्येकानें आपल्या ठिकाणी पाहून घ्यावा. आपले चित्त शुद्ध करण्याविषयी आपणातून प्रत्येकानें आपली पराकाष्ठा करून पहावी, म्हणजे शत्रूच नाहीसे होतात. अथवा राहिले तरी त्याच्या हातून मित्रकार्य कसें होतें आणि व्याघ्रासारख्या हिंस्र अथवा घातक स्वभावाच्या व सर्पा-सारख्या मागून दंश करणाऱ्या शत्रूपासूनहि अनहित किंवा नुकसान कसें होणार नाही, याचा त्याला अनुभव येईल, व आपण जे कार्य हातीं घेतलें आहे त्याला बळकटी येईल.

आपण चित्त शुद्ध केलें, तर जें कार्य मित्रापासून होणारें आहे तें शत्रूकडूनही करून घेता येईल आणि व्याघ्रवत् अथवा सर्पवत् असणाऱ्या शत्रूपासून आपलें अहित न होता कल्याणच होईल या गोष्टी संभवनीय आहेत. पण, 'विष ते अमृत' म्हटलें आहे तें कसे होईल? होय; विषही अमृत होऊं शकेल. परंतु या गोष्टीची कल्पनाही करणें कठीण आहे; कारण देहाचा अत्यंत दाह करणें. आणि त्यापासून परिणामीं शरीराचा नाश, हें विषाचें कार्य आहे. सृष्टीमध्यें सर्पाचें विष, साथीच्या रोगाचें विष वगैरे अनेक प्रकारची जलाल विषें आहेत; आणि सामान्य अनुभवावरून आपणास असें वाटतें, कीं सापाच्या विषापेक्षा अधिक जहालिम वीष दुसरें कोणतें नाहीं. परंतु त्याच्यापेक्षाही जलाल विष आहे तें मनुष्याच्या ठिकाणीं आहे, आणि कोठें म्हणाल, तर तुमच्या आमच्या जिभेच्या टोंकाशी तें असतें. विंचवाच्या नांगीत दुःसह वेग उत्पन्न करणारें विष असतें, त्यापेक्षाहीं जहालिम वीष आपल्या जिव्हेच्या अग्रात आहे. हें विष इतकें जलाल आहे कीं, तें पृथ्वीचा प्रलय करून टाकू शकेल, आणि त्याच्यापुढे दुसरीं सर्व विषें पत्करतील. पुराणातरी असें म्हटलें आहे कीं, समुद्राच्या पोटात अत्यंत जहाल असें हलाहल विष होतें, आणि समुद्रमंथन करून तें बाहेर काढल्यावर त्याच्या भडक्यानें विश्व दग्ध होईल या भीतीनें शंकरानें तें प्राशन केलें. हा कथाभाग कांहींहि असो, पण, प्रत्येकाला आपल्या ठिकाणी विष आहे याचे भान नसतें. शंकर अत्यंत शांत व भोळा अवतार मानिला आहे, आणि विश्वाला जाळून टाकणारें विष प्राशन केल्यामुळें त्याची महती वाढवली आहे; या गोष्टी लक्षात आणल्या असता, जें हलाहल विष सांबानें प्राशन केले असें म्हटलें आहे, तें मनुष्याच्या जिव्हेंतलेंच असावें असें वाटतें. पण, या पौराणिक गोष्टीच्या संबंधानें कांहीं विशेष सांगावयाचें आहे असें नाहीं. आपल्या ठिकाणी जें प्रत्यक्ष

विष दिसतें त्याविषयीं बोलावयाचें आहे, आणि तें अमृत होऊं शकेल कीं काय, हें पहावयाचें आहे. आपली जिव्हा मृदुवचनी केली, आणि तिजमधून निघणारा शब्दरूप रस आल्हाद देणारा व्हावा अशी आपली वाणी झाली, तर विषाचें अमृत करण्याचें सामर्थ्य तुकारामबावांनी म्हटल्याप्रमाणें तुम्हा आम्हांपैकीं प्रत्येकामध्यें आहे असें वाटेल. आपणास असें ठाऊक आहे कीं, प्रसंग आला असता एका कटु शब्दानें घोर युद्धें माजतात, एका गोष्टीनें सर्व घडी बिघडते, आणि मनुष्यवाणीच्या विषामुळें मोठमोठ्या राज्यामध्यें नानाप्रकारचे अनर्थ ओढवतात. विषतुल्य कटु शब्दानें दुसऱ्याचें काळीज करपून जातें व आपला त्याचा संबंध तुटतो, तोच शब्द आपण गोड बोललों, तीच गोष्ट एखाद्याला आपण कठोर व दुष्ट वाणीनें न सांगता अमृतासारख्या गोड व मृदु वाणीनें सांगितली तर द्वेषभाव दूर होऊन आपण संबंध जोडतों. सापाच्या विषाचें प्रमाण करता येतें, परंतु मनुष्याच्या जिव्हेंत जें विष आहे त्याचें मोजमाप करिता येत नाहीं. म्हणून 'विष तें अमृत आघात तें हित' या वरील अभंगातील चरणात तुकारामबावांनी सांगितलेल्या गुरुमंत्राला मोल नाहीं. ( आपलें चित्त शुद्ध नसतें, म्हणून आपल्या मनात जें वेड कायम होऊन बसलेलें असतें व कुत्सीत कल्पना भरलेल्या असतात त्या सर्व त्रतस्थ मित्राच्या मध्यस्तीनेंच दूर होतात; त्याविना होत नसतें. ) या उपदेशाप्रमाणें आपण वागलो आणि आपल्या जिभेंतील विष कमी करून अमृत वाढविलें, तर हा मृत्युलोक अमर लोक होण्यास विलंब लागेल असें नाहीं. या एका अभंगाचा उपदेश घेऊन आपणास त्याप्रमाणें वागण्यास कोणी उदाहरण घालून देईल, तर यातील सार अमूल्य आहे.

आपलें चित्त शुद्ध करावें तें एकीकडेच सोडून दुसऱ्याची चित्तशुद्धि करण्याच्या पंचाइतींत आपण पडत असतो हीच चुका होत असते. तुमचें चित्त शुद्ध असल्यानें अशुद्ध विचाराच्या लोकाकडून तुमचें अकल्याण व्हावयाचें नाहीं, कल्याणच होईल आपणास प्रतिकूळ वाटणाऱ्या कृतीचा परिणाम हितावह व श्रेयस्कर होईल. कोणी शरीरास दुःख केलें असता त्यापासून पीडा होते, हें तर खरेंच आहे. तसेंच कोणी आपणास पाठीवर काठीनें मारलें असता काठीचे वळ उठावयाचे नाहीत, किंवा कोणीं डंवचल्यापासून आपणास लागावयाचें नाहीं असें नाहीं. आपल्या देहास कोणी इजा केली, तर सुखप्राप्ति होते, आनंद वाटतो, असें व्हावयाचेंच नाहीं व तसा तुकारामबावाच्या म्हणण्याचा भावार्थही नाहीं. त्याचें सांगणें हेंच आहे कीं, आपलें चित्त शुद्ध असलें, तर इतरानी केलेलें दुःख हलकें होईल, सुखफल होईल, म्हणजे दुःख देणारें लोक परिणामी सुखकर होतील; हिंस्र पशुवत् शत्रु आपलें अनहित करूं शकणार नाहींत; त्यानीं कितीही अंगाचा दाह होण्यासारखें वर्तन केलें, तरी आपण शांत व थंड राहू. कथेकऱ्यानीं प्रल्हादाचें चरित्र सांगितलें म्हणजे आपल्या सर्वांच्या डोळ्यात अश्रु येतात, परंतु त्यातील प्रमेय काय आहे, त्यापासून काय बोध घ्यावयाचा आहे, तें आपण विसरतो. प्रल्हादाच्या गोष्टीचेंच प्रमेय वरील

अभंगांत तुकारामबावांनी सांगितलें आहे. मनुष्याचें मन कितीही शुद्ध असलें, तरी त्याला हत्तीच्या पायाखालीं दिलें असता हत्ती त्याला चिरडणार नाही या प्रल्हादाच्या आख्यायिकेंत जो कवित्वाचा भाग आहे तो सोडून देऊन तिजमधील प्रमेयाकडे, तिजपासून होणाऱ्या बोधाकडे आपण पाहिलें तर अशी बोधपर गोष्ट दुसऱ्या कोणत्याहि लोकांच्या धर्मपुस्तकात सापडणार नाही; आणि ज्या पुस्तकात ही आहे त्याविषयी आपला अनादर कधीं व्हावयाचा नाही. परंतु आपली चुकी अशी होते कीं, ही कविता आहे हें आपण विसरतो, आणि ही गोष्ट जशीच्या-तशीच अनुभवाच्या दृष्टीनें पाहतो. अर्थात् ती अनुभवास पटत नाही व खरी वाटत नाहीं. तेंच पल्हादचरित्राकडे वर सांगितलेल्या दृष्टीनें पाहिलें, तर त्यात किती गौरव आहे? त्यात मुख्य सार हेंच आहे कीं, प्रल्हाद निःसीम ईश्वरभक्त असल्यामुळें त्याचे चित्त इतकें शुद्ध होतें कीं, त्याला शत्रु होणें शक्य नव्हते, आणि कोणी कितीही ताप दिला, तरी शीतलच वाटे. 'होतील शीतळ अग्निज्वाळा' हें प्रल्हादाविषयींही सांगितल आहे. त्याला अग्नीनें तप्त झालेल्या तेलात टाकलें, तरी त्याचें अंग पोळलें नाही. अथवा तुकारामबावाच्या उक्तीचा चित्त शुद्ध असलेला मनुष्य आगीत टाकला तरी जळत नाहीं, असा शब्दशः अर्थ करावयाचा नाहीं. अग्नीमध्यें टाकल्यानें अंगाचा दाह तर होणारच, परंतु ह्या बाहेरील दाहाचें काही उपचारानीं उपशमन होण्यासारखे असतें आणि तो अंतर्दाहापुढें काहींच नाहीं, असाच अनुभव येईल. कारण, कितीही पाणी ओता, मलयानिल अंगावर घाला, अंतर्दाहाचे शमन होऊ शकत नाहीं. प्रल्हादाचे चित्त शुद्ध होतें व त्याची वाणी गोड व मृदु होती, म्हणून तो स्वतः शांत होता. त्याचा अनेक प्रकारें छळ झाला, तरी त्याला संताप आला नाही, आणि आपल्या शांत वृत्तीने त्यानें अंतरीं सज्जनाला निववि्लें. प्रत्येकानें अशा तऱ्हेनें आपलें चित्त शुद्ध केलें व आपल्या वाणीतून शांततेचा रस पाझरेल अशी खबरदारी ठेविली, तर द्वंद्वें माजून कोणाची अवहेलना, कोणाचा उपमर्द न होता, शत्रु मित्र होतील आणि मित्रास शत्रु होण्याची भरती राहणार नाहीं. यदाकदाचित् तुकारामबावासारख्याची निंदा करणारे लोक राहिले, तरी त्याची मधुर वाणी ऐकिली, त्याची प्रसन्नता पाहिली आणि त्यांच्या शांतिरसाचा अनुभव घेतला, म्हणजे अशुद्ध मनाच्या लोकाची चित्तवृत्ति शांत होते. सारांश, सर्व धर्मांचें सार हें आहे कीं, प्रत्येकाने आपले चित्त इतकें शुद्ध करावें की आपल्या मित्राची संख्या वाढेल आणि शत्रु कमी होतील, निदान कमी होत आहेत, असें आपणास वाटावें. आपणास एकही अनिष्टचिंतक अथवा शत्रु या जगात राहणार नाहीं, सर्व विश्व मित्र होईल; अशी आमच्यातुमच्यासारख्या सामान्य मनुष्यांनी आशा बाळगणें, म्हणजे आकाशास गवसणी घालण्यासारखें, अथवा लहान तोंडानें मोठा घास घेण्यासारखे होईल. इतराची चित्तवृत्ति अशुद्ध व क्षुब्ध असली, तरी आपल्या शुद्ध भावानें व मधुर वाणीनें चित्तवृत्ति शांतता करितां येते, असा अधिकार ज्या पुरुषास आहे, ते खरे अमृतवल्लीसारखी शांतता करितां येते, असा अधिकार ज्या पुरुषास आहे, ते खरे

साधुसंत म्हणावे. या प्रकारें शत्रु मित्र होतात, पण, आपली दिशा त्याच्या उलट असते, आणि धर्माची दिशा आपलें वर्तन सुल्टें करण्याकडे असते आपण धर्माची तत्त्वे जाणून घेऊन साधुसंताचा किंवा वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे दुसऱ्या लोकाकडून दाह वाढला, तर साधुसंताकडची शीतलता व शांतता जास्त वाढते. प्रत्येकाच्या ठिकाणी जिभेत विष आहे व अमृतही आहे, आणि आपण शत्रु होऊं, मित्र होऊ, वाघ होऊ व सर्प होऊ, परंतु आपलें मन अशुद्ध म्हणून होऊ देणार नाही. जरी आपणास कोणी मारावयाचे मनात आणिले तरी आपण कोणास त्रास देणार नाहीं, अथवा ताडन करणार नाही, आपणास कोणी मारिलें, तरी त्यास आपण पोळविणार नाही. असा निश्चय ठेविला आणि तदनुरूप वर्तन केलें तर आपल्या अंगीं मनुष्यपणाचा भाग अधिक वाढेल व पशुवृत्तीचे बळ कमी होईल. अर्थात् शत्रु मित्र होतील. म्हणून या अभंगातील उपदेशाचा विशेष आदर बुद्धीने सर्वांनीं अवश्य विचार करावा.

★ पैसा ! पैसा अडका कोणाचा ? तो का आपल्या बरोबर येणार आहे ? मग पैशाचा लोभ तरी आपण का धरावा ? देवाने आपल्यापाशीं काही काळ ठेवण्यासाठीं दिलेली ठेव असे का मानीत नाहीं आपण ? पैशाचा लोभ सोडा. ज्याला त्याची जरूरी भासत असेल त्याच्यासाठी तो हातावेगळा करण्यास आपण मागेंपुढें का बरें पहावें ? पैसा हा तुम्हाला मोहात पाडणारा आहे. त्याला चिकटू नका. त्याच्याबद्दल बेपर्वाईनें वागा. मी कोणाचाहि बांधलेला नाही मी सदा मुक्त आहे असें नेहमी घोकीत रहा ! त्याचा इष्ट परिणाम घडून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

—स्वामी विवेकानंद

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# श्रीगुरुरायांची समाधि

## बाबांचे श्रीगुरुराज

दीनांचा कैवारी, नंदकिशोर भगवान् साईरमण ऐन सोळा वर्षांचे असता प्रथम शिर्डीतील निंबवृक्षाखाली प्रकटले. चैतन्याची ज्योत, आनंदाची प्रभा त्या वेळेपासून शिरडीवर फाकू लागली. चंचल बुद्धीच्या लोकांवर वरप्रसाद–कृपाप्रसाद करण्याकरिता नंदलाल साईप्रभु जेथें अवतरला, तो हा निंबवृक्ष समाधिमंदिराच्या मागच्या बाजूस आहे. पूर्वी हा रा. रा. साठे यांचा वाडा होता. त्यांच्याकडून रा. रा. नवलकर यांनीं घेतला. तो आता संस्थान कमिटीच्या पूर्ण मालकीचा आहे.

८०–९० वर्षांपूर्वी बाबा प्रथम शिरडीस आले. त्यावेळेस त्यांना श्री. नाना चोपदार यांचे मातोश्रींनें ह्या निंबवृक्षाखाली बसलेले पाहिलें.

ज्याच्या स्वलीलेनें जग सहज उत्पन्न होतें, तो सगुणरूपात प्रकट झाल्यावर आनंदमय वृंदावन निर्माण का करणार नाही ! वृंदावनवासी गोपालनंदन शिरडींत साईरूपानें आल्यावर, वृंदावनाची इच्छा झाली, व जेथें हल्ली समाधिमंदिर आहे तेथे प्रभु साईरायानें जाईचा व इतर फुलांचा सुंदरसा बाग उठविला. उकिरड्याचें वृंदावन केलें व त्यांत लावलेल्या झाडांना कच्च्या घटांतून रोज जीवन घालूं लागले. अशा रीतीनें आपली कालक्रमणा ह्या निंबवृक्षाखालीं करूं लागले.

कापूस वडगाव ( मोंगलाई ) येथें संत गंगागीरबाबा गांवोगांव नामसप्ताह करीत; व त्याप्रसंगी भोजनसमारंभ करीत. फिरत फिरत ते शिरडी मुक्कामीं आले, नामसप्ताह केला, व नित्याप्रमाणें पारणें केलें. श्रीसद्गुरु साईबाबा हे आपल्या स्वतःकरिता दोन्ही हातांत दोन मातीच्या घागरी घेऊन पाण्यास नेहमीं जात असत. ज्या ठिकाणी बाग उठविला होता त्या ठिकाणी श्री. म्हाळसापती व गांवातील इतर प्रमुख मंडळी उभी होती, तो तिकडून संत गंगागीरबाबा आले व म्हणाले, “का हो, हे कोण महाराज आहेत ?” तेव्हा म्हाळसापती म्हणाले, “हे साईमहाराज आहेत.” त्या वेळेस महाराज घागरींत पाणी घेऊन मशिदीकडे चालले होते. तेव्हा संत गंगागीर बाबा भक्तांना व जमलेल्या मंडळीस म्हणाले, ‘हा तर हिरा असून तुम्ही त्यांना ( बाबांना ; एकाद्या कस्पटाप्रमाणें मानता ! तेव्हां तुम्हाला मनुष्याची पारख नाही.’ इतकें बोलून संत गंगागीरबाबा श्रीसाईबाबांच्या पाठीमागें आले. तेव्हा साईबाबांनीं आपल्या हातातील घागरी मशिदींत आणून ठेवल्या, आणि ताबडतोब विटकरीचा ढेला हातात घेतला आणि गंगागीरबाबांना म्हणालें कीं, ‘ऐसे जाना ऐसे आना’ ( वेशींतून ) मग गंगागीरबाबा वेशीतून आल्यावर ‘आवो जी चांगदेव महाराज’

असें म्हणून त्यांना मशिदींत आणले व मग म्हाळसापती, श्रीसाईबाबा व चांगदेव ( गंगागीरबाबा ) या तिघानीं चिलीम ओढली.

एकदा अक्कलकोटचे अनंत महाराज ( आनंदनाथ ) येवलें येथे आले होते. त्या ठिकाणी शिर्डीची मंडळी कै. नंदराम शिवराम मारवाडी, दगडू भाऊ गायके, माधवराव बळवंत देशपांडे ( शामा ) व तात्या गणपत कोते पाटील, त्याना भेटण्या करितां गेले होते. आनंदनाथ महाराजांची भेट झाल्यावर शिर्डीची मंडळी घरीं येण्यास निघाली; बरोबर अक्कलकोटच्या महाराजांचे शिष्य आनंदनाथमहाराज त्यांच्या गाडींत बसून शिर्डी मुक्कामी आले. त्यांनीं श्रीसाईबाबाना पाहिल्याबरोबर म्हटलें, ' हा हिरा आहे, तुम्हाला चांगलीच मनुष्याची पारख आहे!" इतकें ते गावातील लोकाना बोलले."

श्रीसाईबाबा हे काहीं दिवस निंबवृक्षाखाली तर काही दिवस मशिदीत रहात. एके दिवशीं आपण कोण व येथे का बसता " असें गावकऱ्यानी विचारलें, पण त्याना त्याचा पत्ता लागेना व बाबा काहीं बोलेनात. शेवटी खंडोबाच्या देवळात ही मंडळी गेली व तेथें त्याना असें समजलें की, " हा पोर जेथें बसतो तेथे दोन पुरुष खोल खणा, म्हणजे ह्या पोराचा पत्ता लागेल."

कै. रावबहादूर हरी विनायक साठे डेप्युटी कलेक्टर याचा वाडा त्यावेळीं चौबाजूला माती व विटा यांनीं बांधलेला होता. त्याला पूर्व व पश्चिम बाजूस दिंडी दरवाजे होते. ह्या निंबवृक्षाशेजारी वाड्यातील पुढील दरवाजाजवळ जिन्याखालीं एका कमानींत खणले, तो १०×१० फुटाची एक खोली दिसली. आत पाट, बाजूला पेटत्या समया, व पाटावर व्याघ्रमुखी आणि जपमाळ दिसली.

आश्चर्यचकित झालेल्या गावकऱ्यानीं श्रीबाबाकडे नम्रतेनें पाहिले व त्याचा उलगडा करण्यास विनंती केली.

'ही माझ्या सद्गुरुरायाची जागा आहे,' आणि हे सिद्ध करण्याकरितां आपला उजवा हात निंबवृक्षाच्या पूर्वाभिमुख असणाऱ्या खांदीवर ठेवून बाबा म्हणाले, 'हें सत्य आहे. आजपासून ह्या बाजूला कडवटपणा निघून जाईल.' आणि खरोखरीच तसें झाले. नंतर ती कमानीजवळील खणलेली जागा बंद करण्यात आली. नंतर बाबा म्हणाले ' जो, कोणी गुरुवारीं शुक्रवारीं ह्या ठिकाणी मारवून ऊद जाळील, त्याचें कल्याण होईल.

ह्या स्थानाला आता संस्थान कमिटीनें लहानसें देवालय बांधलें आहे, आणि मागें व पुढें भक्तांकरितां चाळी बांधून लहानसा बाग उठवला आहे.

## निंबवृक्षाखाली स्थापन केलेल्या बाबांच्या पादुकांची मूळ हकीकत

शके १९३४ सालची गोष्ट. श्रीसमर्थ साईनाथ महाराजांच्या दर्शनास त्यावेळीं मुंबईचे डॉक्टर रामराव कोठारे येत, तसेंच त्यांचे कंपाऊंडर व त्यांचे स्नेही भाई कृष्णाजी अलीबागकर हेही बाबांच्या दर्शनास येत असत. एके दिवशी सगुण मेरू नाईक, कमलाकर दीक्षित, कंपाऊंडर व भाई अलीबागकर ह्या मंडळीचा असा

विचार ठरला की, साठे यांच्या वाड्यात निंबवृक्षाखाली जेथें बाबा बसत असत त्या ठिकाणीं कांहीतरी खूण असावी व त्याप्रमाणें भाईनें बाबांच्या साध्या दगडी ओबडधोबड पादुका करून आणल्या. तेव्हा भाईचे स्नेही कंपाऊंडर म्हणाले कीं, तुम्ही ज्या ह्या पादुका बसविणार, त्यापेक्षा जर ही गोष्ट आमच्या मालकाना कळेल, तर ते त्यापेक्षा कितीतरी उत्तम पादुका तयार करून बसवतील. त्याप्रमाणें डॉ. रामराव याना कळविण्यात आलें, व ते एक संगमरवरी पादुकाचा नकाशा तयार करून शिरडींत मुद्दाम आले. डॉ. रामराव श्रीसत उपासनींकडे जात असत. त्याप्रमाणे तें त्यांच्या भेटीसाठीं श्रीखंडेश्वराच्या मंदिरात गेले, व त्यानीं त्याना तो नकाशा दाखविला. श्रीउपासनी रामरावाना म्हणाले की, 'तुम्ही करता तें सर्व ठीक आहे. परंतु नुसत्या पादुका तयार न करतां मी सांगतो त्याप्रमाणें त्यावर कमळें, बेलपत्री, शंख, चक्र, गदा, पद्म वगैरे आकृत्या काढून चारी बाजूनी त्यास संगमरवरी दगडाचे पाट लावावे. पादुकाची बैठक उच्चासनावर असावी, नुसत्या जमिनीवर नसावी व पुढच्या पाटावर निंबवृक्षाची महती व बाबांचें योगेश्वरदर्शन गीर्वाण भाषेंत श्लोकात लिहावें.'

डॉ. रामराव कोठारे यांनीं श्रीउपासनीची ही गोष्ट मान्य केली व त्याप्रमाणें पादुका मुंबईस तयार करून घेऊन कंपाउडर बरोबर इकडे पाठवून दिल्या. कंपाउंडरनें त्या प्रथम श्रीखंडोबाच्या मंदिरात ठेवल्या. तेथें त्या दोन दिवस होत्या. त्याची स्थापना निंबवृक्षाखाली केव्हा करावी याबद्दल कंपाउंडरनें श्रीबाबाकडे अनुज्ञा मागितली. श्रावण शु० अष्टमीस त्या पादुका निंबवृक्षाखालीं स्थापन करा असें बाबा म्हणाले. त्याप्रमाणें त्या दिवशीं श्री. गोविंद कमलाकर दीक्षित यानी त्या पादुका सकाळीं ११ वाजतां मस्तकावर घेऊन श्रीखंडोबाच्या मंदिरापासून श्रीद्वारकामाईपर्यंत त्यांची मोठी मिरवणूक काढून द्वारकामाईत श्रीबाबांच्या चरणाजवळ आणून ठेवल्या. "हे देवाचे पाय आहेत" असें सांगून बाबानी त्याना हस्तस्पर्श केला व "वाड्यात निंबवृक्षाखालीं बसवा" असें म्हणाले.

भक्तश्रेष्ठ पास्ताशेट पारशी मुंबईकर यानीं बाबांना देण्याकरितां २५ रुपयाची मनिऑर्डर भाईचे नांवावर केली. ती भाईना ह्या पादुका बसविण्याच्या आदले दिवशीं मिळाली. भाईनीं ती बाबाना लागलीच दिली. "उद्या आपल्यास खर्चास होईल असें म्हणून ती रक्कम बाबानीं भाईजवळ परत दिली." पास्ताशेठ व कोठारे याचा अर्थाअर्थी कांही संबध नाहीं. डॉक्टरांनीं पादुका पाठविल्या, पण त्या स्थापन करण्याकरिता येणाऱ्या खर्चाकरितां कांहीं पाठविलें नव्हतें.

असा हा लीलाधारी बालमुकुंद साईदेव भक्तकार्याकरितां सगुणस्वरूपांत प्रगटला. नंदभुवनांत नवनीतस्तंभापाशी उभा रहाणारा श्रीकृष्ण, लेंडीबागेंत औदुंबर–पिंपळ–निंबवृक्षाखाली तासतास बसूं लागला. सुतलायर भक्तांकरितां हीं अवतार धारण केला. फक्त प्रभूला पाहणारे नेत्र भक्तीचे पाहिजेत, जे अधिकारी त्यास सुखी केलें. गाईस, मेंढ्यांस, बकऱ्यास मुक्या जनावरास सजीव केलें. अनंत लोकांस पशुजीवनातून मानवी जीवनांत आणलें. हा या संतचूडामणी साईचा विशेष होय.

# श्रवण आणि कीर्तन

—श्रीसंत विनोबा

प्रल्हादानें नऊ प्रकारची भक्ति सांगितली. तींत श्रवण आणि कीर्तन हे भक्तीचे दोन प्रकार अगदी सुरवातीला दिले आहेत. भक्तिमार्गामध्ये श्रवणकीर्तनाचें महत्त्व फार मानलें आहे. ऐकिलेलीच वस्तु पुन्हा पुन्हा ऐकावी, सांगितलेलीच वस्तु पुन्हा पुन्हा सांगावी अशी भक्ताची रीत आहे. तिन्ही लोकांत हिंडावें आणि सारखें सांगत सुटावें हा नारदासारख्याचा जन्माचा धंदा वरच्या वर्गाच्या लोकांत, मध्यम वर्गाच्या लोकांत, खालच्या वर्गाच्या लोकांत–तिन्ही लोकांत नारदाची फेरी व्हावयाची. आणि सारखें कीर्तन चालावयाचें. कीर्तनाचा विषय एकच : तोच भक्तवत्सल प्रभु, तेंच पतितपावन नाम. दुसरा विषय नाही, दुसरी भाषा नाही. तेंच गाणें, तेंच सांगणें, तेंच रडणें, तेंच ओरडणें. आळस नाही, कंटाळा नाही, थकवा नाही, विसावा नाही. गात गात फिरावें आणि फिरत फिरत गावें !

## धर्माचें श्रवणप्रेम

जसें नारदासारख्यांनी सतत गावें तसें धर्म राजासारख्यांनी सतत ऐकावें. भारतांतील वनपर्व आणि शांतिपर्व हीं दोन्ही विशालपर्वें धर्मराजाच्या श्रवणभक्तीची फळें आहेत वनवासांत असतांना जो जो म्हणून ऋषि भेटायला आला, त्याची धर्मराजानें दाढी पकडलीच. भक्तिभावानें प्रणिपात करावा, होईल ती सेवा करावी आणि ऋषीनें कुशल प्रश्न विचारला की आपली करुण कहाणी सांगण्याचें निमित्त करून सहज प्रश्न विचारावा, “ महाराज, द्रौपदीला जसे हल्ली कष्ट पडतात तसे आज-वर कोणाला पडले असतील का हो ? ” त्यानें म्हणावें, “ हें काय विचारतोस ? थोरा-थोरांनी जे कष्ट सोसले त्यापुढें द्रौपदीचे आणि तुमचे कष्ट म्हणजे कांहींच नाहींत. सीतेला, रामाला कां कमी सोसावे लागले ? ” मग ह्यानें विचारावें, “ तें कसें काय ? ” एवढी किल्ली मिळाली कीं ऋषीचें व्याख्यान चाललें. सबंध रामकथा अथपासून इतिपर्यंत त्यानें सांगावयाची आणि ह्यानें प्रेम-युक्त चित्तानें ऐकावयाची. दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं असाच एखादा ऋषि येऊन त्यानें नलदमयंतीचें नाव काढलें कीं, “ त्याची गोष्ट काय आहे ? ” म्हणून धर्मराजानें प्रश्न विचारलाच. आता रामाची सीता कोण आणि नल–दमयंतीची गोष्ट काय आहे हेंहि माहीत नसण्याइतकें इतिहासाचें अज्ञान धर्म-राजाच्या ठिकाणी होतें अशी कल्पना करता येईल का ? पण माहीत असलेली गोष्टहि संताच्या मुखातून ऐकण्यांत विशेष गोडी असते. शिवाय तीच ती वस्तु पुन्हा पुन्हा ऐकल्यानें विचार दृढ होतो. म्हणून धर्मराजा एवढा श्रवणाचा प्रेमी बनला होता.

## हरीनामाचा गजर

पण जुन्या गोष्टी सोडून दिल्या तरी अगदी जवळच्या काळातहि अशी उदाहरणें आहेत. नारदाप्रमाणेंच तुकाराममहाराजांनीं शेवटच्या घटकेपर्यंत कीर्तनभक्तिच गाजविली. रोज रात्री देवाच्या देवळांत जाऊन कीर्तन करावयाचें, हा त्याचा क्रम आमरण अबाधित चालला होता. लोक येवोत न येवोत, देवापुढे कीर्तन हें व्हावयाचेंच. न ऐकल्या देवालाहि कीर्तन ऐकवण्याचें ज्याचें व्रत त्यानें ऐकत्या देवाला 'अधिकार तैसा' उपदेश करण्याचा सपाटा चालविला ह्यांत काय नवल? समाजातल्या अगदी खालच्या थरापासून तो थेट वरच्या थरापर्यंत सर्व लोकांना तुकाराममहाराजांनीं देवाचें नाव ऐकविलें. घरात, दारात, शेजारीं, बाजारीं, दुकानात— सगळीकडे सूर सारखा. बायकोला, मुलीला, भावाला, जावयाला, गावच्या पाटलाला आणि कारभाऱ्याला, शिवाजीमहाराजाना, रामेश्वर भट्टाला, मंबाजीबुवाला—सर्वांना तुकाराममहाराजानी हरिनामाचा एकच उपदेश केला. आणि आजहि त्याची अभंग-वाणी तेंच कार्य अव्याहतपणें करीत आहे.

अलीकडच्या इतिहासात आपणांस तुकारामासारखे 'सतत बोलते' भक्तीचे झरे आढळतात तसेच त्याचे पाट फोडून राष्ट्राच्या धर्मक्षेत्राची बागाईत करणारे शिवरायासारखे श्रवः दक्ष शेतकरीहि पहावयास सापडतात. पंचवीस पंचवीस मैला वरून कीर्तन ऐकण्यासाठीं टाकोटाक धावत यावे असा शिवबाचा शिरस्ता होता. आणि ऐकावें. तसें म्हणजे आळसकिळस सर्व झाडून जिवाभावानें ऐकावें. जसे ऐकावें तसें वागण्याचा नेहमी प्रयत्न करावा. ह्यालाच श्रवण म्हणावयाचें. शिवाजी महा-राजानी सतत श्रवण केलें. कोणी सत्पुरुष भेटला असता त्याच्यापासून ऐकण्याची संधि त्यानीं सहसा गमावली नाहीं. त्यामुळें सर्व उद्योगात पुरून उरण्याइतकी स्फूर्तीची साठवण त्याच्या हृदयात होऊ शकली.

## तीन सूत्रांत शिकवण

भक्तिमार्गात ज्याला श्रवण-भक्ति आणि कीर्तन भक्ति म्हणतात त्यालाच उपनिषदांत स्वाध्याय आणि प्रवचन अशीं नावें दिली आहेत. नांवें निराळीं पण अर्थ एकच आहे. स्वाध्याय म्हणजे शिकणें आणि प्रवचन म्हणजे शिकवणें. ह्या 'शिकण्याशिकविण्यावर' उपनिषदाचा तितकाच जोर आहे. जितका 'श्रवण-कीर्तनावर' संताचा. "**सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमदः।**"—सत्य बोल, धर्मानें वाग आणि स्वाध्याय चुकूं नको—या तीन सूत्रांत ऋषींची सर्व शिकवण येऊन गेली. स्वाध्यायाचें आणि प्रवचनाचे म्हणजे शिकवण्या-शिकविण्याचे इतकें महत्त्व ऋषींना वाटतें की, मनुष्यानें नित्य आचरावयाची धर्माची तत्त्वें सांगताना त्यानी प्रत्येक तत्त्वाबरोबर स्वाध्याय-प्रवचनाचा फिरून फिरून उल्लेख केला आहे. 'सत्य आणि स्वाध्याय-प्रवचन,' 'तप आणि स्वाध्याय-प्रवचन,' 'इंद्रिय-दमन

आणि स्वाध्याय-प्रवचन,' 'मानसिक शांति आणि स्वाध्याय-प्रवचन,' अशा प्रकारें हरएक कर्तव्याचा अलग अलग उच्चार करून प्रत्येक वेळीं स्वाध्याय-प्रवचनाचा उल्लेख करण्यात ऋषींनीं स्वाध्याय-प्रवचनाचा हेतु आणि विषय तर सुचविलाच, पण महत्त्व-हि मांडून दाखविलें आहे.

आमची स्वराज्याची चळवळ अत्यंत विशाल आणि खोल चळवळ होती. एका बाजूनें तीस कोटि लोकांशीं-एक पंचमांश मानवी प्रजेशी-संबध राखणारी म्हणून विशाल आणि दुसऱ्या बाजूनें आत्म्याला स्पर्श करणारी म्हणून खोल. ही तीस कोटि लोकांशीं संबंध राखणारी चळवळ होती. हें म्हणणेंहि आकुंचित आहे. व्यापक नजरेनें पाहिलें तर असें दिसून येईल की, सर्व मानवी जगाची भवितव्यता ह्या चळवळीशीं खिळलेली होती. पायातला लहानसा कांटा काढणें हाहि सवाल नुसत्या पायाचा नसतो. सर्व शरिराचा त्यांत हितसबंध येतो. मग बिघडलेलें काळीज सुधारण्याचा सवाल हा सर्व शरिराचा सवाल कसा नव्हे ? अवश्य हा सर्व शरिराचा सवाल आहे. आणि साधा सवाल नव्हे, जिवावरचा सवाल आहे. 'यक्ष-प्रश्न' आहे. जबाब दे नाही तर जीव दे असला हा सवाल आहे. हिंदभूमि ! कालदृष्ट्या अत्यंत प्राचीन, लोकसंख्येनें जगाच्या पांचव्या हिश्श्या-बरोबर, विस्तारानें युरोप-कम-रशियाएवढी, संस्कृतीनें उदार-उच्च-अद्‌भुत, निसर्गसंपत्तीनें जगाच्या हेव्यास पात्र झालेली, हिंदु आणि बौद्ध ह्या दोन विश्व-व्यापक धर्मांना जन्म देणारी आणि इस्लामचें विस्तारक्षेत्र बनलेली, वाङ्मय-वैभवानें केवळ अद्वितीय ! अशी ही हिंदभूमि ब्रिटिश साम्राज्याच्या मुकुटावरचा हिरा च नव्हे पण ब्रिटिश साम्राज्यानें गिळलेली ही हिरकणी—हिच्या जगण्यामरण्यावर जगाचें नशीब टांगलेलें आहे. म्हणून आजच्या स्वराज्याच्या चळवळीचा संबध केवळ तीस कोटि हिंदी प्रजेशींच नसून सर्व जगाशी होती. आणि दुसऱ्या बाजूनें ही चळ-वळ आत्माला स्पर्श करणारी आहे हें म्हणणें तितकेंसे खोल नाहीं. स्वराज्याची ही चळवळ आत्मशुद्धि करणारी आहे. आणि आत्मशुद्धीचा वेग साक्षात् परमात्माची गाठ घेतल्याशिवाय कधीं थांबणारा नसतो. म्हणून परमात्मा गुणिलें मनुष्याच्या जगाचें क्षेत्र इतकें ह्या चळवळीचें घनफळ होतें.

चळवळ इतकी विशाल आणि खोल असल्यामुळें तिच्या सिद्धीसाठी दोन गोष्टींची काळजी घेणें जरूर होतें. तिला एखाद्या खुंटाभोवतीं जखडून टाकलें पाहिजे व तिच्यांतील तत्त्वांचें श्रवण-कीर्तन चालू राखलें पाहिजे. नाहीं तर ती हातची निसटून जावयाची.

## विनोबाची भविष्यवाणी

पैकी चळवळींचा खुंट आतां निश्चित झाला आहे. चरखा हा आपल्या ह्या सर्व चळवळीचा खुंट आहे. ह्याच्या भोंवतीं चळवळीचें चक्र फिरते राखलें पाहिजे. सोयी प्रमाणें आणि जरूरीप्रमाणें कासव आपले अवयव कधीं आपल्या मजबूत कवचीच्या आंत खेचून घेतो. कधीं बाहेर फैलावतो. त्याप्रमाणें चरख्याचा मजबूत खुंट कायम

करून त्याच्या आश्रयानें चळवळीचे इतर अवयव कधीं बाहेर पसरावे, कधीं आंत खेंचून घ्यावें. आज आपण चळवळीचीं अंगें आंत खेंचून घेतली आहेत. संधि मिळेल तेव्हा तीं बाहेर पसरूं. पण केव्हांहि चरख्याचा खुंट सोडणार नाही. ब्रह्म हें ' सर्वगत सदा सम ' आहे त्यामुळेंच तें हातावर तुरी देऊन केव्हा निसटून जाईल ह्याचा नेम सांगतां येत नाहीं. म्हणून ह्या ब्रह्माला एखाद्या मूर्तीत डांबून ठेवल्याशिवाय भक्ताचें काम चालत नाही. तसेंच विश्वव्यापी चळवळ म्हटली कीं कांहीच हाताला लागत नाहीं. म्हणून त्या चळवळीची चरख्यांत प्राणप्रतिष्ठा केली आहे. दुसरें कांहीं होवो वा न होवो, ह्या मूर्तीची पूजा मात्र कधींच चुकतां कामा नये.

आणि तितकीच महत्त्वाची दुसरी वस्तु म्हणजे चळवळींतील तत्त्वें सर्वांच्या कानावर सारखीं पडत राहतील अशी व्यवस्था करणें. वास्तविक ह्या दोन निरनिराळया गोष्टी नाहीत. एकाच गोष्टीचीं दोन अंगें आहेत. कीर्तन करावयाचें म्हणजे समोर मूर्ति पाहिजेच. देवाच्या मूर्तीशिवाय कीर्तन होऊं शकत नाहीं. गंगेचें पाणी समुद्राकडे जातें तें तीरावरच्या झाडाचे पोषण करीत करीत जातें. पण जातें समुद्राकडेच. तशी कीर्तनाची धार, ही वाहते देवाच्याच समोर, ऐकणारे तीरावरच्या झाडांसारखे. स्वराज्याच्या चळवळीची स्थापना चरख्याच्या मूर्तींत करावयाची आणि त्या मूर्तीसमोर अखंड कीर्तनाचा घोष चालवावयाचा. हें भजनकार्य हरएक शहरांत, हरएक खेड्यांत हरएक घरात सुरू झालें पाहिजें. हें आपण करूं शकलो तर एका क्षणांत राष्ट्राचा नूर पालटून जाईल हें निश्चित समजावें.

---

## पुतळा कां नाही ?

शिकंदर बादशहाच्या राजधानींत एक सुंदर बगीचा होता. त्यात प्राचीन आणि विद्यमान पराक्रमी पुरुषांचे पुतळे उभारलेले होते. एकदां शिकंदराची राजधानी पाहण्यासाठीं कोणी परदेशस्थ बडा मुसाफर आला होता. तो शिकंदराचा पाहुणा म्हणून शिकंदरच्या पाहुण-घरात उतरला होता. शिकंदर त्याला तो ऐतिहासिक बगीचा दाखविण्यासाठीं आपल्याबरोबर घेऊन गेला. शिकंदरानें पुतळा दाखवावा, पाहुण्यानी "हा कोणाचा पुतळा ?" म्हणून विचारावें. "हा अमक्या अमक्या 'सुप्रसिद्ध' पुरुषाचा पुतळा, म्हणून शिकंदरानें माहिती द्यावी, असा क्रम चालला होता. शेवटीं सर्व पुतळे पाहून झाल्यावर पाहुण्यानें विचारलें—"महाराज, आपला पुतळा कोठें दिसत नाहीं ?" शिकंदर म्हणतो—"माझा पुतळा उभारला जावा आणि पुढच्या पिढ्यांनीं ' हा कोणाचा पुतळा ?' म्हणून सवाल करावा त्यापेक्षां तो उभारला जाऊं नये आणि ' शिकदरचा पुतळा कां नाहीं ?'. म्हणून लोकांनीं विचारावें हें मला अधिक बेंर वाटतें."

—संत विनोबा

---

# अपार सृष्टि म्हणजे ईश्वराचें पुस्तक

—संत विनोबा

आज जडवादाचा सारा डोळ्यांवर चढला आहे. ईश्वर आहे तरी कोठें, येथून आज सुरवात आहे. तो कोणाला कोठें प्रतीतच होत नाही. सारें जीवन विकारमय, विषयलोलुप आणि विषमतेनें भरलेलें आहे. हल्लीं उंचातील उच विचार करणारे जे तत्त्वज्ञानी आहेत त्यांचे सुद्धा विचार सर्वांना भाकर कशी पोटभर मिळेल या पलीकडे जाऊ शकत नाहीत. ह्यांत त्याचा दोष नाही. कारण आज अनेकाना खाण्यासहि मिळत नाहीं अशी स्थिति आहे. आजची मोठी समस्या म्हणजे भाकरी. ही समस्या सोडविण्यात सारी बुद्धि आज गढून गेली आहे. सायणाचार्यांनी "बुभुक्षमाणः रुद्ररूपेण अवतिष्ठते" अशी रुद्राची व्याख्या केली आहे. भुकेलेले लोक म्हणजे च रुद्राचा अवतार. त्यांच्या क्षुधाशांतीसाठी नाना तत्त्वज्ञानें, नाना वाद, नाना राजकारणें, उभीं राहिली आहेत. या प्रश्नातून बाहेर पडण्यास आज अवसरच नाही. एकमेकांशीं न भांडता दोन सुखाचे घास मोकळ्या मनानें लोक कसे खातील याचा विचार करण्यात आज प्रयत्नाची शिकस्त होऊन राहिली आहे. अशी चमत्कारिक समाजरचना ज्या काळात आहे तेथें ईश्वरार्पणतेची साधी सोपी गोष्टच अतिशय कठिण होऊन बसली यात आश्चर्य नाही. परंतु याला उपाय काय? ईश्वरार्पण—योग कसा साधावा, तो कसा सोपा करावा, ही गोष्ट आपणास पाहावयाची आहे.

## परमेश्वर-दर्शनाची बाळबोध रीत

लहान मुलांना शिकविण्यासाठीं जे उपाय आपण योजतो तेच उपाय सर्वत्र परमात्मा दिसावा म्हणून गीतेंत सांगितले आहेत. मुलांना अक्षरें दोन रीतींनी शिकवितात. एक रीत म्हणजे प्रथम अक्षरें मोठमोठीं काढून शिकवायची. पुढें हींच मोठीं अक्षरें लहान काढून शिकवायची. तोच 'क', तोच 'ग'. परतु पूर्वी मोठा होता, ही एक तऱ्हा. दुसरी तऱ्हा म्हणजे आधीं बिनघोटाळ्याचीं साधीं अक्षरें शिकवायचीं आणि घोटाळ्याचीं जोडाक्षरें मागून शिकवायचीं. तसेंच हुतेहूब परमेश्वर पहावयास शिकावयाचें. आधीं ठळक परमेश्वर पहावयाचा. समुद्र—पर्वतादि महान् विभूतींत प्रकट झालेला परमेश्वर पटकन् डोळ्यांत भरेल. हा ठळक परमेश्वर पटला म्हणजे मग एखाद्या जलबिंदूंत, एखाद्या मातीच्या कणात सुद्धां तोच आहे हेंहि पुढें कळेल. मोठा 'क' व बारीक 'क' यात फरक नाहीं. जें स्थूलांत तेंच सूक्ष्मात. हा एक प्रकार झाला. आणि दुसरा प्रकार म्हणजे बिनघोटाळ्याचा सरळ परमात्मा आधी पहावयाचा. मग जरा गुंतागुंतीचा. जेथें शुद्ध परमेश्वरी आविर्भाव सहज प्रकट झाला आहे त्याचें ग्रहण पटकन् होतें, जसा रामाच्या ठिकाणी प्रकट झालेला परमेश्वरी आविर्भाव पटकन् समजतो. राम हें साधें अक्षर आहे. हा बिन-

भानगडीचा परमेश्वर आहे. परंतु रावण? तें जोडाक्षर आहे. तेथें कांहीं तरी मिसळ आहे. रावणाची तपस्या कर्मशक्ति ही थोर आहेत; परंतु त्यांत क्रूरपणा मिसळलेला आहे. आधी राम हें सरळ अक्षर शिका. जेथें दया आहे, वत्सलता आहे, प्रेम आहे, असा जो हा राम तो सरळ परमेश्वर आहे. त्याचें पटकन् ग्रहण होईल. रावणाच्या ठिकाणचा परमेश्वर पहावयास जरा वेळ लागेल. आधी सरळ अक्षर मग जोडाक्षर. सज्जनात परमात्मा पाहून मग दुर्जनांतहि शेंवटीं पहावयास शिकावयाचें. समुद्रातील विशाल परमेश्वरच त्या पाण्याच्या थेंबात आहे. रामचंद्रांतीलच परमेश्वर रावणातहि आहे. जें स्थूलात तेंच सूक्ष्मात. जें सोप्यांत तेंच कठिणात. अशा दोन तऱ्हांनी हा जगाचा ग्रंथ वाचावयास आपणास शिकावयाचे आहे.

ही अपार सृष्टि म्हणजे ईश्वराचें पुस्तक आहे. डोळ्यांवर जाड पडदे आले म्हणजे हें पुस्तक आपणास बंद झाल्यासारखें वाटतें. या सृष्टीच्या पुस्तकांत सुंदर अक्षरांनी परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे; परंतु तो आपणांस दिसत नाही. ईश्वराचें दर्शन होण्यात एक मोठें विघ्न आहे तें हें कीं साधें जवळचें ईश्वरस्वरूप मनुष्यास पटत नाहीं व दूरचें प्रखर रूप पचत नाहीं. मातेच्या ठिकाणीं ईश्वर पहा असें म्हटलें तर तो म्हणतो, ईश्वर का इतका साधा व सोपा? परंतु प्रखर परमात्मा प्रकट झाला तर तो तुला झेपेल का? कुंतीला वाटलें तो दूरचा सूर्यजवळ येऊन भेटावा. परंतु तो जवळ येऊन अनुभवून राहिले होते. पाणिनींची ही जी महनीयता आहे तीमुळेंच भाष्यांत जेथें जेथें त्याचा उल्लेख येतो तेथें तेथें 'भगवान् पाणिनि' असा पूज्यभावानें तो केलेला असतो. पाणिनीचे अत्यंत उपकार मानतात.

"अज्ञानांधस्य लोकस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै पाणिनये नमः॥"

असे भगवान् पाणिनि व्याघ्राच्या ठिकाणी परमात्मा पाहून राहिले आहेत. ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे—

"घरा येवो पां स्वर्ग। कां वरि पडो व्याघ्र
परी आत्मबुद्धीसी भंग। कदा नोहे"

अशी महर्षि पाणिनींची स्थिति झाली होती. व्याघ्र ही दैवी विभूति आहे ही गोष्ट ते समजले होते.

तसाच तो साप. सापाला फार भितात. परंतु साप म्हणजे कडकडीत सोंवळा ब्राह्मण आहे. किती स्वच्छ, किती सुंदर! यत्किंचित्‌हि घाण त्याला खपत नाही. घाणेरडे ब्राह्मण किती तरी आढळतात! परंतु घाणेरडा सर्प कोणीं पाहिला आहे? एकान्तांत राहणारा जणूं ऋषिच. निर्मळ, सतेज, मनोहर हारासारखा हा साप, त्याला का भ्यायचें? आपल्या पूर्वजांनीं तर त्याची पूजा करावयास सांगितलें आहे. काय काय हिंदुधर्मांत खुळें, असें तुम्ही म्हणा. परंतु नागपूजा करावयास सांगितली आहे खरी. लहानपणीं मी आईला गंधाचा नाग काढून द्यावयाचा

मी आईला म्हणें, 'बाजारात चांगलें चित्र मिळतें.' आई म्हणे, 'तें रद्दी, तें नको, मुलाच्या हातचें ते चांगलें.' मग त्या नागाची पूजा करावयाची. काय आहे हा पागलपणा ? परंतु विचार तर करा. तो सर्प श्रावण महिन्यात अतिथि म्हणून आपल्या घरीं येत असतो. त्याचे बिचाऱ्याचें घर पावसाळी पाण्यानें सारें भरून गेलेले असतें. मग काय करील तो ? दूर एकान्तांत राहणारा तो ऋषि. तुम्हास उगीच फार त्रास होऊं नये म्हणून वळचणीस लांकडांत पडून राहतो. कमींत कमी जागा तो व्यापतो; परंतु आपण दंडा घेऊन धावतों. संकटांत सांपडल्यामुळें अतिथि घरी आला तर त्याला का मारायचें ? सैंट फ्रान्सिसची गोष्ट सागतात कीं जंगलांत साप दिसला म्हणजे तो प्रेमानें म्हणायचा, 'ये, भाऊ ये.' ते साप त्याच्या मांडीवर खेळत, अंगावर रूळत. हें खोटें नका समजूं. प्रेमामध्यें ही शक्ति आहे. साप म्हणे विषारी आहे. आणि माणूस काय कमी विषारी आहे ? साप चावला तरी क्वचित् चावतो. तो मुद्दाम चावत नाही. शेंकडा ९० साप तर निर्विषच असतात. तो तुमच्या शेतीची रक्षा करतो. शेतीचा नाश करणारे असंख्य किडे व जंतु यांवर तो जगतो. असा हा उपकारी, शुद्ध, तेजस्वी, एकान्तप्रिय सर्प म्हणजे भगवंताचें रूप आहे. आमच्या सर्व देवात साप कोठें ना कोठें तरी आहेच आहे. गणपतीच्या कमरेला नागाचा करगोटा आम्ही दिला आहे. शंकराच्या गळ्यात ते घातले आहेत. आणि भगवान् विष्णूला तर नागाचा बिछाना दिला आहे. यातील गोडी तर पहा. या सर्व गोष्टींचा भावार्थ हा की नागाच्या ठिकाणीं ईश्वराची मूर्ति प्रकट झाली आहे. सापांतील परमेश्वराचा परिचय करून घ्या.

## सृष्टींतील परमेश्वर : आणखी कांहीं उदाहरणें

अशा किती गोष्टी सागूं ? मी कल्पना देऊन राहिलों आहें. रामायणाचें सारें सार अशा प्रकारच्या रमणीय कल्पनेतच आहे. रामायणात पितापुत्राचे प्रेम, मायलेकरांचें प्रेम, भावाभावांतील प्रेम, पतिपत्नींचें प्रेम, हें सारें आहे. परंतु, मला रामायण यासाठीं नाहीं प्रिय वाटत. रामाची वानराशीं दोस्ती झाली या गोष्टीमुळें तें मला आवडतें. हल्लीं म्हणतात कीं वानर म्हणजे नागलोक होते. जुने उकरावयाचें हें इतिहासतज्ञांचे कामच आहे. मी त्यांच्या कामाविषयी तक्रार नाही करीत; परतु रामानें खरोखरच्या वानराशीं मैत्री जोडली यांत काय अशक्य आहे ? राम व वानर दोस्त झाले यातच खरोखर रामाचें रामत्व व रमणीयत्व आहे. तसाच कृष्णाचा गाईशी संबंध. सर्व कृष्णपूजा यावर उभारलेली आहे. श्रीकृष्णाचें चित्र म्हटलें म्हणजे सभोवती गाई असावयाच्याच. गोपाल कृष्ण ! गोपाल कृष्ण ! कृष्णापासून गाय अलग कराल तर कृष्ण काय उरला ? आणि रामापासून वानर दूर केले तर रामांत तरी काय राम उरला ? रामानें वानराच्या ठिकाणचाहि परमात्मा पाहिला व त्याच्याशी प्रेमाचें जिव्हाळ्याचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही किल्ली सोडाल तर गोडी गमवाल. पितापुत्राचे, मायलेकराचें संबंध अन्यत्रहि दिसतील. परंतु नरा-वानराची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणात आहे. वानराच्या ठिकाणचा देव रामायणानें पचनीं

पडला. वानरांना पाहून ऋषींना कौतुक वाटे. रामटेकापासून तों कृष्णाकांठापर्यंत जमिनीवर पाय न ठेवतां झाडांवरच्या झाडावर उड्या मारीत हे वानर हिंडत खेळत. अशी ती घनदाट जंगले व तेथें खेळणारे ते वानर पाहून प्रेमळ ऋषींस काव्य स्फुरे व कौतुक वाटे. उपनिषदांत ब्रह्माचे डोळे कसे असतात हें सांगतांना वानराच्या डोळ्या-प्रमाणें असतात असें म्हटलें आहे. वानराचे डोळे चंचळ. चौफेर त्याची नजर. ब्रह्माचे असेच डोळे हवेत. ईश्वराला डोळे स्थिर ठेवून चालणार नाहीं. तुम्ही आम्हीं ध्यानस्थ बसावें; परंतु ईश्वर ध्यानस्थ बसला तर सृष्टीचें कसें होणार? वानराच्या ठिकाणी सर्वांची काळजी घेणारे ब्रह्माचे डोळे ऋषींना दिसत आहेत. वानराच्या ठिकाणीं देव पहावयास शिका.

आणि तो मोर! महाराष्ट्रात मोर फारसे नाहींत. परंतु गुजराथमध्यें फार आहेत. मी गुजराथमध्यें होतों. मला रोज दहाबारा मैल हिंडण्याची सवय. हिंडताना मला मोर दिसावयाचे. आकाशांत अभ्रें आलेलीं असावीं, पाऊस पडण्याची तयारी असावी, आकाशांत काळा गर्द रंग चढलेला असावा आणि मग तो मोर आवाज काढतो. हृदय पिळवटून निघालेला तो टाहो ऐका म्हणजे समजेल. आमचें सारें संगीतशास्त्र मोराच्या या ध्वनीवर उभारलें आहे. मोराचा आवाज म्हणजे, "षड्जं रौति" हा पहिला षड्ज मोरानें दिला व मग कमी अधिक प्रमाणांत आपण इतर स्वर बसविले. त्याची ती मेघाकडे असलेली दृष्टि, त्याचा तो खोल आवाज व मेघाचा धिमिधिमि गडगड आवाज होऊं लागताच त्याचा उभारला जाणारा तो पिसारा! अहाहा! त्या पिसाऱ्यासमोर माणसाची ऐट झक मारते. बादशहा नटतो. परंतु मोराच्या पिसाऱ्या-समोर तो काय अधिक नटणार? केवढा तो भव्य पिसारा, ते सहस्र डोळे, ते नाना रंग, त्या अनंत छटा, ती अद्भुत सुंदर मृदु रमणीय रचना, ती वेलबुट्टी! पहा पहा तो पिसारा आणि तेथें परमात्माहि पहा. ही सारी सृष्टि अशी नटली आहे. सर्वत्र परमात्मा दर्शन देत उभा आहे; परंतु आपण न पाहणारे अभागी. तुकारामानीं म्हटलें आहे—

"देव आहे सुकाळ देशीं, अभाग्यासी दुर्भिक्ष ॥"

संतांना सर्वत्र सुकाळ आहे, परंतु आम्हाला सर्वत्र दुष्काळ.

वेदामध्यें अग्नीची उपासना सांगितली आहे. अग्नि हा नारायण आहे. काय त्याची दैदीप्यमान मूर्ति! दोन लाकडें घांसा, प्रकट होतो. पूर्वी कोठें लपला होता कोणास माहित. किती ऊबदार, किती तेजस्वी! वेदांचा पहिला ध्वनि निघाला तोच मुळी अग्नीच्या उपासनेनें.

"अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्। होतारं रत्नधातमम् ॥"

ज्या अग्नीच्या उपासनेनें वेदाना आरंभ झाला, त्या अग्नीकडे तुम्ही पहा. त्या त्याच्या ज्वाळा पाहिल्या म्हणजे मला जीवात्म्याच्या धडपडीची आठवण होते. त्या ज्वाळा घरांतल्या चुलींतील असोत वा जंगलातल्या वणव्यांतलि असोत. वैराग्याला घरदार असें नसतें. त्या ज्वाळा जेथें असतील तेथें त्याची ती धडपड सुरूच आहे.

# दुःख पाहतां जवापाडें—सुख पर्वता एवढें

**सतत वाढत जाणाऱ्या सुखतृष्णेस योग्य लगाम घालून, आपण शक्य तो उद्योग केल्यानंतर जी स्थिति प्राप्त होते तीत संतुष्ट रहाण्याची मनास संवय लावली पाहिजे.**

सुख पाहिजे असेल तर अगोदर दुःख भोगिलें पाहिजे दुःख ही सुखाची किंमत आहे व ती नेहमी अगोदर द्यावी लागते. सुखाची उधार-विक्री होत नाही. ज्या मानानें सुख कमीजास्त पाहिजे असेल त्या मानाने दुःखरूप मूल्यें दिले पाहिजेत. अगोदर दुःख भोगल्याविना कोणास कधींहि सुख मिळावयाचें नाहीं. महिनाअखेर पगार पाहिजे असेल तर अगोदर तीस दिवस नोकरी केली पाहिजे, धान्याची सुबत्ता व्हावयास पाहिजे असेल तर अगोदर शेतात राबलें पाहिजे, व्याकरणशास्त्रांत पारंगत व्हावेसें वाटत असेल तर अगोदर बारा वर्षे अध्ययन केलें पाहिजे, ब्रह्म पदाची अपेक्षा असेल तर अगोदर लोखंडाचे चणे पचविले पाहिजेत, आणि देवपणा प्राप्त करून घेण्याची महत्वाकांक्षा असेल तर अगोदर टाकीचे घाव सोसले पाहिजेत. साराश सुख पाहिजे असेल तर अगोदर दुःख भोगले पाहिजे.

## सुखाचा शोध

पुष्कळ लोकाना असें वाटतें कीं, ज्याच्यापाशीं मुबलक पैसा असतो ते सर्व प्रकारें सुखी असतात. अर्थात् श्रीमंतीत लोळणारें राजेरजवाडे हे नेहमीं सुखातच लोळत असले पाहिजेत; पण हा निव्वळ भ्रम आहे. याच्या उलट मात्र बहुधा खरें असते. ज्याच्यापाशी बिलकुल सपत्ति नाही असे लोकच प्रायः सुखी असतात. इराणच्या बादशाहाची अशी गोष्ट सागतात की, एकदा त्याला मुळीच करमेनासे झाल्यामुळे त्यानें आपल्या पदरच्या ज्योतिषास सुखप्राप्तीचा उपाय विचारला. तेव्हां

---

त्याना सारखी तळमळ लागली आहे. त्या ज्वाळा वर जाण्यासाठीं अधीर असतात. त्या ज्वाळा ईथरमुळें हलतात, हवेच्या दाबामुळें हलतात, असें तुम्ही शास्त्रज्ञ कांहीं म्हणाल; परंतु माझा तरी अर्थ हा आहे. तो वर जो परमात्मा आहे, तो तेजःसमुद्र सूर्यनारायण जो वर आहे, त्याला भेटण्यासाठीं त्या सारख्या उड्या घेत असतात. जन्मल्यापासून मरेपर्यंत सारखी त्यांची धडपड सुरू असते. सूर्य हा अंशी व ह्या ज्वाळा म्हणजे अंश. अंश अंशीकडे जाण्यासाठीं तडफडत असतो. त्या ज्वाळा विझतील तेव्हांच ती धडपड बंद होते, तोपर्यंत नाहीं. सूर्यापासून आपलें अतर फार आहे हा विचार त्यांच्या मनांत नसतो. पृथ्वीवरून आपल्या शक्तीप्रमाणें उडी मारणें हेंच त्याना माहीत. असा हा अग्नि म्हणजे त्याच्या रूपानें धगधगीत वैराग्यच प्रकट झालें आहे असें वाटतें. म्हणून वेदाचा पहिला ध्वनी '**अग्निमीळे**' निघाला.

---

त्यांनीं सांगितलें कीं, एकादा पूर्ण सुखी मनुष्य शोधून त्याचा अंगरखा अंगांत घालावा, म्हणजे सुख मिळेल. त्यावरून पूर्ण सुखी मनुष्याचा तपास सुरू झाला. प्रथम सर्व राजवाडा धुंडाळला, नंतर देशांतील सर्व संपन्न लोकांमध्यें चौकशी केली, पण कांहीं केल्यानें तशा प्रकारचा मनुष्यच मिळेना. शेवटीं शोधतां शोधतां एक मजूर भेटला. तो पूर्ण सुखी अशा संज्ञेस पात्र होता. पण इतका शोध करून शेवटी जी वस्तु हवी होती ती मिळालीच नाहींच! कारण तो मजूर बिचारा बोलून चालून दिगंबर पडला, मग त्याचा अंगरखा कोठून मिळणार?

सर्व प्रकारचा सुखदुःखानुभव अखेर मनावरच अवलंबून असल्यामुळें, मनोनिग्रहानें सुखदुःखानुभवाचाहि निग्रह होणें अशक्य नाहीं असें ओघानेंच सिद्ध होतें. याच अभिप्रायानें—

सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥

'परक्याच्या ( बाह्य वस्तूंच्या ) जें कांहीं ताब्यांत असतें तें सर्व दुःख, आणि स्वतःच्या ( मनाच्या ) ताब्यांत जें असतें तें सुख हे सुखदुःखाचें संक्षिप्त लक्षण होय' मनूनें म्हटलें आहे.

विषयोपभोगाची केव्हांहि पूर्ति होणें अशक्य असल्यामुळें प्रत्येक मनुष्यास मी दुःखी आहें असेंच नेहमीं वाटत असतें. मनुष्यमात्राची ही स्थिति लक्षांत घेऊनच—

सुखाद् बहुतरं दुःखं जीविते नाऽत्र संशयः ।

'या जीवितामध्यें म्हणजे संसारांत सुखापेक्षा दुःखच अधिक आहे,' असें महाभारतांत म्हटलें आहे व तुकोबानींहि त्याच अभिप्रायानें—

सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ॥

असें या संसाराचें वर्णन केलें आहे. आणि विचार केला तर सुखापेक्षा दुःखाचीच वास्तविक जरूरी आहे असें समजून येईल. ज्या मनुष्यानें कधींहि दुःख भोगलें नाहीं तो मुळमुळीत स्वभावाचा बनेल. त्याच्यामध्यें ताठपणा येणार नाहीं.

**दुःखाची गरज**

रामचंद्राच्या अंगीं पितृभक्ति, सत्यप्रतिज्ञता, प्रजावात्सल्य, पराक्रम इत्यादि अनेक लोकोत्तर गुण होते खरे, पण कैकेयीनें त्याला वनवासास घालविलें व वनांत असतां रावणानें त्याची पत्नी सीता हिला पळवून नेलें या दोन गोष्टींमुळेंच मुख्यतः त्याच्या गुणांस व कर्तृत्वशक्तीस विशेष तेज चढलें व अफाट महासागरावर सेतु बांधणें व पुढील भयंकर रणसंग्रामांत रावणकुलाचा निःपात करणें या गोष्टी त्याच्या हातून होऊन त्याची कीर्ति अजरामर झाली. तसेंच कौरवांनीं कपटद्यूतानें पांडवांचें सर्वस्व हरण केलें, त्यांच्या साध्वी स्त्रीची भर सभेंत विटंबना केली व त्यांना वनवासास घालविलें यामुळें अर्जुनानें एवढें उग्र तप केलें व सर्व दिव्य अस्त्रें व अनेक कला संपादन करून आपलें सामर्थ्य शेंकडों पटींनें वाढविलें. सारांश शत्रूंनीं दिलेलीं दुःखें ही तेजस्वी पुरुषांच्या उन्नतीसच कारणीभूत होत असतात. मनुष्यावर दुःखाचा प्रसंग गुदरला म्हणजे त्यांतून पार पडण्याकरितां कोणते उपाय योजिले पाहिजेत याचा तो आपलें

मन एकाग्र करून विचार करूं लागतो व अशा प्रकारच्या विचारापासून त्याच्या अंतःकरणात प्रकाश पडून त्याचें सत्याचे ज्ञान वाढतें. मनुष्यस्वभाव असा आहे कीं, स्वतःवर अगदीं बेतल्याशिवाय तो मन लावून आस्थेनें विचार करीत नाही; मग दुसऱ्याच्या दुःखानें जागृत होऊन विचार करण्याची गोष्टच नको. व अशा प्रकारचा विचार नाहीं म्हणजे काहीं नाहीं. म्हणून आपणास मनःपूर्वक विचार करावयास लावण्यास दुःखाच्या अंकुराची वारंवार जरूरी असते. हे प्रसंग मनुष्यास दुःखद वाटतात पण कडू औषधाप्रमाणें ते हितपरिणामी असतात. दुःखाच्या वेळीं मनुष्याच्या मनाच्या सर्व वृत्ती परमेश्वराकडे सहज लागतात तशा त्या इतर वेळीं दृढ प्रयत्नानेंहि लागत नाहीत याचा सर्वांस अनुभव आहे. दुःखाच्या वेळीं सर्व वृत्ती परमेश्वराकडे लागून अनिर्वाच्य असा आनंद अनुभवास आल्यामुळें "देवा, मला नेहमीं दुःखांतच ठेव, कारण तेणें करून माझें मन तुजकडे 'एका भावें' लागतें" असें एका संतानें देवापाशीं मागणें मागितलें आहे. यावरून दुःखाचे प्रसंग बोधप्रद कसे होतात हें नीट लक्षांत येईल. ईश्वरनिष्ठा, आत्मविश्वास, धैर्य, उद्योग इत्यादि गुण दुःखप्रसंगामुळेंच विशेषतः आपल्या अंगी बाणतात. म्हणून आपली दानत बनण्याकरिता सुखापेक्षां दुःखप्रसंगाचीच विशेष जरूरी आहे, असे दिसून येईल.

निर्भेळ सुख किंवा निर्मिश्र दुःख असें या जगात कोठेंहि नाहीं. प्रत्येक ठिकाणीं आणि प्रत्येक अवस्थेमध्यें सुखदुःखांचें मिश्रण असते. कोठलेंहि सुख आपणास पाहिजे असेल तर तत्संलग्न दुःख भोगण्यास आपण तयार असलें पाहिजे, व तें दुःख भोगण्यास आपली तयारी नसेल तर त्या सुखाचीहि आशा आपण सोडली पाहिजे. गुलाबाचें फुल पाहिजे असेल तर गुलाबाचे काटे सोसले पाहिजेत, व काटे अंगास लागावयास नको असतील तर फुलाची इच्छा करणें व्यर्थ होय. तसेंच स्त्री-सुखाची इच्छा असेल तर तदनुषंगानें येणारीं दुःखें व जबाबदाऱ्या पत्करल्या पाहिजेत. तसें न करता वैवाहिक सुखाची अपेक्षा करणें निर्बुद्धपणाचें होय.

## सुखाचा तरतमभाव

मनुष्य आपणास सुखें किती आहेत याचा विचारच करीत नाहीं. आपणास हे सुख नाहीं हाच विचार रात्रदिवस त्याच्या मनांत घोळत असतो. अमक्याच्या इतकी सुंदर स्त्री आपणास नाहीं, अमक्याच्याइतके जिव्हाळ्याचे स्नेही आपणांस नाहीत, रामरावांइतकी आपणास विद्या नाहीं, श्यामरावांइतकी आपणास संपत्ति नाहीं; काशीनाथपंताइतका आपला चेहरा रुबाबदार नाहीं, द्वारकानाथपंताइतकें आपलें शरीर बळकट नाही; प्रभाकराइतका आपला कंठ सुस्वर नाहीं, विभाकराइतका आपला हात चित्रकलाकुशल नाही, मोरोपंताइतकें आपणास मातृसुख नाही, केरोपंतांइतकें आपणास पितृसुख नाही. अशा दुःखकारक विचारापुढें आपणास देवानें एकंदर

किती सुखें दिलीं आहेत हा विचार मनुष्याच्या मनास शिवत देखील नाहीं. पण आपणास सर्वथैव दुर्भागी करणाऱ्या अशा प्रकारच्या विचारांत मनुष्य निमग्न असतां जर कदाचित् स्वतःस लाभलेल्या सुखांकडे त्याचें लक्ष गेलें तर देवाने आपणास इतकी सुखें दिली असता आपण मूर्खपणाने त्याला दोष दिल्याबद्दल मनास पस्तावा होऊन ईश्वराविषयींच्या कृतज्ञतेनें अंतःकरण भरून येतें व कोणाशींहि आपल्या स्थितीची अदलाबदल करण्यास मनुष्य तयार होत नाहीं.

मनुष्य कधींहि सुखी नसतो; तो सुखी व्हावयाचा असतो. सुख हें नेहमीं पुढें असतें. त्याला पकडण्याकरिता मनुष्य सारखा धांवत असतो व तें तितक्याच वेगानें पुढें पळत असतें. पलीकडील डोंगरावर गेलें म्हणजे तेथून काहीं हात पोचणें शक्य नाहीं असें आढळून येतें व त्याच्यापलीकडील डोंगरावरून आकाशाला हात पोचले असें वाटूं लागतें; पण तेथें गेल्यानंतर पूर्वीप्रमाणेंच अनुभव येतो. याप्रमाणें कितीहि डोंगर पालथे घातले तरी आकाश 'पुढील' डोंगरासच टेंकलेलें राहणार! तीच गोष्ट सुखाची. जी गरज आज तीव्रतेनें भासत्ये ती भागली म्हणजे आपण पूर्णपणें सुखी होऊं असें मनुष्यास वाटतें; परतु ती भागली कीं लागली दुसरी दत्त म्हणून पुढें उभी! व ही नवीन गरज भागल्यास मात्र आपण खास सुखी होऊं असें नंतर वाटावयास लागतें; परंतु ती भागल्याबरोबर तत्क्षणींच-ती भागल्याबद्दल आनंद मानण्यास मनुष्याच्या मनास क्षणाचाहि अवकाश न देतां-तितक्याच किंबहुना अधिक तिव्रतेनें भासणारी तिसरी गरज मनुष्याचें मन पूर्णपणें व्यापून बसत्ये!!

म्हणून सतत वाढत जाणाऱ्या या सुखतृष्णेस योग्य लगाम घालून, आपण शक्य तो उद्योग केल्यानंतर जी स्थिति प्राप्त होईल तींत संतुष्ट राहण्याची संवय मनास लावली पाहिजे. अशा तऱ्हेनें संतोषाचें ठाणें अंतःकरणात बसलें की तेथें सुखहि आलेंच म्हणून समजावें.

## सुखोपभोगाचें क्षितीज

शारीरिक सुख आणि मानसिक सुख या दोन प्रकारच्या सुखाचा विचार करितां शरीराचे किंवा इंद्रियाचें व्यापारांपेक्षा मनासच अधिक महत्व द्यावें लागतें. शारीरिक म्हणजे आधिभौतिक सुखापेक्षा मानसिक सुखाची योग्यता अधिक असा जो सिद्धात ज्ञानी पुरुष करितात तो आपल्या ज्ञानाच्या घमेंडीनें करीत नसून, त्यातच श्रेष्ठ मनुष्यजन्माची खरी थोरवी म्हणजे सार्थकता आहे, असें प्रसिद्ध आधिभौतिकवादी मिल्लयानेंहि आपल्या उपयुक्ततावादावरील ग्रथांत प्राजलपणें कबूल केलें आहे. कुत्रीं, डुकरें, बैल वगैरेंसहि मनुष्याप्रमाणेंच इंद्रियसुखाची गोडी असतें, आणि विषयोपभोग एवढेंच काय तें या जगात खरें सुख अशी जर मनुष्याची समजूत असती, तर मनुष्य पशु होण्यासहि राजी झाला असता. पण पशूचें सर्व विषयसुख नित्य मिळावयाचें असले तरीहि ज्याअर्थी पशु होण्यास कोणी राजी होत नाहीं, त्याअर्थी पशूपेक्षा मनुष्यामध्यें

कांहीं तरी विशेष आहे असें उघड होतें. मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धींचें कारण॥ या तुकोबाच्या उपदेशाचा रोखहि तोच आहे. बुद्धि कशी प्रसन्न ठेवावी याचा विचार न करितां केवळ विषयोपभोगातच गढून जातो. त्याचें सुख क्षणिक किंवा अनित्य असतें. त्याला आत्यंतिक सुख मिळणें केव्हांहि शक्य नाहीं कारण जें इंद्रियसुख आज आहे तें उद्या नाही, इतकेंच नव्हे, तर जी गोष्ट आपल्याच इंद्रियास आज सुखकारक वाटते तीच काही कारणामुळें उद्यां दुःख कारक होते. उदाहरणार्थ, उन्हाळ्यास जें थंड पाणी गोड वाटतें तेंच थंडीच्या दिवसात नकोसें होतें. बरें, इतकें करूनहि सुखेच्छेची पूर्ण तृप्ति होते असेंहि नाही. कारण विषयवासना सतत एकारखी वाढत जात असल्यामुळें दररोज नवीं नवी सुखें मिळालीं तरी विषयसुखाची इच्छा पूर्णपणें तृप्त होणें कधींच शक्य नाही. ययाति राजाच्या सुप्रसिद्ध गोष्टीवरून याची सत्यता नीट लक्षांत येईल. ययाति राजा शुक्राचार्यांच्या शापानें म्हातारा झाल्यावर तें म्हतारपण दुसऱ्याला देऊन त्याऐवजीं त्याचें तारुण्य घेण्याची शुक्राचार्यांनी दयाळू होऊन सवलत दिली होती. तेव्हा त्याचें तारुण्य घेऊन ययातीनें एक हजार वर्षें एकसारखा विषयोपभोग घेतल्यावर, पृथ्वींतील सर्व पदार्थ मनुष्याची सुखवासना तृप्त करण्यास अपुरे आहेत असें त्याच्या अनुभवास आले आणि—

न जातुः काम कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।

'सुखाच्या उपभोगानें विषयवासनेची तृप्ति कधीहि होत नाहीं, हवन द्रव्यानें जसा अग्नि, त्याप्रमाणें उपभोगानें विषयवासना अधिकाधिकच वाढत जाते' असे त्याच्या तोंडांतुन उद्गार निघाले असें महाभारताच्या आदिपर्वांत व्यासानीं वर्णिलें आहे. त्याचप्रमाणें मांधाता नामक पौराणिक राजाच्या मुखातून मरतेसमयी—

न कहापणवस्सेन तित्ति कामेसु विज्जति ]
अपि दिव्वेसु कामेसु रतिं नो नाधिगच्छति ।।

'कार्षापण नामक नाण्याचा पाऊस पडला तरी कामाची तित्ति म्हणजे तृप्ति होत नाहीं आणि स्वर्गांतली सुखें मिळाली तरी कामी पुरुषाची कामेच्छा तृप्त होत नाही.' असें उद्गार निघालें असें बौद्ध ग्रथांत वर्णन आहे. सुखसाधनें कितीहि मुबलक असलीं तरीं इंन्द्रियांची खवखव सतत वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें, केवळ सुखोप भोगानें सुखेच्छा कधीहि तृप्त होणें शक्य नाहीं, तिला दुसरा कांहीं तरी आळा घालावा लागतो हें यांतील बीज आहे.

सर्व सुखांमध्ये जें इन्द्रियातीत बुद्धिगम्य सुख किंवा आनंद तेंच श्रेष्ठ सुख होय. हें नित्य सुख आत्मवश असल्यामुळें, सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे व सर्वांनीं तें संपादन करण्याचा प्रयत्न करावा. पशुधर्माखेरीज मनुष्याचे जें कांही विशिष्ट सुख तें हेंच होय; व हा आत्मानंद सर्व सुखांत नित्य, स्वतंत्र व श्रेष्ठ आहे. तसेच तो आत्मवश म्हणजे बाह्य वस्तूंची अपेक्षा न ठेवितां, किंवा दुसऱ्याचें सुख कमी न करिता, आपल्या स्वतःच्याच प्रयत्नानें प्राप्त करून घेतां येण्यासारखा असून, जसजसें वर चढत जावे तसतसें या सुखाचें स्वरूप अधिकाधिक उज्ज्वल, शुद्ध व निर्मळ होत जातें.

---

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल फंड

## मुंबई कचेरींतील जमा

## (ता. २५।२।६३ ते २५।५।६३ पर्यंत)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. व्ही. डब्ल्यु पाडगांवकर | मुंबई | ५·२५ |
| २ | ,, जी. ए. देसाई | अहमदाबाद | १००·०० |
| ३ | ,, म. य. देसाई | मुंबई | १५·०० |
| ४ | ,, के. आर. देसाई | बलसाड | ५०·०० |
| ५ | ,, झेड. एल. लालजी | पूणा | १०१·०० |
| ६ | ,, साईभक्त | मुंबई | ५·०० |
| ७ | श्री. एम. जी. भट | ,, | ५·०० |
| ८ | श्रीमती राधाबाई आठवले | बसई | ५·०० |
| ९ | श्री. गो. तु. चव्हाण | मुंबई | १०·०० |
| १० | ,, खु. ए. पींचा | बालाघाट | ११·०० |
| ११ | ,, एच. जी. पटेल | लिंबे | २६·५० |
| १२ | ,, रसिक शहा | मुंबई | ९३·०० |
| १३ | ,, एम. आर. सिताराम | शिलॉंग | १५·०० |
| १४ | ,, जे. पी. देसाई | बडोदा | १०१·०० |
| १५ | ,, मिस. ए. वाघमारे | दरवान | २०·५० |
| १६ | श्री. डब्ल्यू. एच. कोठारे | मुंबई | १०·०० |
| १७ | ,, एस दिनकर | मद्रास | २५·०० |
| १८ | श्रीमतीबाई | — | ११·०० |
| १९ | श्री. बा. छो. ठक्कर | सुरत | १२३·०० |
| २० | ,, मो. के. पाठारे | मुंबई | २०·०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | श्रीमती हरिसिंग | बडोदा | २१.०० |
| २२ | श्री. डी. एन. दस्तूर | सिकदराबाद | २१ ०० |
| २३ | श्रीमती रोहिणी इगळे | मुंबई | ११ ०० |
| २४ | श्री. दिलीपकुमार | ,, | ५.०० |
| २५ | ,, म. ना. बोरकर | ,, | ५ ०० |
| २६ | ,, एम. हाथिभाई | कंपाला | १८.५८ |
| २७ | श्रीमती पार्वतीबाई रांगणेकर | मुबई | ४००.०० |
| २८ | ,, मेहरू पी. सिधवा | ,, | १५.०० |
| २९ | श्री. जे. आर. मुधोळकर | दिल्ली | ५१.०० |
| ३० | ए. एम. मलेट्टी | N Gomo N. 1 | २५.५० |
| ३१ | श्री. आर. सि. नायक | मंगलोर | ५.५० |
| ३२ | ,, जयंवंत पाठारे | मुंबई | ५१.०० |
| ३३ | श्रीविष्णु हॉल | मद्रास | ५०.०० |
| ३४ | ,, मा. मा. चौवळ | मुबई | १०.०० |
| ३५ | डॉ. होमी बाटलीवाला | ,, | १२३.०० |
| ३६ | श्री. बेहराम एलाव्हीया | ,, | १०१.०० |
| ३७ | ,, राधेलाल अग्रवाल | बालाघाट | १०.०० |
| ३८ | डॉ. एस. एस. मिश्रा | मिलई | ५.०० |
| ३९ | श्री. बी. ए. राजन | मुंबई | १०.०० |
| ४० | श्रीमती यशोदाबाई वेलिणकर | ,, | ११.०० |
| ४१ | श्री. वि. श्री. गुजर | ,, | ११.०० |
| ४२ | मिसेस गुलचेर मे. आंटीया | सिकंदराबाद | १००१.०० |
| ४३ | सौ. सुशीला तु. पाटिल | पुणे | २०.०० |
| ४४ | श्रीमती चंपा आफळे | दिल्ली | ११.०० |
| ४५ | श्री. आर. डी. पटेल | लुआनशा | ७९४.४८ |
| ४६ | श्रीमती पेरिन पी. सिधवा | मुंबई | १५.०० |
| ४७ | लेफ्ट. क. दयाशंकर | डेहराडून | १०८.०० |
| ४८ | श्री. ए. बी. दातार | पुणे | १५०.०० |
| ४९ | मेजर व्ही. बी. चव्हाण | सातारा | ५००.०० |
| ५० | मिसेस गिरजाबाई फाटक | मुंबई | ५.०० |
| ५१ | श्री. अं. म. शेरला | ,, | ११.०० |
| ५२ | ,, व्ही. आर. भट | वसई | ६.२५ |
| ५३ | ,, सुं. शां. कोरडे | डोंबिवली | १५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५४ | ,, ठाकोरभाई पटेल | लंडन | २५ ०० |
| ५५ | ,, एन. के. पटेल | इंग्लंड | १६ २५ |
| ५६ | मे. न्यु उलन मार्ट | नैरोबी | ५०.०० |
| ५७ | श्री. एस. के. कापडिया | अहमदाबाद | ५१.०० |
| ५८ | ,, एन. एस. क्लचवाला | मुंबई | ६० ०० |
| ५९ | साईभक्त | ,, | ५.०० |
| ६० | श्री. टी. डी. रामनाथ | मद्रास | १०—०० |
| ६१ | ,, जी. एस. नारायणराव | हावेरी | ५१.०० |
| ६२ | श्री. चं. ए. माहिमकर | मुंबई | ५१.०० |
| ६३ | मे. एच. आर. पटेल कं. | इनडोला | ६७.२५ |
| ६४ | श्री. पी. बी. पटेल | मुंबई | १५१.०० |
| ६५ | ,, शा. म. पाटकर | ,, | ११.०० |
| ६६ | ,, का. आ. शेख | बेडकिहाळ | ५.०० |
| ६७ | कॅप्टन आर. एल. ब्रिंद्रर | मिरत | ३५०.०० |
| ६८ | मिसेस त्रिवेणी जोशी | अहमदाबाद | १००.०० |
| ६९ | सौ. लिला क. रेळे | मुंबई | ४१.०० |
| ७० | श्री. वाय. मोरार | नवसारी | १५.०९ |
| ७१ | श्रीमति आर. एस, नायडू | मद्रास | ५.०० |
| ७२ | श्री. व्ही. पी. पॅरमार | कुसाका | ६६ २५ |
| ७३ | ,, ए. जी. आगास्कर | अंबरनाथ | १२.०० |
| ७४ | ,, वा. ना. वाझकर | मुंबई | ५.०० |
| ७५ | ,, एम्. जी. राघवेंद्रराव | ,, | १०.०० |
| ७६ | मिस सुलभा का. पोतनीस | ,, | १८.०० |
| ७७ | श्रीकृष्ण सुर्यप्रकाश | यादगिरी | २५०.०० |
| ७८ | श्री. एस्. डी. सोमण | मुंबई | ५०.०० |
| ७९ | ,, साईभक्त | ,, | ५.०० |
| ८० | ,, बटुक देसाई | दारेसलाम | १३ २५ |

---

ज्ञान सर्वत्र पसरलें आहे. आपण तें शोधून, तपासून घेतलें पाहिजे. वेद हा आमचा अमूल्य ठेवा आहे; परंतु तो आम्हीं आपलासा केला पाहिजे. त्याच्याद्वारें आपण भगवंतासन्निध जाऊं शकतों. केवळ बडबडण्यानें काय साधणार? गप्पा मारल्यानें भगवंत भेटत नाहीं. तर त्याच्या भेटीसाठीं ज्ञानसाधना केली पाहिजे.

—स्वामि विवेकानंद




## जून १९६३

**चा**लू महिन्यात बाहेरगांवचे भक्तांची गर्दी साधारण होती. कांही कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**—स. गवई मराठे यांची जेष्ठ शु. ११ व जेष्ठ ब. ११ अशी दोन कीर्तनें श्रीमंदिरात झाली.

**प्रवचन**—श्री. डॉ. के. बी. गव्हाणकर, कुर्ला ( मुंबई ) यांचे प्रवचन झाले.

**गायन**—श्री. मेनकाबाई शिरोडकर, मुंबई, कु. भारतीदेवी खरवडीकर, ( भारतीय संगीत विद्यालय ) नाशिक, श्री. पुरुषोत्तम माधवराव पारखे, संगीत शिक्षक आग्रा, श्री. गंगुबाई कोपरगावकर यांचे श्रीपुढें सुश्राव्य गायन झाले.

**मृदंगवादन**—श्री. एन्. राममूर्ती तंजावरम् ( कर्नाटकी संगीत वादन )

**व्हायोलिनवादन**—श्री. रामचंद्र एकनाथ दसककर, नाशिक, श्री. अरुण वकील, नागपूर.

**फ्ल्यूट व माउथआर्गन ( वादन )**—श्री. रामचंद्र रंगनाथ गायधनी, नाशिक.

**तबला वादन**—श्री. गजानन नानुटी, नागपूर.

**एकतारी भजन**—श्री. सावळाराम जोशी, मु. नवजिवन नगर, जि. धुळे.

**मोठ्यांच्या भेटी**—ना. पी. के. सावंत ( गृहमंत्री महाराष्ट्र राज्य ), मे. गोडसे साहेब ( चॅरीटी कमिशनर ), श्री. दलालसाहेब, मुंबई, ना. वर्तकसाहेब, शिक्षण उपमंत्री ( महाराष्ट्र राज्य ), मे. मुधोळकरसाहेब, सुप्रीम कोर्ट, दिल्ली व सौ. मुधोळकर, मुंबई, श्री. कृष्णय्यासाहेब, जनरल डायरेक्टर ( स्टेट बॅंक ऑफ इंडिया ).

---

## वाचकांस विनंति

जुलै महिन्याचा अंक म्हणजे 'गुरु पौर्णिमा विशेषांक.' तो नेहमींप्रमाणें चौसष्ट पानांचा निघावयाचा. त्याप्रमाणें सर्व अंक तयार झाला असताहि शेवटचीं ४९ ते ६४ पानें अंकाची जुंपणी करताना छापखान्यांत नजर चुकीनें जागच्या जागीं राहून गेली. तीं पानें या अंकास जोडण्यात आलीं आहेत. छापखान्याकडून घडलेल्या या नजर चुकीबद्दल वाचकांनीं क्षमा करावी अशी विनंती आहे.

—व्यवस्थापक

सहनशीलता आणि विनय यायोगें हा स्वानंद प्राप्त होतो. एडिसनसारखा शास्त्रवेत्ता जो पास्टयूर त्याच्या चरित्राकडे पहा. जेव्हा प्राशिया आणि जर्मन यानीं फ्रान्सचा पराभव केला व तो देश वुईलियम बादशहाच्या हातीं गेला, तेव्हा पास्टयूर पुढें आला. आपल्या देशाच्या विपन्नावस्थेमुळें त्याला फार दुःख झालें व तो आपल्याशी म्हणाला, "राष्ट्रामध्यें फ्रान्सला त्याचे योग्य स्थान मिळावें अशा-विषयी मला कांहीं करतां येणें शक्य नाही काय?" सूड उगवावा किंवा द्वेष करावा, या कल्पनेने त्यानें कामास प्रारंभ केला नाहीं. नम्रपणानें व धिम्मेपणानें त्यानें श्रम केले, कष्ट सोसले व असा शोध लाविला कीं, फ्रान्सची कीर्ति सर्व जगामध्यें झाली. त्याच्या चरित्राप्रमाणें त्याच्या मृत्यूनेंही परमानंद म्हणजे काय याचे आपणास परिज्ञान होते. एका हातामध्यें क्रूस व दुसऱ्या हातामध्यें आपल्या बायकोचा हात घेऊन तो शांतपणें मरण पावला.

### जीवन प्रार्थनामय करा

हा परमानंद जर प्राप्त करून घ्यावयाचा आहे तर आपलें अखिल जीवन प्रथम प्रार्थनामय केले पाहिजे, म्हणजे, परमेश्वराच्या सहवासांत आपण आहों हें आपण जाणलें पाहिजे. दुसरें, क्षुल्लक गोष्टींविषयीं तर्कवितर्क करीत न बसता अत्यंत श्रेष्ठ, कल्याणकारी अशा गोष्टींचा विचार केला पाहिजे, विचारास आचाराचें स्वरूप देणें हें आपलें कर्तव्य आहे, हें लक्षात ठेवून वागलें पाहिजे. विचारास कृतीचें रूप दिलें नाहीं, तर त्याची किंमत कांहीं नाही. "Plain Talks to Young Men" या पुस्तकामध्यें प्रोफेसर जेम्स म्हणतो, 'दुसऱ्यावर ममता करावी. व प्रेम करावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर जेव्हां जेव्हा तुम्हास संधि प्राप्त होईल तेव्हा तेव्हा प्रेम करा आणि दया करा, म्हणजे मग ती सवय तुमच्या हाडीमासीं खिळून राहील, तुम्हीं दुसऱ्यास अनुकरणीय व्हाल व दुसरे तुमचा कित्ता गिरवितील.'

शांतपणे ईश्वराची सेवा करण्याकरिता आपणास हें आयुष्य प्राप्त झालें आहे, आणि आपण तशा प्रकारें आयुष्याचा व्यय केला असता ईश्वर आपणास आशिर्वाद देतो. हा विश्वास आपणामध्यें पुरातन कालापासून आहे. मध्यतरी पुष्कळ तत्त्वज्ञान आलें, गेलें, समाजाची क्रांति झाली; परंतु ईश्वराच्या राज्यामध्ये न्याय आहे हें शाश्वतचें तत्त्व मात्र कायम आहे. ईश्वराच्या प्रेमामुळें त्याचा न्यायीपणा स्पष्ट झाला आहे. बाकी सर्व गोष्टीकडे कानाडोळा करून ईश्वराचें प्रेम व त्याचा न्यायीपणा हे गुण आपल्या आयुष्यातील मुख्य तत्त्वें होत असें आपणास समजलें पाहिजे; आणि असे केल्यानेंच आपणास शांति प्राप्त होईल. भगवद्गीता हेंच तत्त्व शिकवितेः—

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।**
**अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥**

———

# बाबांचा मानवता धर्म

नानाविध लोकांच्या बराच कालपर्यंत आकर्षणाचें केंद्र होऊन राहाणें हेंच बाबांच्या चरित्राचें व त्यांच्या अद्‌भुत शक्तिमत्तेचें आणि सिद्धीचें निदर्शक होय. कितीतरी लोकांनीं बाबांच्या चरित्राचा आणि अवतारकार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला असेल ! पण हा विषय इतका खोल आणि गुह्य आहे की मानवी चिकित्सात्मक निरीक्षणाच्या कक्षेंत तो येणें कदापि शक्य नाहीं. मोठमोठ्या ग्रंथांनीं फार झालें तर त्याचा अंशतः निर्देश होईल. या छोटेखानी लेखानें आपण त्या विषयाच्या शिवेपर्यंतहि पोहचूं हें मानणे चुकीचें होईल. तथापि साईबाबा काय होते आणि कसे आहेत हे ठोकळमानानें सांगणें आवश्यक असल्यामुळें तत्संबंधीं प्रयत्न खालील लेखांतून केला आहे.

## भक्तांचा अनुभव

प्रथम आणि प्रामुख्यानें लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही की साईबाबा ही आजही एक जिवंत व्यक्ती आहे. आणि देहानें जिवंत असतांना आपल्या भक्तांना सन्मार्ग दाखविण्याचें आणि त्याना सर्वप्रकारें साह्य करण्याचें कार्य जितक्या आस्थेनें ते करांत असत **तितक्याच आस्थेनें आजही ते करीत आहेत.** यासबंधीचा पुरावा त्यांच्या भक्तांनीं वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या अनुभवातून पाहावयास मिळेल. या भक्तामध्यें केवळ त्यांच्या कलेवराचे सान्निध्य लाभलेलेच भक्त नसून इ. स. १९१८ नंतर म्हणजे बाबांच्या समाधीनंतर सुद्धा त्यांचेकडून उपदेश व साह्य मिळून भक्तमालिकेंत गोंविलेले अनेक भक्त आहेत. आजही बाबाकडून कित्येक भक्त अशाच प्रकारचे साह्य मिळवीत आहेत. मद्रास प्रांताकडील बाबांचे सर्व भक्त याच मालिकेंत येतात.

साईबाबांच्या चिरंजीवित्वामध्यें आश्चर्य असें कांहींच नाहीं प्रथम हें ध्यानात ठेवलें पाहिजे की मरत कुणीच नाहीं, आत्मा फक्त एक शरीरातून दुसऱ्या शरीरात व एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जातो. पण 'मनुष्याणा सहस्रेपु' हजारोंनीं होणाऱ्या या देहांतरातून असा एकादाच निघतो की ज्याला आपल्या पूर्वीच्या अरिमित्राची आणि त्याना विरोध अथवा साह्य करण्याची आठवण आणि तदनुरूप सामर्थ्य आपले अंगीं आणण्याची सिद्धी प्राप्त झाली आहे. आणि अशाप्रकारचें सामर्थ्य शक्यतेच्या कोटींतले असल्याचे आजही पुष्कळ दाखले प्रसिद्ध आहेत. बाबांच्या बाबतींत तर हें निश्चित सागता येईल कीं त्यांनीं भक्त तयार केले ते आपल्या अमरस्वरूपानेंच. त्यांचें सागणें असें कीं "बाबानो, हें कलेवर म्हणजे 'मी' नव्हें...वस्तुतः मी सर्वत्र आहे. जलीस्थलीं काष्ठी सर्वांच्या अंतर्यामीं मी आहे." निर्जीव चित्रामध्यें

मुद्धा आपण मूर्तिमान जिवंत असल्याचा साक्षात् अनुभव बाबांनीं कित्येकास आणून दिला आहे. अशा तऱ्हेची ही सर्वव्यापी विभुति शिर्डीच्या मशिदीमधील कलेवराबरोबर नष्ट होणे शक्य नाही. तरी पण बाबांच्या निर्याणानंतर कांहीं भक्तांना वाटलें की आता बाबा तिथे नसल्यामुळें आमचें शिर्डीला जाणेयेणें व्यर्थ आहे. त्यांनीं आपली ही भीति बाबाजवळ प्रदर्शित केली. त्यांना उत्तर मिळालें–"थडग्यांतून माझी मातीच तुमच्याशीं बोलेल आणि तिथूनच मीं उत्साहाने कार्य करीत राहीन" बाबाचे उद्गार नेहमींच सत्य आणि विश्वासार्ह ठरले आहेत.

## बाबांची मोठी कामगिरी

कोणाही संताची ओळख करून देतांना प्रथम हे प्रश्न विचारले जातील कीं (१) त्याचा धर्म काय आहे (२) त्यानें काय सत्कार्य केलेलें आहे किंवा तो करीत आहे.

बाबांची सर्वांत मोठी कामगिरी असेल तर ती हीच कीं त्यानीं परमेश्वर व नीतिमत्ता यांवरील श्रद्धेचें पुनरुजीवन केलें. त्याचेकडून स्फूर्ती व उपदेश मिळाल्यामुळें असंख्य लोक परमेश्वराकडे वळले व खऱ्या कळकळीनें आत्मविकासाच्या प्रयत्नास लागले. कित्येकानीं भक्तिसाक्षात्कारही प्राप्त करून घेतला. काहीं थोड्यांनीं आत्मज्ञानाचीच कांस धरली तर 'कांहींनी 'गुरुःसाक्षात्परब्रम्ह' या भावनेनें बाबानाच परमेश्वर कल्पून आपल्यांत त्याचप्रमाणे जे जें भेटे भूत त्यांत, त्याना बाबाच दिसू लागलें. प्रेम आणि लोकांचा कळवळा हा बाबांच्या प्रमुख भक्ताचा एक विशेष गुण होय. नाना जातींच्या व मताच्या त्यांच्या अनेक अनुयायातून एक विलक्षण सहिष्णुता दिसून येतें. आपआपल्या देवतेवर व धर्मावर पूर्णपणें श्रद्धा असते, त्यानाही बाबावरच्या नवीन श्रद्धेनें एक सूत्रात गोवून टाकलें होतें. पुष्कळशा हिंदूभक्तास बाबा म्हणजे साक्षात् परमेश्वरच, तोही सगुण साकार असा जिवंत परमेश्वर जो त्याच्या सामान्य व्यवहारात त्याचप्रमाणें मृत्युसारख्या आणीबाणीच्या प्रसंगी स्फूर्तिदायक व मार्गदर्शक आहे असें अनुभवानें वाटे; व आताहि वाटते. ही विचारसरणी श्रुति आणि गीताभागवतादि ग्रंथास धरूनच आहे.

## मी कोण आहे ?

बाबाच्या चरित्रासंबंधी ज्या काही थोड्या गोष्टी उपलब्ध आहेत त्याचा रूढ अर्थानेंच विचार करू गेल्यास चिकित्साबुद्धी हताश होते आणि मग हेच उद्गार निघतात की 'त्याच्याखारखें तेच.' याच्याविषयी अगदीं निश्चितपणें सांगता येण्यासारखी गोष्ट एकच आणि तीं ही कीं हृदयग्रंथीचा नाश हेंच तर ज्ञानप्राप्तीचें प्रथम आणि मुख्य लक्षण आहे. देह म्हणजेच 'मी' या भ्रामक कल्पनेवर आधारलेली व्यवहारीक भाषा बाबांच्या बोलण्यात पुष्कळदा आली असली तरी स्वतः व्यवहारातीत होते हें त्यांच्या खालील उद्‌गारांवरून स्पष्ट आहे. "मी म्हणजे औट हाताचें साई

नावाचे कलेवर नव्हे." जे असे समजतात की बाबा शिर्डीस असतात त्यांनी बाबाला खरोखरी पाहिलेंच नाही. एक दिवस त्यांनीं स्वतःच आपला हात विस्तवावर जाळून घेतला. लोकांनी औषधे वगैरे लावून घेण्यास विनलें असता ते म्हणाले 'खरोखरच या हाताप्रमाणें हे सारे शरीरच चितेवर जळत असता माझें मलाच पाहण्यात किती मौज वाटेल." 'मी निराकार आहे. आणि सर्वत्र आहे,' आत्मप्रतीति आणि परम वैराग्याने ओतप्रोत भरलेलें हे उद्गार आणि त्याचबरोबर बाबाची वागणूकही पाहिली असता धर्मात व्यक्तित्त्व म्हणजे काय व स्वतः बाबाची भावना त्याविषयी काय होती या प्रश्नावर आपण येऊन ठेपतो. ध्याता आणि ध्येय याचे व्यक्तित्व हेंच धर्मांचे विशेषतः प्रेमधर्मांचें मूल किंवा पाया आणि शरणागति हेंच त्याचे मुख्य तत्व हा सर्वमान्य सिद्धांत बाबासही संमत होता. पण या शरणागति आणि प्रेममार्गांमध्ये प्रारंभी द्वैतभाव दिसत असला तरी शेवटीं या दोहोंचेंहि तिसऱ्याच 'एकांत' किंवा 'संख्यातीतात' मलिन होत असतें. ज्ञानमार्गास अनुसरून नित्यानित्य विवेक केल्यानें चित्ताचा लय झाल्यावर जो आनंद होतो तद्वतच देवभक्ताचे हें द्वैत अनुपम अद्वयानंदात नाहीसे होते. साईबाबापासून फारच थोड्याना हें मिळाले. आणि त्यातुन काहीनाच या अद्वयानंदाच्या गोडीचा अनुभव करून घेता आला. बाबा म्हणत–'लोक समजतात की मी तुमच्यापासून वेगळा आहे आणि तुम्हीं माझ्यापासून वेगळे आहात. पण हे चुकींचें आहे. वस्तुतः तुम्ही माझ्यात आहात. आणि मी तुमच्यात आहे. माझा भक्त मला तुमच्यात त्याच्यात आणि सर्वांभूतीं पाहतो. आपल्यामध्ये ही भेदाची भिंत आहे. तिनेंच आपल्याला वेगळें केलें आहे. ती तुम्हीं पाडून टाकिली कीं आपण समोरासमोर एकमेकास पाहू आणि ओळखू. संत हे भेदाभेद पाळीत नाहींत. तुम्हाला माझी सेवा करावयाची असेल तर हे भेदाभेद सोडा.' अशा प्रकारच्या विविध मनोवस्थेंत बाबा पुष्कळ वेळां दिसत. कधी कधीं ते म्हणत मी तर एक गरीब फकीर आहे. खुदाचा बंदा आहे. अल्लाच मालिक. तोच सर्व काही करणारा.... मी नव्हें. पण कधी कधीं असेंही म्हणत कीं 'मीच गणपती, लक्ष्मीनारायण, महालक्ष्मी, दत्त इत्यादि.' 'मीच सर्व आहे. आणि साधू, असाधु प्राणिमात्र सर्वांत मीच आहे. मीच हे विश्व व्यापिलें आहे. मीच ब्रम्ह्याला उत्पन्न केलें आहे. मीच ब्रह्म किंवा परमेश्वर आहे. माझ्या सत्तेशिवाय कांहींच चालत नाही.' आणि तसें पाहिलें तर त्यांनी या प्रत्येक स्थितीचा स्वतः अनुभव घेतलेला होता.

### सर्व धर्मी समानत्व

धार्मिक आचरणाबाबत हें लक्षात ठेवण्यासारखें आहे की बाबा सर्व धर्माचा सारखा आधार घेत. ते स्वतः 'फातिहा' म्हणत व मुसलमानांकडून कुराण ऐकत. हिंदूंना रामामंत्र सांगत आणि गीता शिकवीत असत. बाबा म्हणजे कोणत्याही एका धर्माचे नव्हत हे म्हणणें चुकीचें ठरणार नाहीं. धर्मांतर करणें त्याना आवडत नसे. भक्ताना आप

त्याच धर्मांत राहण्याची शिकवण ते देत. त्यांच्या मशिदींत धुनी जळत असे ( आणि अजूनही जळते ) आणि त्याठिकाणी अग्निपूजक हिंदू-पारशांप्रमाणें मुसलमानही प्रार्थनेला येत. व अजूनही येतात. तिथेंच एक तुळशीवृंदावनही होतें. त्याला ते 'द्वारकामाई' किंवा ब्राह्मणाची मशीद ह्मणत असत. तेथील दैनिक अध्ययनात हिंदुलोक पुराणादि ग्रंथ वाचीत. त्याचप्रमाणें मुसलमानसुद्धां कुराणाचा अभ्यास करीत. आणि विशेष हें कीं आज पंचेचाळीस वर्षें त्या मशिदीमध्यें बाबाची आरती व पूजाअर्चा षोडशोपचार साहित्यानीं, हिंदू मंदिरास साजेशा वाद्यध्वनींनीं, मराठी आणि संस्कृत भाषेंतील मंत्रानी, होत आहे.

बाबांचा स्वतःचा कांहीं धर्म किंवा त्यानीं स्वतः पुरस्कार केलेला कांहीं धार्मिक मार्ग आहे काय असा कुणी प्रश्न केला तर त्याला 'प्रेमधर्म' असें निश्चित उत्तर देता येईल. हा प्रेमधर्म सर्व प्राणिमात्रांस सुसाध्य आहे. प्रेम आणि तदंतर्गत ज्ञान हें त्याचें मुख्य अंग आणि त्याचे ध्येय म्हणजे सगुणसाकार व निर्गुणनिराकार परमेश्वराची प्राप्ती. त्याच्या उपदेशातील ज्ञान आणि भक्ति यांचा सांगड, ज्यानें श्रीमत्भागवताचा सूक्ष्म अभ्यास केला आहे त्यालाच मात्र समजू शकेल. या पुराणासंबंधी बाबा उद्धवेशबुवा नामक आपल्या शिष्यास "त्यात मी तुला सगळें सांगितलें आहे. आणि अजूनही सांगत आहे." असे म्हणून एकादशस्कंदातील श्रीकृष्णउद्धव संवादाचें पारायण करण्याची आज्ञा दिली. त्या पुराणातून पुष्कळदा हे दृष्टोत्पत्तीस येतें कीं जीवनाचें ध्येय म्हणजे 'वासुदेवः सर्वमिति.' त्यालाच परब्रह्म असेंहि म्हणतात. हेंच परब्रह्म सर्वांचा आदि आणि अंत. हेंच सगुण निर्गुण. हेंच सर्वांच्या पलीकडचे. यापेक्षा त्याचें अधिक वर्णन शक्य नाहीं. हीच भागवताची आणि ज्ञान्यांची परमागति होय. बाबाचें ध्येयहि यापासून भिन्न नव्हतें.

## बाबांना सर्व सारखे

एखादा नवीन धर्म कायम करणें किंवा कांहीं नवी विचारसरणी प्रस्तुत करणें यांतच बाबाचें खरेंखुरें माहात्म्य नाही तर त्याचा खरा मोठेपणा ह्यांतच आहे की, आपापल्या जुन्या धर्मासंबंधी जवळ जवळ श्रद्धाहीन झालेल्या लोकांस त्यांनीं आपल्या जवळ ओढलें. हिंदु किंवा मुसलमान कुणीहि आपल्या धर्मांच्या तत्वांत खरी श्रद्धा असणारे थोडेच. आणि सनातनी परंपरेमुळें अजूनपर्यंत टिकलेल्या धर्मविधींची बौद्धिक दृष्ट्या उपयुक्तता समजणारे त्याहूनहि थोडे. तरुण आणि अविचारी जनता धर्मांकडे अगदीं तिरस्कार बुद्धीनें पहात नसली तरी त्याचें महत्त्व त्यांचे गळीं उतरलें नसल्यामुळें सर्वप्रकारचें नियम झुगारून देऊन 'खाऊं व सुखी राहू' अशीच त्याची उच्छृंखल प्रवृत्ती होते. अशा या पिढीस शुद्धीवर आणून धर्मांची महती स्थापित होण्याकरितां म्हणजे 'धर्मसंस्थापन' करण्याकरितां एका महान् आत्म्याचीच आवश्यकता असते. बाबांच्या

रूपानें तोच महान परमात्मा धर्मरक्षणाकरितां अवतीर्ण झाला. त्यांचें त्रिकालाबाधित ज्ञान, अतुल स्वार्थत्याग, आणि परमपवित्रता यायोगे भक्तावर सहजीच छाप पडली. व्यक्ति आणि समाज याच्या सुस्थितीकरितां बाबानी काय केलें, त्या सर्वांचें आकलन होणे शक्य नाहीं; आणि ज्ञात असलेल्या गोष्टी सुद्धा पुष्कळशा ग्रथांतूनच निवडून घ्याव्या लागतील. या लेखात त्यांचा ओझरता उल्लेख केला आहे त्याच्यावरून साईबाबा व त्याचें कार्य याची वाचकास ओळख थोडी बहुत होईल.

एकदां, जात, धंदा वगैरेबद्दल कमिशनरनें प्रश्न केल्यावरून बाबानीं उत्तर दिलें कीं, 'मी परवरदिगर म्हणजे परमेश्वर आहे. माझा धर्म कबीर आहे. आणि धंदा लोकांना आशिर्वाद देणें.' आणि बाबाचा सारा जन्मच या धंद्यांत-कृपा करण्यांत गेला असल्यानें आपण त्याचा धर्म त्यांच्या जीवनांतील नाना प्रसंगांवरून आपणांस समजून घेतला पाहिजे.

---

श्री साईबाबांच्या निष्ठावंत शिष्या

## श्री. लक्ष्मीबाई यांचें निधन

शिरडी येथील श्री साईबाबांच्या एकनिष्ठ शिष्या श्री. लक्ष्मीबाई शिंदे ह्या नुकत्याच निधन पावल्याचें लिहिताना आम्हांला पराकाष्ठेचें दुःख होत आहे. निधन समयीं त्यांचें वय १०१ वर्षांचें होतें.

साईबाबांच्या हयातीत साईबाबांची त्यांनी अत्यंत निष्ठेने व निःस्वार्थपणें सेवा केली. शेवटपर्यंत त्यानी दुपारीं व रात्री त्याना जेवण नेवून दिलें व बाबा ते आनंदाने खात. बाबा रोज गावच्या लोकांना शेकडो रुपये वाटीत, परंतु लक्ष्मीबाईना त्यानी कधींही पैसा मागू नकोस म्हणून सागितले व अगदी शेवटच्या क्षणी लक्ष्मीबाईच्या पाठीवर हात फिरवून सागितले, की "मी आजपर्यंत तुला कांहींही दिले नाही. पण माझी आठवण म्हणून तुला ९ रुपये देत आहे. ते खर्च न करता जपून ठेव." ते पैसे अद्यापही भक्तांस पहावयास मिळतात.

लक्ष्मीबाईच्या निधनाने खरोखरीच गांवांतली 'लक्ष्मी' गेल्याचे दुःख सर्वांना वाटत आहे व लोक हळहळत आहेत.

श्री साईबाबा त्या पुण्यात्म्यास शांति देतीलच!

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल फंड

## ( ता. १३।२।६३ ते ता. २३।५।६३ पर्यंत )

हॉस्पिटल कार्यासाठी ठिकठिकाणाहून आलेल्या पांच रुपयांवरील देणग्यांची यादी पुढे साभार प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

| अ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री. द्वारका प्रसाद लक्ष्मण | इंदौर | १०१·०० |
| २ | सौ. नलिनीबाई देवकर | कलकत्ता | ११·०० |
| ३ | श्री. र. न. श्रॉफ | मुंबई | ५१·०० |
| ४ | ,, अमीन सी मर्चंट | ,, | ११·०० |
| ५ | ,, बा. स. नाईक | करजगी | ११·०० |
| ६ | ,, शि. ग. नाईक | ,, | ५१·०० |
| ७ | ,, प्रतापसिंह राजे एस. शितोळे | बेळगांव | ४५·०० |
| ८ | ,, व्ही. एस. शेट्टी | मुंबई | ११·०० |
| ९ | ,, के. डी. मुकादम | ,, | ११·०० |
| १० | ,, एस. बी. सुखटणकर | ,, | ११·०० |
| ११ | ,, डी. जे. गांधी | मंगलोर | ११·०० |
| १२ | ,, गणेशलाल गोपीकिशन | तिर्थपुरी | ४०·०० |
| १३ | ,, जे. पी. चादे | मुंबई | ५१·०० |
| १४ | ,, पी. एच. ठक्कर | जालना | २१·०० |
| १५ | ,, दास | | १०·०० |
| १६ | ,, माधव पानवार | देहराडून | |
| १७ | सौ. भिकीबेन भगवानजी | मुंबई | ११·०० |
| १८ | ,, पी. एस्. पंधारे | भावनगर | ५१·०० |
| १९ | ,, आर. एस्. महेंद्र | ,, | २५·०० |
| २० | ,, व्ही. पी. रावत | मुंबई | १५·०० |
| २१ | डॉ. क्षीरसागर | अमरावती | ७·०० |
| २२ | ,, सी. पी. पटेल | मुंबई | १०१·०० |
| २३ | ,, आर. के. प्रधान | नागपूर | २५·०० |
| २४ | ,, बाळा मावंजी | शिर्डी | २०·०० |
| २५ | ,, न. छ. शाह | सिंदखेड | ११·०० |
| २६ | ,, एस. एम्. लतीफ | पुना | ११·०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | सौ. एम्. के. मेहरा | मुबई | २५.०० |
| २८ | ,, के. एल. भडारी | लखनौ | ५.०० |
| २९ | ,, बी. आर. चोना | ,, | ५.०० |
| ३० | ,, सी. पी. मरी | सिबार | ५.०० |
| ३१ | श्री. शांतीलाल एम्. पारीख | मुबई | ५.०० |
| १ | श्री. नरेंद्र वकील | मुबई | १०१.०० |
| २ | ,, एक साई भक्त | ,, | ५.०० |
| ३ | ,, ए. एल. बाबा नारायण | बगलोर | ५१.०० |
| ४ | ,, ए. एच्. जना मुर्ती | बगलोर | २५.०० |
| ५ | कु. पदमा कुमारी | बगलोर | २५.०० |
| ६ | श्री. साईनारायण | बगलोर | २५.०० |
| ७ | ,, ए. एच. बालन | ,, | २५.०० |
| ८ | ,, महादु ञ्य. बरडे | ,, | ११.०० |
| ९ | ,, ए. व्ही. सुब्रह्मण्यम् | पुर्णे | २२.०० |
| १० | ,, व्ही. अन्तय्या | सि. बाद | २१.०० |
| ११ | सौ. आर. एन्. पै. | मुबई | ७.३५ |
| १२ | श्री. एस. विश्वनाथ | , | २७.०० |
| १३ | ,, पी. जी. गुरुसनी | मुबई १८ | १०.०० |
| १४ | श्रीमती राजलक्ष्मी कृष्णा | विजयवाडा | २०१.०० |
| १५ | श्री. एल. कामेश्वर राव | मद्रास | १०१.०० |
| १६ | ,, बी. एन. राव | मद्रास | २५.०० |
| १७ | ,, पी. व्यंकटस्वामी | बोलारम | १०१.२५ |
| १८ | सौ. कमला शान्ताराम गायतोंडे | मुबई | २५.०० |
| १९ | श्री. उत्तमचद एन्. मोदी | ,, | १०१.०० |
| २० | ,, टी. पी. जी. नानापर<br>,, के. एम. कृष्णास्वामी | बगलोर | ११.०० |
| २१ | ,, डी. बी. शाह | मुबई | ५१.०० |
| २२ | ,, ल. मु. नायक | ,, | २५.०० |
| २३ | ,, एस. के. व्यास | ,, | ११.०० |
| २४ | डॉ. केळशीकर | दारेसलाम | १४.०० |
| २५ | श्री. सदानंद भिकारे | हुबळी | १२.०० |
| २६ | ,, रा. तु. पाटील | विखरण | १०१.०० |
| २७ | ,, एन. एन. परीख | लातूर | १०१.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | ,, बी. ए. वैद्य, | मुंबई | ५०१·०० |
| २९ | ,, गंगाराम कल्याणजी | ,, | ११·०० |
| ३० | ,, सी. एस. धानु | ,, | २५·२५ |
| ३१ | श्री. हरीश्चंद्र धानु | ,, | २५·२५ |
| ३२ | ,, ज्ञानेश्वर टोलू | ,, | २५·२५ |
| ३३ | ,, रा. सो. धानु | ,, | ५१·०० |
| ३४ | ,, यू. डी. वायंगणकर | मुबई २८ | ११·०० |
| ३५ | ,, गुणवतीबाई शाह | ,, | १०१·०० |
| ३६ | ,, के. एम्. सघवी | ,, | १०१·९० |
| ३७ | ,, डी. के. कालेकर | ,, | १०·०० |
| ३८ | ,, आर. एम्. सधवी | ,, | ५१·०० |
| ३९ | ,, चद्राबाई | ,, | ५·०० |
| ४० | सौ. फ्रेमी जे. इराणी | मुबई | ५१·०० |
| ४१ | ,, कुमा माई | उहाणू | ३१·०० |
| ४२ | श्री. डी. पी. सारती | अ. बाद | १·०० |
| ४३ | ,, डोबला नागरेड्डी | पलाई | ५१·०० |
| ४४ | ,, उषा भास्कर | कोपरगांव | ४१·०० |
| ४५ | ,, बी. एम्. शाह | मुबई | २५·०० |
| ४६ | ,, एच. जे. शाह | ,, | ५·०० |
| ४७ | सौ. मालती ज. कामत | ,, | १०·०० |
| ४८ | श्री. के. एल. मेहता | भिवडी | २५·०० |
| ४९ | ,, नरेंद्रनाथ | मुबई | ३०·०० |
| ५० | श्रीमती यशवंताबाई बा. वगळ | ,, | २६·०० |
| ५१ | ,, एस. एस. देसाई | ,, | २५१·०० |
| ५२ | श्री. जे. व्ही. होरा | कोचीन | ५०१·०० |
| ५३ | ,, रावजी खेतसी | मुंबई | ११·०० |
| ५४ | ,, जे. एम. दलाल | ,, | १०१·०० |
| ५५ | ,, एल. दिनेशकुमार | अदिलाबाद | ८२·०० |
| ५६ | ,, ज. चिं. बच्चा | बीदर | ३३·०० |
| ५७ | ,, नामदेव माणिकराव | वालोना | १०१·०० |
| ५८ | ,, सायन्ना वलद सायन्ना | मुदगल | २५·०० |
| ५९ | ,, औदुंबर नारायण | बसमत | १०·०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६० | ,, माणीकराव देवरावजी | ,, | ५·०० |
| ६१ | ,, सुमनाबाई ग. देव | ठाणे | ५·०० |
| ६२ | श्री. म. म. खडेलवाल | रहिमाबाद | ५·०० |
| ६३ | ,, शिरपू गगाराम | बिनवाला | १०५·०० |
| ६४ | ,, डी. एम्. त्रिलोकेकर | मुबई | ५·२५ |
| ६५ | ,, नामदेव माणिकराव | वाडोना | १०·०० |
| ६६ | ,, पढरीनाथ ग. दंतुलकर | म्हैसा | २१·०० |
| ६७ | ,, विठोबा तु. हजारी | ,, | २१·०० |
| ६८ | ,, नरहरी गगाराम | ,, | ५·०० |
| ६९ | ,, निरालाल नरसिंग | ,, | ५·०० |
| ७० | सौ. रमा आर. बरुर | बरुर | १७·०० |
| ७१ | श्री. बा. ना. पवार | आंबेवाडी | ५१·०० |
| ७२ | सौ. विमलताई बा. पवार | ,, | २१·०० |
| ७३ | कु. प्रमिला बा. पवार | ,, | ११·०० |
| ७४ | श्री. दीलीप बा. पवार | ,, | ११·०० |
| ७५ | ,, यशवत बा. पवार | ,, | ११·०० |
| ७६ | ,, विठ्ठल तु. गुजर | पिपळगाडे | ५१ ०० |
| ७७ | सौ. सरस्वतीबाई बडगुजर | ,, | २५·०० |
| ७८ | श्री. के. व्ही. बडगुजर | ,, | २५·०० |
| ७९ | ,, के. एन्. केसवानी | पुणें | २१·०० |
| ८० | ,, एच्. एस. थापूर | देवलाली | १०१·०० |
| ८१ | ,, शंकर अम्बाजी | आतुरली | ३०·०० |
| ८२ | ,, गगाधर रामचद्र | अंतुरली | १०·०० |
| ८३ | ,, अंबादास किसन | ,, | ५·०० |
| ८४ | ,, गोविंदराव चव्हाण | चाळिसगाव | १०·०० |
| ८५ | ,, एम्. एस. मयेकर | मुबई | ५·२५ |
| ८६ | ,, एच. जी. पाचणेकर | अबेवाडी | १५·०० |
| ८७ | ,, त्र्यं. द. पाटील | आसनखेडे | ५·०० |
| ८८ | ,, डी. नारायण | सि. बाद | ३६·६० |
| ८९ | ,, गो. व्य. कुसूरकर | मुंबई | १०·०० |
| ९० | ,, जे. के. दोशी | मुंबई | ३५·०० |
| ९१ | ,, एल. एम्. कौलमुडा | मुंबई | १०·०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९२ | ,, एस. आर. पडीत | मुंबई | १००.०० |
| ९३ | सौ. गयाबाई | मुबई | ५.०० |
| ९४ | श्री. आर. जी. मोरे | जबलपूर | १५ ०० |
| ९५ | श्रीसाईनाथ मेडीकल हॉल | नान्देड | १०१.०० |
| ९६ | श्रीफ बी. | मुबई | २५.०० |
| ९७ | कॉन्ट्रॅक्टर धव्ल्यू | ,, | २५.०० |
| ९८ | एक साईभक्त | ,, | ३७.५० |
| ९९ | डॉ. पी. ए निराजन | ,, | ११.०० |
| १०० | श्रीमती माधुरी | ,, | ११.०० |
| १०१ | के. ए. पडीत | ,, | २५.०० |
| १०२ | श्री. जी. बी. ठाकरे | ,, | ५१.०० |
| १०३ | ,, शं. भि. गव्हाणकर | ,, | १२ ०० |
| १०४ | सौ. जे. डी. मेहता | अहमदाबाद | १०१.०० |
| १०५ | श्री. एन्. बी. मेहता | ,, | ३०१.०० |
| १०६ | ,, एस्. बी. मेहता | ,, | ११.०० |
| १०७ | ,, हाजी गुलाम हुसेन | राधनपूर | २५.०० |
| १०८ | श्री. बी. बी. इश्वरेया | है. बाद | २१.०० |
| १०९ | ,, पाडुरंग पु. देव | नागपूर | १००.०० |
| ११० | ,, इंदीराबाई कोठेकर | नागपूर | ५०.०० |
| १११ | ,, महमद अमीन | राधानपूर | १०१.०० |
| ११२ | ,, बी. एस. मेहता | राधानपूर | ५.०० |
| ११३ | ,, सौ. बबीबाई व्ही. वेन्ती | मुंबई | ११.९५ |
| ११४ | ,, कातीलाल पारीख | मुंबई | ५१.०० |
| ११५ | ,, एक साईभक्त | ,, | ५१.०० |
| ११६ | ,, पी राजाराम | मुबई | २.०० |
| ११७ | ,, लवीन ॲड प्रदीप खाडवाला | मुंबई | २५०.०० |
| ११८ | ,, ना. ना. सोनार | शिर्डी | १०.०० |
| ११९ | ,, टी. जे. परीख | मुबई | २५१.०० |
| १२० | डॉ. डी. एस. पटेल | मुंबई | १०१.०० |
| १२१ | ,, शंकर नारायण | मुबई | ५१.०० |
| १२२ | ,, चंद्रकान्त बाळाजी पेणकर | सोलापूर | १०१.०० |
| १२३ | ,, व्ही. ए. बाबर | सोलापूर | ५१.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ | ,, वसंत राजगुरु माणकलाल राजगुरु | | १०१·०० |
| १२५ | ,, कमलाकर रामचद्र शेट | पुणें | ५·०० |
| १२६ | ,, बळीराम बयाजी कोते | शिर्डी | ५·०० |
| १२७ | ,, विजयकुमार | सिबाद | ५१·०० |
| १२८ | श्री. व सौ. बुद्धिसागर | ताळोदा | १०१·०० |
| १२९ | डॉ. एस. डी. गुजराथी | शिर्डी | ५·०० |
| १३० | श्री. डी. ए. कुलकर्णी | मुबई | ५·०० |
| १३१ | ,, एम. जी. रावुल | नागपूर | ५०१·०० |
| १३२ | ,, बी. देवा रेड्डी | नंदीपेठ | १००·०० |
| १३३ | ,, भायाजी टेरे, | नागपूर | २५·०० |
| १३४ | श्रीमती लक्ष्मीबाई ना. इडकर | मालवण | १०१·०० |
| १३५ | श्री. व वा. पोतनीस | मुंबई | ५·०० |
| १३६ | ,, सी. पी. पटेल | ,, | १०१·०० |
| १३७ | ,, कांतीलाल दामोधरदास | ,, | २५१·०० |
| १३७ | रॉयल भारत सर्कस | तासगाव | ५७·८५ |
| १३९ | श्री. व. ग. पाटील | मुबई | १०·०० |
| १४० | श्री. चितला सत्यनारायण | सि. बाद | ५०·०० |
| १४१ | ,, योगेश एन् पड्या | मुंबई | २५१ ०० |
| १४२ | ,, नानुभाई कल्याणजी | ,, | ५·२५ |
| १४३ | ,, एस्. गायकवाड | अहमदनगर | ११·२५ |
| १४४ | ,, डी. एम्. सुर्वे | अमरावती | ५·०० |
| १४५ | ,, डी. एस् वाघमारे | | ५·०० |
| १४६ | सौ. यमुनाबाई व्ही. थरथरे | मुंबई | ५·०० |
| १४७ | ,, बी. व्ही. एलम | वाकडी | ११·०० |
| १४८ | ,, डॅडी बारीया | मुबई | ५१·०० |
| १४९ | ,, डॅडी बारीया | मुबई | २५·०० |
| १५० | ,, सोनाबाई राजोपाध्याय | मद्रास | १५·०० |
| १५१ | श्री. नारायण सभू | नारायणपेट | ५०·०० |
| १५२ | ,, व्यंकम्मा ,, | ,, | ५·०० |
| १५३ | ,, अनिलकुमार हरीभाऊ पापल | पापल | १००·०० |

# हॉस्पिटल फंडासाठीं मनीऑर्डरनें आलेल्या देणग्या

## १२।२।६३ तें १५।५।६३ अखेर

| आ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | लॉरेन्झो वॉच क. | मुबई | २५.०० |
| २ | लॉरेन्झो वॉच कं. | कलकत्ता | २५.०० |
| ३ | श्री. आत्माराम राव | नारायण पेट | |
| ४ | ,, आर. डी. कुंठवार | नागपूर | ५.०० |
| ५ | ,, सदाशीव कुलकर्णी | वानखेड | |
| ६ | सौ. ए. जे. घोडे | अलाहाबाद | १५.०० |
| ७ | श्री. बेहारी मोहनलाल | अ. बाद | ११.०० |
| ८ | लॉरेन्झो वॉच क. | मद्रास | २५.०० |
| ९ | लॉरेन्झो वॉच कं. | कानपूर | २५.०० |
| १० | डॉ. आर. एस. खांडेकर | पुलगाव | ५.०० |
| ११ | श्री. शिवाजी दादा डुकरे | वालचंदनगर | ५.०० |
| १२ | ,, आर. के. चौबे | रायपूर | ४०.०० |
| | ,, स. प्र. दडवते | बनखेड | |
| | ,, के. ए. राव | धारवाड | |
| १५ | ,, द. व. पंचाळ | पारवा | ५.०० |
| १६ | कै. सौ. आनंदीबाईचें स्मरणार्थ जी. वैद्य | मुबई | १०.०० |
| १७ | ,, शंभू प्रल्हाद मेहता | नादेड | ५.०० |
| १८ | सौ. गुलाबबाई स. क्षीरसागर | गोरेगाव | ५.०० |
| १९ | ,, एस्. पी. म्हात्रे | मुंबई | १५.०० |
| २० | के. डब्ल्यू महातन | ,, | ५०.०० |
| २१ | सौ. इंदिराबाई मधुकर सालकरे | ,, | ५.०० |
| २२ | टी. बाल सुब्रम्हण्यम | मद्रास | ५.०० |
| २३ | टी. व्ही. पोन्नुस्वामी | कुर्नुल | ५०.०० |
| २४ | एम्. व्ही. रामचद्रम | रायपूर | ५.०० |
| २५ | बी. वीनेकोंडा | मुबई | १०.०० |
| २६ | श्रीमती शांताबाई बोडस | अकोला | १०.०० |
| २७ | पी. एच. दत्त | मोरवेली | ५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | श्रीमती जी. नागावरन | कडप्पा | ५·०० |
| २९ | जे. जे. बादेकर | मुंबई | ५·०० |
| ३० | मो. वि. साळवी | ,, | २५ ०० |
| ३१ | राम | इंदौर | ६ ०० |
| ३२ | ,, हिरालाल जे. शाह | मुंबई | २५·०० |
| ३३ | ,, एम्. व्ही वालीहा | मुंबई | ५१·०० |
| ३४ | ,, के. आनंदराव | धारवार | ३·०० |
| ३५ | ,, लॅरेंझा वॉच क. | कानपूर | २५·०० |
| ३६ | ,, श. प्र. कुलकर्णी | कानखेड | १·०० |
| ३७ | ,, एम्. एफ. भेडी | तुदगीर | ११·०० |
| ३८ | ,, एस. एस. स्वामी अय्यर | वेल्लोर | १०·०० |
| ३९ | ,, नवरोजी पी. बुरजा | सि. बाद | ३०·०० |
| ४० | ,, लॅरेन्झा वॉच कं. | मद्रास | ५०·०९ |
| ४१ | ,, साईसेवक | इदौर | ६·०० |
| ४२ | ,, लॅरेन्झा वॉच क. | कलकत्ता | १००·०० |
| ४३ | ,, एच. एम. नाजुंदीय्या | बगलोर | १०·०० |
| ४४ | सौ. तान्हुबाई ग. पाटील | पुणें | २०·०० |
| ४५ | कुमारी जगदीश किशोरी | सिबाद | १०·०० |
| ४६ | ,, बेबी शोभीनल | सिबाद | ३०·०० |






## एप्रिल—मे १९६३

एप्रिल माहिन्यांत श्रीचें दर्शनाकरितां बाहेर गांवचे भक्त मोठ्या प्रमाणांत शिर्डीस आले होते. कांही कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें: —

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. कृष्णराव जोशी. शेगाव. जि. बुलदाणा ( वऱ्हाड ) श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने पुणें यानी २ कीर्तनें केली. ( चैत्र व॥ ११ श्री. भाऊ महाराज कुंभार पुण्यतिथी श्री. अकलकोट स्वामी पुण्यतिथी ) श्री. ह. भ. प. जेऊरकर बाबा मु. जेऊर, ता. नगर, श्री. ह. भ. प. काशिनाथ अप्पाजी याज्ञिक मु. चोपडा, जि. जळगांव ( पु. खा. )

**गायन :** श्री. रमेश मराठे बेळगांव, श्री. आनंदीबाई बागळे दादर मुंबई, श्री हरिबाळा शिंपी शिर्डी, श्री. पद्मावतीबाई मेमन माटुंगा मुंबई, श्री. श्रीराम विष्णु सातर्डेकर मुंबई, श्री. टी. इरैय्या नायडू जबलपूर, श्री. इस्माईल भाई शेख, श्री. देविसिंग किशोरसिंग राठोड सोलापूर, श्री. गायनाचार्य सुरेंद्रराव दादर मुबई, श्री. बाबुराव वाडेकर, शिर्डी, श्री. डी. डी. बोधे पुणें; श्री. वामन गोविंद आपटे मुबई, श्री. लिलाधर बी. पाटकर मुंबई, श्री. विठ्ठल माजरेकर शिर्डी, श्री. निला प्रभु मुबई, श्री. आर. टी. जाधव सहकार गायन पार्टी कल्याण, श्री. नानासाहेब रासने पुणें, सौ. गवई मराठे.

**हार्मोनियम वादन :** श्री. मो. रा. गधे, शिर्डी, श्री. ललितकुमार जोशी शिर्डी

**सनईवादन :** श्री. चंद्रकात बाबुराव देवळणकर पुणे; श्री. मनोहर लोणकर पुणे; श्री. बबनराव शंकरराव गायकवाड, सनईपार्टी पुणें.

**व्हायोलिन वादन :** श्री. नरेंद्र गणपतराव देवासकर, मुबई

**तबलावादन :** श्री. गुरुदत्त साकुरीकर, श्री. भीमराव तावे, शहाजनपूर, श्री. श्रीपाद कुलकर्णी साऊळ विहीर, श्री. दत्तोबा गुरव शिर्डी, श्री. गोपाळ कृष्ण धारावी मुबई, श्री. एन्. जी. प्रभु गावकर, मालवण.

**लोकनाट्य :** श्री. दत्तोबा तावे शिरोलीकर, श्री. तुकाराम बावाजी खेडकर मु. खेड.

**नकला, पोवाडे :** श्री. व्ही. टी. जामगावकर शिर्डी. सौ. चतुरिकाबाई कर्णिक शिर्डी.

**थोरामोठ्यांच्या भेटी :** नामदार शेषराव वानखेडे (कायदा मंत्री) महाराष्ट्रराज्य.

शिर्डी येथील हवापाणी उन्हाळा कडक असून हवा चांगली आहे. रोगराई काही नाही.

मेच्या सुट्टीमुळे श्रींचे दर्शनास बाहेरगावचे भक्तांची गर्दी विशेष होती. कांही कलाकारानी श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें.

**कीर्तन :** श्रीमती कृष्णाबाई येवलेकर मु. सातारा, स. गवई विठ्ठलराव मराठे दोन कीर्तनें झाली. वैशाख शु॥ ११ व वैशाख व॥ ११ या दिवशीं.

**प्रवचन :** श्री. ह. भ. प. पांडुरंगबुवा वडव मु॥ श्री क्षेत्र पंढरपूर. ( भ. गीता पठण ) संस्कृतीक शैक्षणिक कार्यक्रम ) कुमार मास्टर मंगेश मुंबई.

**कसरतीचे प्रयोग :** कुमार सुखदेव पाटील व कुमारी लिला पाटील व श्री. बाबुराव पाटील रायल भारत सर्कस तासगाव ( सांगली ).

**गायन :** श्री. मास्टर लहानू नागपुरे न्यूदिल्ली, श्री ए. जी. शेख नगर, सौ. सिंधूबाई बिलहिकर पुणें, सौ. शोभा भोग चितळी, सौ. शकुंतला जोशी. नासिक, कुमारी मीनाकुमारी येवला, श्री. दत्तात्रय गोपाळ सहस्त्रबुद्धे. मुंबई, श्री. शिवराम भाऊराव परब मुंबई, श्री. लक्ष्मण त्रिंबकव्यास कोपरगाव, श्री. प्रभाकर रामचंद्र देशपांडे, मालाड मुंबई, श्री. इच्छाशंकर जोशी मुंबई.

**लोकनाट्य :** बी. साधना आणि उषा पार्टी पुणें. ( नृत्यगायन नाट्यछटा )

**मोठ्यांच्या भेटी :** १) मे. साळवी साहेब, विभागीय कमिशनर औरंगाबाद.
२) श्री. पी. जे. सोळव, ऋषी पंडित; बारगाव अमरावती.

**शिर्डी येथील हवापाणी :** शिर्डी येथील हवा उत्तम असून रोगराई कांही नाही.



Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | - by Pradhan | २-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | २-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शोलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of S. i Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★


आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचे तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर



मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अ. सावंत, ईस्ट अ‍ॅन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४१/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.